
FOR PRIVATE CIRCULATION

University of Bombay



MUSIC BULLETIN

(Nos. 28 to 34)
March-April 1973
to
March-April 1974

UNIVERSITY MUSIC CENTRE

M/bp-
376

Price Rs. 2/-

In this issue

B.U.P.—J. 848-800-2-76.

FROM THE EDITOR

The present number of the Music Bulletin is again appearing very late. I have nothing but apologies to offer for the delay.

The whole number is devoted to Professor K. M. Phadke's lectures on "Psychology for Musicians." The five-lecture series was well attended and the discussion which took place later proved that a non-technical elaboration of pertinent concepts from Psychology is bound to be appreciated by students of music if the concepts could be related to aspects of musical performance, education, and thinking. For those who find difficulty in following the Marathi texts of the lectures, an abstract in English is provided in Appendix 'A' of the number. The lectures were delivered during the second and third week of November, 1972 in the University Music Centre.

Maharashtra Cultural Centre
Dr. Ashok Da Ranade Archives
M/bp - 376

Dr. ASHOK DA RANADE.
7, ... Sahawas,
Bandra (E), Bombay-400 051.
(INDIA).

संगीताचे मानसशास्त्र

व्याख्यान पहिले

व्याख्याते : प्रा. **कि. मो. फडके**

प्रा० **अशोक रानडे** : प्रास्ताविक.

मित्रहो, आपल्या म्युझिशियन्स फोरमतर्फे या वर्षीची जी व्याख्यानं आहेत त्यातलं हे पहिलं व्याख्यान आहे. आजचा विषय आहे—'संगीतकारांसाठी आवश्यक असणारं मानसशास्त्र'. हा मी विषय मोठा करून सांगितला म्हणजे मुळामध्ये त्या विषयाचं नांव 'सायकॉलॉजी फॉर म्युझिशियन्स' असं आहे. आता या व्याख्यानाची पद्धती कशी राहणार आहे याविषयी मी थोडक्यात सांगतो. पद्धत अशी की, प्रथम प्राध्यापक कि. मो. फडके—आजचे आपले व्याख्याते—मानसशास्त्राविषयी म्हणजे संगीताशी, संगीतकारांशी निगडीत असणारं असं जे मानसशास्त्र असेल त्याविषयी पहिल्यांदा माहिती सांगतील आणि नंतर त्या माहितीचा संगीताच्या अभ्यासाशी, संगीतकारांशी नेमका संबंध कोठं पोहोचण्याची शक्यता आहे याच्याविषयी मी नंतर दहा मिनिटं थोडंसं सांगणार आहे व त्यानंतर आवश्यक वाटली तर प्रश्नोत्तरं—असा हा पाच व्याख्यानांचा कार्यक्रम राहणार आहे.

प्रा. कि. मो. फडके :

आजच्या व्याख्यानात प्रथमतः मानसशास्त्र म्हणजे काय, त्याची व्याप्ती, अभ्यासाचा विषय काय याबद्दलची माहिती तुम्हाला सांगणार आहे. ती अशा रीतीनं सांगणार आहे की, माझ्या डोळ्यासमोर संगीताचे अभ्यासक बसलेले आहेत, संगीतज्ञ बसलेले आहेत आणि त्यांना काही ना काही रीतीने ती माहिती उपयोगी पडावी असा हेतू डोळ्यासमोर ठेवून ही माहिती मी सांगणार आहे.

पहिला प्रश्न असा की मानसशास्त्र म्हणजे काय ?

मानसशास्त्राच्या अनेक व्याख्या देता येतील. परंतु ही जी पांच व्याख्यानं आयोजित केलेली आहेत त्यांचा उद्देश मुख्यतः academic नाही, हे लक्षात घेऊन मी असं म्हणेन की मानसशास्त्र दोन गोष्टींचा अभ्यास करतं—एक गोष्ट अशी की मनुष्याचं वर्तन आणि दुसरी गोष्ट अशी की मनुष्याचा अनुभव. मनुष्याचा अनुभव— हरतऱ्हेचा, वैविध्यपूर्ण, वेगवेगळ्या क्षेत्रातला अनुभव हे मानसशास्त्राचं एक अभ्यासाचं अंग आहे. 'अनुभव' हा शब्द मी इंग्रजीतल्या 'experience' या शब्दाचं भाषांतर म्हणून वापरतो आहे. आणि दुसरा शब्द सांगितला 'वर्तन'. मानसशास्त्र वर्तनाचा अभ्यास करतं. वर्तन म्हणजे काय ? इंग्रजीतल्या 'activity' किंवा 'behaviour' या शब्दांचं भाषांतर मी केलेलं आहे—'वर्तन'. तेव्हा आता इतकी जुजबी माहिती तूर्त हाताशी घेऊ या. मानसशास्त्र म्हणजे मनुष्याच्या

वर्तनाचा आणि अनुभवाचा अभ्यास करणारं शास्त्र. ही एक सामान्य, ढोबळ व्याख्या आपल्या-समोर ठेवून आता या दोन शब्दांचं मी जास्त विवरण करतो. 'अनुभव' म्हटल्यावर आपल्याला जे वेगवेगळे अनुभव येतात ते सर्व मानसशास्त्र अभ्यासत असतं. ते कडू असतील, गोड असतील; चांगले असतील, वाईट असतील; सुखद असतील, दुःखद असतील—ज्याला pleasant—unpleasant म्हणतात असे सर्व अनुभव. हे अनुभव जर आपल्याला वेग-वेगळ्या रीतीने वर्णन करायचे असले तर आपल्याला कादंबरीकाराचाच आश्रय घ्यावा लागेल. कारण, कादंबरीकार हा नेहमी मनुष्याच्या अनुभवाचं विस्तृत विवेचन करत असतो, लेखक ते करीत असतो, कथाकार करीत असतो. पण मानसशास्त्र हे जेव्हा शास्त्र या दृष्टीने विचार करू लागतं तेव्हा मनुष्याच्या सर्व मनोव्यापारांचा तीन दृष्टींनी विचार करता येतो असं त्याला वाटतं. म्हणजे मनुष्याचे सर्व मनोव्यापार तीन भागांमध्ये व्यापता येतात. एका भागाला आपण म्हणू 'ज्ञान'. हा जाडा संस्कृत शब्द आहे. त्याला मराठी 'माहिती' अशाही शब्द वापरता येइल. त्याचं जास्त विवेचन मी नंतर करीन. दुसरी गोष्ट म्हणजे मनुष्याच्या 'भावभावना' आणि तिसरी गोष्ट म्हणजे मनुष्याची कृती 'activity'. म्हणजे इंग्रजीमध्ये आम्ही असं म्हणतो की सायकॉलॉजीच्या सगळ्या अभ्यासामध्ये तीन गोष्टींचा समावेश आहे. एकाला म्हणायचं 'cognition', दुसऱ्याला म्हणायचं 'feelings and emotions' किंवा त्या सगळ्या मिळून affection. आणि तिसऱ्याला म्हणायचं 'conation'—कृती. त्या कृतीमध्ये तुमच्या प्रेरणा, तुमच्या वासना—सगळ्यांचा अंतर्भाव केलेला आहे. मला सांगायचंय असं की ज्यावेळेला आपण 'मानसशास्त्र' असा शब्द उच्चारतो त्यावेळेला आपल्यापुढे नेमकं काय असत? तर मनुष्याच्या सर्व मनाचा अभ्यास म्हणजेच ज्ञानेंद्रियांतर्फे मिळवलेल्या ज्ञानाचा अभ्यास, त्याच्या भावभावनांचा अभ्यास आणि त्याचप्रमाणे तो ज्या कृती करत असतो, त्याला ज्या प्रेरणा असतात, त्याला ज्या वासना असतात त्यांचा अभ्यास. हे मानसशास्त्राचं मुख्यतः स्वरूप आहे.

आता आपण परत एकदा एकेका विषयाकडे येऊ या.

Cognition म्हणजे ज्ञान. ज्ञान असा जरी शब्द मी वापरलेला असला तरी त्याच्या-मध्ये आपण विचार करणं, कल्पनाशक्ती, मत बनवणं, इत्यादी गोष्टी येतात. थोडक्यात म्हणजे मनुष्याची जी ज्ञानेंद्रियं आहेत त्यांच्यामार्फत आपल्याला सभोवतालच्या वस्तूंचं जे ज्ञान होतं त्याबद्दल आपण काही कल्पना करतो, विचार करतो, ठरवतो, इथून आपल्याला चर्चगेटला जायचंय असं म्हणतो. हे सगळे 'cognitive processes' आहेत असं म्हणता येइल. याच्यामध्ये मला सांगायचंय इतकंच की 'cognitive processes' म्हणजे ज्याच्यामध्ये काहीतरी माहिती, knowledge अंतर्भूत आहे, information अंतर्भूत आहे.

दुसऱ्या म्हणजे ज्या भावभावना आहेत, आपल्या feelings आणि emotions, त्या अनेक आहेत. सुखाच्या आहेत, दुःखाच्या आहेत, राग, लोभ, सर्व काही ज्याच्यामध्ये अंतर्भूत असलेल्या अशा आपल्या भावना हे मनुष्याच्या वर्तणुकीचं एक वेगळं अंग आहे असं म्हणता येईल. म्हणजे पहा, मी पहिलं अंग काय सांगितलं? 'लंडन हे जगातलं सगळ्यात मोठ्ठं शहर आहे' असं वाक्य मी जर उच्चारलं तर हे सुद्धा माझ्या मनाचा एक व्यापार

झाला. मनोव्यापार झाला. माझ्या मनामध्ये मी लंडन शहराबद्दल विचार करतोय पण त्याच्यामध्ये भावना काही नाही असं म्हणूया आपण. मी फक्त मला माहिती असलेली काही गोष्ट तुम्हाला सांगत आहे. ज्यावेळेला मी म्हणतो की मला या नादापासून फार चांगला आनंददायक, आल्हाददायक असा अनुभव आला तेव्हा मी माझ्या भावभावनांबद्दल बोलत असतो. मी तुमच्या-वर रागावलो याचा अर्थ मी माझ्या भावभावनांबद्दल बोलत असतो. आणि शेवटी मी असं म्हणतो की मला ही गोष्ट करायची आहे, ती करायची आहे, मला हे हवंय, मला ते नकोय, त्याच्यामागे मी आहे, मला हे मिळवायचंय. म्हणजे काहीतरी कृती हे मनुष्याच्या मनोव्यापाराचं तिसरं लक्षण आहे. थोडक्यात म्हणजे, आपले सर्व मनोव्यापार जर आपण पृथक्करण करुन पहायला लागलो तर आपल्या असं लक्षात येईल की ते सर्व मनोव्यापार अशा एका ना दुसऱ्या प्रकारच्या मनोव्यापारांमध्ये अंतर्भूत करता येतील. म्हणून आता मी असं म्हणेन की 'मानसशास्त्र' याचा अर्थ 'मनुष्याच्या अनुभवांचा अभ्यास करणारं शास्त्र'—तर अनुभव हे अशा वेगवेगळ्या तऱ्हेच्या तीन वेगवेगळ्या घटकांमधे विभागता येतात.

दुसरा शब्द सांगितला 'वर्तन'. पहिल्यांदा सांगितलं की मानसशास्त्र वर्तनाचा आणि अनुभवाचा अभ्यास करतं. आता वर्तन म्हणजे काय, याची थोडीशी चर्चा करूया. कारण अनुभव म्हणजे काय ते आपण ढोबळ मानानं पाहिलं.

'वर्तन' शब्दाचा सामान्यतः आपण असा अर्थ घेतो की 'याचं वर्तन तितकसं चांगलं नाही', 'शाळेत मुलांची वर्तणूक' किंवा 'वर्तणुकीचं सर्टीफिकेट हवं आहे'! ह्यालासुद्धा एक 'वर्तन' असा शब्द आपण वापरतो आणि तो बरोबर आहे. मानसशास्त्रात मात्र 'वर्तन' हा शब्द फार विस्तृत अर्थानं वापरण्यात येतो. जे जे आपण करतो, त्या सगळ्याला एका अर्थानं 'वर्तन' म्हणण्यात येतं. उडी मारणं, पोहणं, पळणं, सतार वाजवणं, दिलरुबा वाजवणं, जे जे म्हणून आपण करतो, जे जे म्हणून आपल्याला दिसतं त्याचा अंतर्भाव आपण 'वर्तन' या शब्दामध्ये—'behaviour' किंवा 'activity' या शब्दांमधे—करतो. एवढंच नाही तर, मनुष्य जेव्हा विचार करतो असं आपण म्हणतो तेव्हा वस्तुतः त्याच्या मेंदूमध्ये काहीतरी चलनवलन चालू आहे, activity आहे, कृती आहे, आणि त्याला सुद्धा मानसशास्त्रज्ञ 'वर्तन' असं म्हणतात. म्हणजे आपले जे काही स्नायू आहेत त्यांची हालचाल ही सुद्धा वर्तनात्मक आहे असं म्हणावं लागेल. थोडक्यात म्हणजे, मनुष्याबद्दल मानसशास्त्राला जर प्रश्न विचारला तर तो असं सांगेल की मनुष्य म्हणजे असा एक प्राणी की जो सभोवतालच्या जगाशी adjustment करण्याच्या प्रयत्नात असतो. थोडक्यात म्हणजे आपल्या या सभोवतालच्या वातावरणाशी, सभोवतालच्या घटनांशी आपण सतत काहीतरी देवाणघेवाण करीत असतो. या देवाण-घेवाणीचं स्वरूप आपण जर पाहिलं तर ते म्हणजे आपलं वर्तन किंवा आपला अनुभव. देवाण-घेवाण म्हणजे काय? आपण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत अनेक तऱ्हेच्या गोष्टी करतो, त्या आपल्या सभोवतालच्या गोष्टींशी करीत असतो, माणसांशी करत असतो, घटनांशी करत असतो आणि त्यामधूनच आपले मनोव्यापार आणि आपलं वर्तन साकार होत असतं. आता असं म्हणता येइल की मानसशास्त्र म्हणजे मनुष्याच्या सर्व वर्तनाचा आणि सर्व अनुभवाचा अभ्यास करणारं शास्त्र. आतापर्यंत मी फक्त अनुभव आणि वर्तन या दोन शब्दांचा अर्थ सांगितला. अजून एका शब्दाचा अर्थ सांगायचा आहे.

मानवी अनुभवांचा आणि वर्तनाचा अभ्यास करणारं शास्त्र, 'विज्ञान' म्हणजे यासुद्धा शब्दाची व्याख्या देण्याची आता गरज आहे; नाहीतर मला असं सांगा की साहित्यिक जे काही करत असतात, नाट्याबद्दल तर कालिदासाने असं म्हटलं आहे—

"त्रैगुण्योद्भवमत्रलोकचरितम् नानारसम् दृश्यते।"

तिन्ही जे गुण आहेत आपल्या प्रकृतीचे — सत्त्व, रज, तम—यांच्यापासून जन्माला आलेल्या मनुष्याचं सगळं जे चरित्र आहे त्याचा आविष्कार नाटकामधे होत असतो. विविध तऱ्हेच्या माणसांना नाट्य हे एकच शास्त्र अत्यंत आल्हाददायक वाटतं याचं कारण असं की माणसाच्या हरएक मनोव्यापाराचं, त्रिगुणात्मक प्रकृतीतून निर्माण होणाऱ्या स्वभावाचं वर्णन हा नाटककार करत असतो, आपल्यापुढं उभं करीत असतो. हे तर बरोबरच आहे. पण मग नाटककार, कादंबरीकार किंवा लेखक आणि मानसशास्त्रज्ञ यांच्यामध्ये फरक तो काय राहिला? फरक असा राहिला की जी गोष्ट साहित्यिक अनुभवाने, निरीक्षणाने मांडत असतो तीच गोष्ट मानसशास्त्रज्ञ शास्त्रीय पद्धतीने मांडतो. अभ्यासाचा विषय म्हणाल तर तोच आहे. माणसाचा अनुभव आणि वर्तन. नाटक म्हणजे काय आहे सांगा दुसरं? शेवटी माणसाचा अनुभव आणि वर्तनच आहे. परंतु मानसशास्त्रज्ञ माणसांच्या वर्तनाचा आणि अनुभवाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करतो. It is a science आणि म्हणून आता सांगितलं पाहिजे की शास्त्र म्हणजे काय? What is science कुठल्याही विषयाला शास्त्र म्हणायचं असेल तर त्यामध्ये काय गोष्टी अंतर्भूत व्हायला हव्यात?

असं म्हणता येईल की कुठल्याही शास्त्राची दोन अंगं असतात. कार्ल पिअर्सन नावाचा एक इंग्लिश Mathematitian, statistian होता. त्याने 'The Grammar of Science' नावाचं पुस्तक लिहिलं आहे. आणि त्याच्यामध्ये जी शास्त्राची व्याख्या दिलेली आहे ती मी तुम्हाला सांगणार आहे. ती व्याख्या अशी आहे. प्रथम इंग्रजीतून सांगतो आणि मग तिचं विवरण मराठीतून करतो. "Science is the description and explanation of the facts of experience in the simplest possible terms." Description आणि explanation हे दोन शब्द येथे महत्त्वाचे आहेत. Description म्हणजे विवरण, वर्णन; आणि explanation म्हणजे ज्याला मराठीमध्ये 'उपादान' असं म्हणतात काहीतरी. म्हणजे कोठल्याही अनुभवातल्या क्षेत्राचं योग्य असं वर्णन—description करायचं आणि त्याची कार्यकारणमीमांसा सांगायची. Explanation म्हणजे कार्यकारणमीमांसा. 'असं का झालं?' मानसशास्त्राला, मानसशास्त्रज्ञाला असं तुम्ही विचारू शकता की मनुष्याला राग केव्हां येतो? राग म्हणजे काय? भावना म्हणजे काय? भावनांच्या पोटी शारीरिक हालचाल काय होऊ शकते? त्याचा अर्थ काय? वगैरे वगैरे. म्हणजे कुठल्या ना कुठल्या गोष्टीचं explanation देणं, description देणं या शास्त्राच्या दोन मुख्य जबाबदाऱ्या आहेत. आपण जर पदार्थविज्ञानाकडे पाहिलं तर त्याच्यामध्ये सुद्धा हे दोन भाग आहेत. एकाला static, दुसऱ्याला dynamic असं म्हणतात. आणि प्रत्येक शास्त्रामध्ये हे descriptive and explanatory, वर्णनात्मक आणि उपादान सांगणारे असे दोन भाग असतात. त्याचप्रमाणे मानसशास्त्रातही आहेत. तेव्हा आता आपण जर परत मानसशास्त्राच्या व्याख्येकडे

पाहिलं तर असं म्हणता येईल की मनुष्याच्या वर्तणुकीचा आणि त्याच्या अनुभवाचा वर्णनात्मक अभ्यास नुसता करावयाचा नाही तर कार्यकारणभावाचा, cause-and-effect-relationship दाखवण्याचा प्रयत्न करावयाचा. त्याच्यातून काहीतरी नियम जन्माला आले पाहिजेत, त्याच्यातून काहीतरी पडताळून पहाता येण्याजोगे, verifiable असे नियम निघाले पाहिजेत.

आता एकच गोष्ट सांगायची राहिली आहे. असं जर आपण मान्य केलं की मानसशास्त्रज्ञ हा मनुष्याच्या अनुभवाचा आणि वर्तनाचा शास्त्रीय दृष्टिकोनातून, description आणि explanation ही दोन ध्येये डोळ्यासमोर ठेवून अभ्यास करतो, तर मग त्याचं साहित्यिकापासून वेगळं असं वैशिष्ट्य काय राहिलं? तर असं म्हणता येईल की आम्ही अभ्यासाच्या ज्या पद्धतींचा वापर करतो त्यामध्ये आणि साहित्यिकांच्या पद्धतींमध्ये फरक असतो. साहित्यिकाची पद्धत ही मुख्यतः वर्णनात्मक, निरीक्षणावर आधारित असते. साहित्यिक हा स्वतःचं आत्मपरीक्षण, लोकांचं निरीक्षण, समाजाचं निरीक्षण, अभ्यास, चिंतन यांच्यातून लेखन करीत असतो आणि मानसशास्त्रज्ञ एवढं करून थांबत नाही तर तो त्याच्यापुढं जाऊन प्रयोग करत असतो. आणि म्हणून, तुम्ही कदाचित ऐकलं असेल, कदाचित तुमच्यापैकी काहींनी मानसशास्त्र हा विषय कुठे अभ्यासिलेला असेल तर त्यांना हे माझं पहिलं व्याख्यान तरी निदान फारच elementary वाटेल. पण मी अगदी पहिल्यापासून सुरुवात करायचं ठरवलेलं आहे. तुम्ही ऐकलं असेल की 'प्रायोगिक मानसशास्त्र' नावाचा एक विषय आहे. 'Experimental psychology' हा फक्त गेल्या शंभर वर्षांत, शंभर सुद्धा नाही, ऐंशी वर्षांत, पुढं आलेला विषय आहे आणि खरं म्हणजे गेल्या पन्नास वर्षांतच विशेषतः मानसशास्त्राची ही जी झपाट्यानं प्रगती झालेली आहे, तिला कारण असं की मानसशास्त्रज्ञांनी नुसत्या चिंतनाचा, नुसत्या परीक्षणाचा, आत्मपरीक्षणाचा, निरीक्षणाचा एवढ्याच मार्गाचा अवलंब न करता आपल्या अभ्यासपद्धतीमध्ये प्रयोगाचा अवलंब केला आणि त्यामुळे शास्त्राची झपाट्यानं वाढ झाली.

एवढं सांगितल्यावर आता प्रयोग म्हणजे काय? आणि संगीत किंवा सांगीतिक अनुभव ज्याला म्हणतात, त्याच्या अभ्यासकांना या प्रायोगिक मानसशास्त्राचा कसा उपयोग होऊ शकेल?

संगीत म्हणजे काय याचा जर थोडक्यात विचार केला तर आपल्या लक्षात येईल की संगीत हे कोणीतरी निर्माण करीत असतं, कशामार्फत तरी निर्माण करीत असतं, medium आहे त्याला. मग ते instrumental असेल नाही तर vocal असेल. पण काहीतरी त्याला माध्यम आहे. कुणीतरी मनुष्य अथवा instrument याच्यातून ते जन्माला आलेलं आहे. आणि त्याचा परिणाम किंवा effect हा कोणातरी माणसावर किंवा माणसांच्यावर होत असतो आणि जर आपल्याला कळलं की मानसशास्त्र म्हणजे माणसांच्या अनुभवांचा आणि वर्तनाचा अभ्यास करणारं शास्त्र तर मग साहजिकच संगीत ऐकल्यानंतर मनोव्यापार कसे होतात, मनोव्यापार म्हणजे तिन्ही प्रकारचे—cognitive, affective & conative —याचाच अभ्यास करायचा ठरला तर मानसशास्त्राची तुम्हाला जरूर मदत होऊ शकेल. त्याचप्रमाणे जर समजा मनुष्य काही सर्जनशील अशा तऱ्हेची संगीताची बांधणी करत असेल तर ती बांधणी करणं हा सुद्धा त्याच्या मनाचा एक व्यापार आहे. म्हणजे

तो creative आहे. त्याचे मनोव्यापार त्यात गुंतलेले आहेत आणि म्हणून आपल्याला मानसशास्त्राचा उपयोग होऊ शकेल. थोडक्यात म्हणजे, असं म्हणता येईल की सर्व कलां- प्रमाणे सांगीतिक कला ही सुद्धा शेवटी मनुष्याच्या आंतरव्यवहारावर—interaction वर, माणसामाणसांतल्या आंतरक्रियेवर अवलंबून असते. मला सांगा, सुंदर चित्र काढलं, म्हणजे ते कुणीतरी काढलं. काढणाऱ्याच्या मनामध्ये काहीतरी एक कल्पनेचा खेळ होता. तो त्याने साकार केला ब्रशच्या सहाय्याने. त्यावेळेला त्याचे काही मनोव्यापार चालू होते. त्याचे पूर्वदत्त असे अनुभव, त्याचं व्यक्तिमत्व या सगळ्याचा परिपाक म्हणजे त्याची ही जी कलाकृती आहे, ती आहे आणि त्या कलाकृतीकडे बघितल्यावर जो रसिक असतो, त्याच्या मनात काही वेगळे विचार उमटतात, भावना उमटतात. त्याला काही ज्ञान मिळतं. म्हणजे हा सुद्धा एक मनोव्यापार झाला. म्हणजे कलानिर्मिती आणि कलेचा आस्वाद, मग ती संगीत असेल, नाट्य असेल, कुठलीही असेल त्याच्यामध्ये नेहमीच माणसामाणसां- तील आंतरक्रियांचा अंतर्भाव झालेला असलाच पाहिजे. आणि असं आहे म्हणूनच मी हे आजचं धाडसाचं निमंत्रण स्वीकारलेलं आहे. माझा हेतू असा होता की मी वेगवेगळ्या तऱ्हेच्या लोकांपुढे मानसशास्त्र सांगत असतो. त्याच्यातून चर्चा होते, त्यांच्याशी माझी आंतरक्रिया होते. अर्थात मी बोलायचा थांबलो (आणि थांबणार आहे) की तुम्ही काहीतरी विचाराल, परत आपले प्रा. रानडे काहीतरी बोलतील आणि मी जेव्हा इथून बाहेर पडेन तेव्हा आलो होतो त्यापेक्षा काहीतरी जास्त शहाणा होऊन बाहेर पडेन. संगीताचे अभ्यासक आपल्या विषयाकडे कसे बघतात ही दृष्टी मला कळेल, तुमचे प्रश्न काय आहेत ते मला कळतील आणि त्यामुळे सुद्धा माझी मानसशास्त्राबद्दलची जी कल्पना आहे, ती जास्त सखोल होऊ शकेल.

आता आपण असं बघूया की मानसशास्त्रज्ञ आणि संगीताचे अभ्यासक यांचा एकमेकांशी संबंध कसा येईल, तो कसा उपयोगी पडेल. त्याच्याकरता मला—ह्याच्यापासून थोडसं लांब जावं लागेल. पण मी इथं 'model' काढणार आहे ते मी दाखवतो; म्हणजे अभ्यास करत असताना आपण या पाचही व्याख्यानांमध्ये आपल्या डोळ्यापुढे काही नकाशा ठेवूया. आणि त्या नकाशाचा आपण उपयोग करून घेऊ या. कशाकरता ? पुढचं जे ज्ञान आपण मिळवणार आहोत ते ज्ञान कशा रीतीने आपण मिळवणार आहोत, ते कोणत्या हेतूने मिळवणार आहोत, हे सुस्पष्ट व्हावं म्हणून मी तुम्हाला थोडासा artificial वाटणारा, कृत्रिम वाटणारा पण उपयुक्त असा एक साधासा नकाशा देणार आहे. त्याला आम्ही इंग्रजीत Black-Box-Model म्हणतो. ही एक अंधारी पेटी आहे. Black Box म्हणजे अंधार आहे त्याच्या- मध्ये. अंधार म्हणायचं कारण हे जे मन आहे, ज्याला आपण 'मन' असं म्हणतो, ज्याच्या- बद्दल मी काहीच बोललो नाही. कारण 'मन' ही चीज असते असं आधुनिक मानसशास्त्रज्ञ मान्य करीत नाहीत. ज्याला तुम्ही मन असं म्हणता, त्याचं वर्णन आम्ही अनुभव आणि वर्तन याच्यामध्ये करून टाकतो. म्हणजे तुम्ही ज्याला 'मन' म्हणता, सामान्य भाषेत 'आपल्या मनात विचार आला' असं जेव्हा आपण म्हणतो, त्याचा कुठंतरी तुमच्या अनुभवाशी किंवा तुमच्या वर्तणुकीशी आम्ही संबंध जोडतो. जे दिसत नाही, ज्याला मोजता येत नाही, ज्याचे मापन करता येत नाही, वजन करता येत नाही अशातऱ्हेचं जे काही 'मन' असेल ते आम्हाला माहीत नाही. पण एवढी गोष्ट खास आहे की तुमच्या मनात जे काही चाललेलं

असते त्याच्याबद्दलचं संशोधन आम्हाला करायचं आहे. मानसशास्त्र म्हणजे साहजिकच मनो- व्यापारांचा अभ्यास; आणि मनोव्यापार म्हणून जे काही आहेत ते कशा रीतीने अभ्यासावेत ह्याच्याकरता मी हा नकाशा देतो. हे जे Black-Box-Model आहे ते मनाचं Model आहे. त्यातलं आपल्याला शेवटी काहीही दिसू शकणार नाही. तुम्ही वाटेल ते प्रयत्न करा. मनुष्याचं शरीर संपूर्ण फाडलेलं आहे. शरीरशास्त्रज्ञांनी त्याची सर्व माहिती दिलेली आहे. मेंदू कुठे आहे, सगळं आपल्याला माहिती आहे. पण 'मन' काही कुठे हाताला लागत नाही व ते लागणार नाही. मग आता आपण असं म्हणू या की ज्याला आपण 'मन' म्हणतो ती एक अंधारी पेटी आहे. आणि आपल्याजवळ काय आहे ? आपल्याजवळ आहेत मनुष्याला मिळणारे वेगवेगळे चेतक किंवा उद्दीपक—'Stimuli'. अनेक उद्दीपकांनी मनुष्याच्या मनावर मारा करता येतो. मनष्यावर अनेक उद्दीपक सतत मारा करीत असतात. आता मीच बघाना. तुमच्या कर्णेंद्रियांवर केवढा मारा करतोय. पंधरावीस मिनिटं झाली. आणि तुम्ही ते शांत चित्तानं ऐकून घेताय. बरं, माझ्यावरती सुद्धा अनेक गोष्टींचा मारा होत आहे. पंखा मला वारा घालतोय, त्याचं मला स्पर्शज्ञान होत आहे. त्याचप्रमाणे तुमचे सगळ्यांचे जे बसलेले चेहरे आहेत, तुमचे हावभाव काय आहेत हे मला दिसत आहेत. म्हणजे तुमच्या सगळ्यांच्या ज्या काही क्रिया चालू आहेत ते म्हणजे मला 'उद्दीपक' किंवा 'चेतक'च आहेत. तुम्ही सगळ्यांनी डोळे मिटलेत आणि घोरायला लागलात तर मी रानड्यांना नमस्कार करून चालायला लागेन. म्हणजे, तो मला एक 'चेतक' किंवा 'उद्दीपक' मिळेल. कशा अर्थाचा ? त्यातून मी काहीतरी अर्थ काढला. थोडक्यात म्हणजे आपल्या ज्ञानेंद्रियांमार्फत आपल्यावरती सतत चेतकांचा मारा होत असतो आणि संगीत हा सुद्धा एक प्रकारचा चेतकच आहे. अशा अर्थाने की ते काहीतरी उद्दीपित करतं. तुम्ही म्हणाल भावना उद्दीपित करतं, आणखी काही उद्दीपित करतं. शास्त्रीय भाषेत आम्ही असं म्हणू की कर्णेंद्रियांवरती ध्वनींचा जो आघात होतो, तोच सरतेशेवटी सांगीतिक उद्दीपक होय. आणि आपल्याला जर काही दिसत असेल, काही मोजता येत असेल, काही सांगता येत असेल, काही घटवता येत असेल, त्याच्याबद्दल प्रयोग करता येणं शक्य असेल, तर ते म्हणजे हे 'चेतक'.

आता ध्वनींच बघा ना. तुम्ही वेगवेगळी वाद्यं इथं आणू शकाल. त्यांची शास्त्रीय मूल्यं तुम्हाला माहीत असतील, 'tempered scale' तुमच्यापाशी असेल. म्हणजे हे जे चेतक किंवा उद्दीपक आहेत, त्यांचं एक लक्षण असं की ते measurable आहेत, दृश्य आहेत, त्यांचा अभ्यास शक्य आहे. पहा मी काय सांगतोय. तुम्हाला काय 'वाटलं' हे मला सांगता येणार नाही. ती तुमच्या 'मनात'ली गोष्ट आहे. पण तुम्हाला 'कशामुळं' वाटायला लागलं, आता तुम्ही कंटाळलात आणि जांभई दिलीत तर माझ्या व्याख्यानामुळं कंटाळलात असं म्हणायला जागा राहील. माझं व्याख्यान हा चेतक झाला, तो मोजता येईल, कुठले शब्द होते ते सांगता येईल. म्हणजे असा सुद्धा कोणी अभ्यास करू शकेल की जांभया नक्की कोणत्या तऱ्हेनं येतात.

त्याचप्रमाणं दुसरी गोष्ट आपल्याला काय दिसू शकते ? मनुष्यावर चेतकांचा मारा झाला की मनुष्य कुठलीतरी वर्तणूक करत असतो. त्याला आम्ही 'प्रतिक्रिया'—response असं म्हणतो. म्हणजे हे चेतक मनुष्यावर आदळले की त्याच्यातून कोणत्या ना कोणत्या तऱ्हेची

'प्रतिक्रिया' मिळत असते. प्रतिक्रिया अगदी साधी असेल. अगदी साधी म्हणजे, "अरे वा! काय छान आहे!" "कंटाळा आला बुवा", एखादी आठी कपाळावर पडेल. "कंटाळा आला बुवा", इथपासून ते "किती आल्हाददायक! चला, आपण त्याच गोष्टीला पुन्हा जाऊ या", अशा अनेक तऱ्हेच्या प्रतिक्रिया मनुष्य देत असतो. तुम्ही मला विचारलंत, 'माणसाचं वर्तन म्हणजे काय?' तर मी सांगेन, 'अनेक प्रतिक्रियांची एक मालिका म्हणजे मनुष्याचं वर्तन'. अगदी तुम्ही swimming म्हणजे पोहणं पाहिलत तर ती अनेक प्रतिक्रियांची मालिका आहे. अनेक रीतींनी आपण हातपाय हलवत असतो आणि त्यातून आपण तरायची विद्या शिकलो आहोत. म्हणजे, swimming हा सुद्धा एक response आहे. 'A series of responses.' त्याचप्रमाणे, संगीताबद्दल असं म्हणता येईल की जेव्हा तुम्ही गळ्यातून संगीत काढता, ती सुद्धा एक प्रतिक्रिया आहे. मनात आलेल्या विचारांना तुम्ही काहीतरी मूर्त स्वरूप देता, तो response झाला. आणि तो आम्हाला मोजता येईल, त्याच्याबद्दल काही शास्त्रीय विवेचन करता येईल. मग दिसतं काय? stimulus' म्हणजे जो काही उद्दीपक आहे एका बाजूला माणसावरती चेतकांचा मारा करत असतो, तो आपल्याला माहीत असतो. मनुष्य त्या तऱ्हेच्या प्रतिक्रिया करत असतो त्या माहीत असतात. परंतु, या काळ्या पेटीत काय आहे हे मात्र आपल्याला दिसू शकत नाही. आणि आपल्या अभ्यासाचा विषय नेमका तोच आहे. मनोव्यापार म्हणजे काय?

हा जो नकाशा मी तुम्हाला देणार आहे, तो नकाशा आता मी पूर्ण करतो आणि असं सांगतो की इकडच्या बाजूला उद्दीपक जे आपल्यावर मारा करत असतात, त्यातून वेगवेगळ्या प्रतिक्रिया जन्माला येतात; त्यांचा कार्यकारणभावात्मक अभ्यास करणं आणि त्याच्यातून निष्कर्ष inference काढणं, म्हणजे मनाचे व्यापार हे शेवटी inferential आहेत. ते दाखवता येण्याजोगे नाहीत. मनाचे व्यापार हे शेवटी तर्काधिष्ठित आहेत. पण नुसते तर्काधिष्ठित नाहीत. मग तो तर्क कशाच्या आधारं केलेला आहे? ते 'अनुमान' आहे. नुसता तर्क नाही. अनुमान कशाच्या जीवावर केलेलं आहे? माहीत असलेल्या चेतकांचा मारा होत असताना मनुष्याने दिलेल्या प्रतिक्रियांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून. मग आम्ही S (Stimulus) आणि R (Response) यांचं नातं काय आहे ते सांगू शकू. म्हणजे हे जे उद्दीपक होते, तेही प्रतिक्रिया निर्माण करतात. अनेक उद्दीपक आहेत, अनेक प्रतिक्रिया आहेत. पण त्यातून काही असे उद्दीपक आम्ही अभ्यासू आणि बाजूला काढू आणि असं म्हणू की अमके अमके उद्दीपक जर माणसावर मारा करतील तर त्यातून अशी प्रतिक्रिया जन्माला येईल.

म्हणजे तुमच्या दृष्टीने असं म्हणता येईल की खरोखरच अमक्या एका तऱ्हेचं संगीत हा जर चेतक समजला गेला तर त्यातून अमक्या तऱ्हेचीच भावना होते काय, हा प्रश्न तुम्हाला जर सोडवायाचा असेल तर तुम्हाला मानसशास्त्राकडे यावं लागेल; मानसशास्त्र ज्या अभ्यासाच्या पद्धतींचा वापर करतं त्यांचा वापर करावा लागेल आणि तो प्रश्न सोडवावा लागेल. खुर्चीत बसून ठरवता येणार नाही. कुणी म्हणतात, सकाळचे काही राग ठरलेले आहेत. मनुष्याच्या ज्या प्रतिक्रिया आहेत असं आम्ही म्हणतो, त्या कशा तऱ्हेच्या, केव्हा होतील? राग हा तुमचा एक चेतक असेल. पण तो विशिष्ट वेळेला वापरायचा म्हणजे

हे त्याच्या भोवतालचं वातावरण सुद्धा तुम्ही त्यामध्ये अंतर्भूत केलेलं आहे आणि प्रायोगिक मानसशास्त्र म्हणजे अशाच तऱ्हेच्या चेतकांचा आणि प्रतिक्रियांचा अशाप्रकारे अभ्यास करावयाचा की ज्यामुळे कार्यकारणभाव समजावा.

मुद्दा थोडासा आणखी स्पष्ट करतो. मला असं सांगायचंय की अनेक चेतक आपल्यावर मारा करत असतात, अनेक प्रतिक्रिया आपण देत असतो. परंतु अमके चेतक अमक्या प्रतिक्रिया जन्माला घालतील हे सांगण्याकरता आपल्याला काहीतरी परत करून बघता येण्याजोगा प्रयोगच नीट निर्माण केला पाहिजे आणि यासाठी अभ्यासाची जी प्रायोगिक पद्धती आहे तिचा उपयोग केला पाहिजे. त्याचा अर्थ असा की आम्ही ज्यावेळेला प्रयोग करू, त्यावेळेला बाकीचे जे अनंत चेतक आहेत ते जसेच्या तसे ठेवू आणि फक्त एकच चेतक व्यवस्थित रीतीने बदलू. मी हे सगळं नीट वर्णन करून सांगणार आहे. कारण ही तर मानसशास्त्राची सगळ्यात महत्त्वाची पायरी आहे. प्रायोगिक मानसशास्त्र. अमका राग अमकी भावना निर्माण करतो काय? करत असेल अथवा नसेल. तुमचा अनुभव आहे की करतो. आम्ही म्हणू 'एखादेवेळी असेल.' ही एक सिद्धांत कल्पना hypothesis आपण घेऊया, की अमका अमका राग जर सकाळच्या वेळी आळवला तर अशा अशा तऱ्हेचा भावनात्मक अनुभव माणसाला येतो. येत असेल अथवा नसेल. हे, समजा, आपल्याला प्रयोगांनी पडताळून पहायचंय आणि ते प्रयोगांनीच पहायला पाहिजे असा हट्ट आहे मानसशास्त्रज्ञांचा. कारण, नाहीतर तुम्ही म्हणत रहाणार 'हो' आणि आम्ही असं म्हणू, 'जे आमच्यावर विश्वास ठेवतात त्यांना तसा अनुभव येतो. परंतु तो खरोखरीच कार्यकारणभाव झाला का? की ज्याला आम्ही इंग्रजीमध्ये Suggesstion किंवा 'सूचना' असं म्हणतो तसं काही झालं? म्हणजे तुम्ही जादूगाराचे प्रयोग पाहिलेत की नाहीत? तो तुम्हाला विचारतो, "तुम्हाला कसलं अत्तर आवडतं? ह्याचा वास घ्या." आणि तो तुम्हाला hypnotize करत असतो आणि तुम्ही म्हणता "हो. तसला वास आला मला!" तर, हा म्हणजे एक सूचनप्रकार, suggesstion आहे. आणि अशा प्रकारे सुद्धा तुम्ही जर खरोखरीच एखाद्या गोष्टीवर, तुमच्या गुरूवर विश्वास ठेवला असेल की असा राग आळवल्यानंतर अशा अशा भावना निर्माण होतात, तर तुम्हाला त्या होतील. पण त्या खरोखरीच कशामुळं झाल्या असा जर प्रश्न तुम्हाला विचारला तर तुम्ही म्हणाल, 'साधी गोष्ट आहे. तो राग मी आळवला आणि तो मी ऐकला त्यामुळं मला या भावना अनुभवाला आल्या,' मानसशास्त्रज्ञ म्हणेल, "थोडी घाई केलीस निष्कर्ष काढण्याची. राग ज्या वेळेला आळवला त्यावेळेला बाकीच्या conditions तू समान ठेवलेल्या होत्यास का? त्याचप्रमाणे, तुझा हा एकट्याचा अनुभव झाला की अनेकांचा? अनेक सकाळी हा प्रयोग करून पाहिलास का?' थोडक्यात म्हणजे, कार्य आणि कारण, cause and effect नातं जर पहायचं असेल तर ते पहात असताना बाकी सर्व चेतक स्थिर ठेवले पाहिजेत. प्रयोगशाळा ही कशाला लागते, तर हे जे interfering stimuli असतात, म्हणजे मधे मधे अडथळा करणारे जे चेतक असतात ते प्रयोगशाळेत आपण बाजूला टाकत असतो. तुम्हाला जुना प्रयोग माहीत असेल. 'पिसा'च्या tower वरुन एक पीस आणि एक दगड टाकला आणि ते म्हणे एकदम खाली आले. खरे म्हणजे ते कधीही एकदम येणार नाहीत. कारण अशी साधी गोष्ट आहे की त्यावेळेला 'गुरुत्वाकर्षण' ही एकच गोष्ट नाही आहे. त्यावेळेला

अनेक गोष्टी आहेत. वातावरण आहे, वस्तूची घनरूपता आहे आणि त्यामुळे, दगडच लवकर येईल पिसापेक्षा. पण जर तुम्हाला असं सिद्ध करायचं असेल की कुठल्याही वस्तूवरती गुरुत्वाकर्षणाचा जो भार आहे तो सारखा असतो तर एक वातनलिका घेतात. वातनलिका म्हणजे काय? ज्यामध्ये सर्व बाकीचे चेतक वगळून टाकलेले आहेत अशी वातनलिका. empty केलेली एक पोकळी—vacuum आहे. त्यात एक पीस टाका, कागदाचे तुकडे टाका आणि ती उलटी फिरवा. म्हणजे तुम्हाला दिसेल की ते एकदम खाली आले. आता, हा जो नियम होता गुरुत्वाकर्षणाचा, तो आपण verify केला, त्याचा प्रत्यय आपण घेतला. कशामुळे घेतला? तर बाकीचे जे प्रकार आपण त्यावेळेला interfere करू शकतील असं आपल्याला वाटलं होतं, ते बाजूला टाकले. आणि म्हणून, नेहमी प्रयोगाला प्रयोगशाळा लागते. प्रयोगशाळेमध्ये आपण ज्याचा अभ्यास करायचा ती गोष्ट अलग करून चेतकांचा आणि प्रतिक्रियांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून कार्यकारणभाव प्रस्थापित करत असतो. आता परत एकदा मी आतापावेतो काय काय सांगितलं याची उजळणी करतो.

मी असं सांगायला सुरुवात केली की आपण मानसशास्त्र म्हणजे काय ते प्रथम पाहू या आणि त्याची व्याख्या मी अगदी सोपी आणि सुटसुटीत केली की जे शास्त्र मनुष्याच्या अनुभवांचा आणि वर्तनांचा अभ्यास करतं त्याला 'मानसशास्त्र' असं म्हणूया. अनुभव आणि वर्तन यांचे मी तीन मुख्य घटक सागितले. एक ज्ञान, दुसरा कृती आणि भावभावना हा तिसरा घटक. म्हणजे मनुष्याचे सर्व मनोव्यापार हे या तीन अंगांमध्ये बसवता येतात, अभ्यासाच्या सोयीकरता पाडलेली ही अंगं आहेत. ही काही फार नवीन आहेत असं म्हणता येणार नाही. आपल्याकडे सुद्धा ज्यावेळेला चिंतन करायला लागलं की देवाकडे जाण्याचे मार्ग कुठले? तर एक आहे ज्ञानमार्ग, दुसरा आहे कर्ममार्ग आणि तिसरा आहे भक्तिमार्ग. साधी गोष्ट आहे. मनुष्याचे मूलभूत असे जे मनोव्यापार आहेत, त्यांची जर कोणी पृथगात्म अशी चर्चा करायला सुरुवात केली, तर मग ती आपल्या हिंदुस्थानात असो, नाहीतर इंग्लंडमध्ये असो, नाहीतर अमेरिकेत असो, तीनच भाग त्यातून जन्माला येतात आणि या तीन मनोव्यापारांचा अभ्यास मानसशास्त्र करत असतं आणि आपण नंतर असं पाहिलं की हे जर खरं असेल तर मग साहित्यिक आणि मानसशास्त्रज्ञ ह्यांच्यात फरक काय? आणि फरक असा सांगितला की हे शास्त्र म्हणजे विज्ञान आहे. ते scientific method वापरतं. मग मी पिअर्सनची व्याख्या सांगितली आणि असं सांगितलं, कुठलीही गोष्ट शास्त्र होण्याकरता description आणि explanation, वर्णन आणि त्याचा कार्यकारणभाव सांगणं, म्हणजे एखाद्या गोष्टीचं शास्त्र होऊ शकतं आणि शास्त्रीय अभ्यास म्हणजे बऱ्याच वेळा प्रायोगिक अभ्यास ठरत असतो. आतापावेतो मी जे सांगितलं हे साधारणतः मानसशास्त्राचं स्वरूप वर्णन करण्याकरता सांगितलं. ते सांगितल्यानंतर तुम्हाला हे Black Box Model म्हणजे काय ते सांगितलं. ही काळी पेटी म्हणजे मनाचे व्यापार आहेत. कारण मनाचे व्यापार हे कधी कुणाला दिसत नसतात, ते कधी स्पर्श करून बघता येत नसतात. ते फक्त अनुमानांनी काढायचे असतात. अनुमान कशाच्या जीवावर? शास्त्रीय आधारावरती. शास्त्रीय आधार म्हणजे काय? तर मनुष्यावर जे अनंत चेतक मारा करत असतात आणि मनुष्य ज्या अनंत प्रतिक्रिया देत असतो, त्यांचा प्रायोगिक पद्धतीने अभ्यास करून जे निष्कर्ष, जी

अनुमानं काढतो, ती अनुमानं म्हणजे या पेटीमध्ये आपण काहीतरी भरत असतो. आता, मी पुढची एक पायरी घेणार आहे.

ही पुढची पायरी अशी की प्रतिक्रियेनंतर हे जे आपण अनुमान काढायचं ठरवतो त्यातून काय निघतं? त्यातून जे निघतं त्या खरं म्हणजे संकल्पना असतात. आपल्याला मनोव्यापार दिसत नाहीत. परंतु सारखा अभ्यास केल्यानंतर आम्हाला काही काही वेळेला असं वाटायला लागतं की या गोष्टी त्याच्यामध्ये असल्या पाहिजेत. आपण अशी कल्पना करू या की मनाच्या या पेटीत या गोष्टी आहेत. एकाला आपण व्यक्तित्व म्हणतो. अमक्या तमक्याचं व्यक्तित्व किती छान आहे! अमक्या तमक्याची personality किती छान आहे! म्हणजे आपण काहीतरी एक संकल्पना वापरत असतो. संकल्पना म्हणजे concept.

सॉक्रेटीस नावाचा एक फार विद्वान तत्त्वचिंतक होता. विद्वान म्हणजे, तो कधी शाळा-कॉलेजात गेला नव्हता. त्यानं जे लिहून ठेवलं किंवा तो जे बोलला ते शाळा कॉलेजात आज शिकवलं जातं. त्याची अशी पद्धत होती की तो रस्त्यातून जायचा आणि लोकांना म्हणायचा, "मला तर काही येत नाही बुवा. तुम्ही सगळे हुशार दिसता. तुम्ही सारखे म्हणता, ह्याच्यावर अन्याय झाला, त्याच्यावर न्याय झाला. मला एकदा सांगा तरी, न्याय म्हणजे काय? अन्याय म्हणजे काय?" असे प्रश्न विचारले की माणसं फार गोंधळायची. ती सांगायची की अमका तमका 'क्ष' आहे ना, भावानं त्याच्यावर फार अन्याय केला, त्याची इस्टेट लुबाडली. सॉक्रेटीस म्हणायचा, "मी तुम्हाला कोणी कोणावर अन्याय केला ते विचारीत नाही आहे. मला अन्याय म्हणजे काय ते सांगा." तो म्हणायचा, "मला तुम्ही सौंदर्य—Beauty म्हणजे काय ते सांगा." त्यावर लोक म्हणायचे, "हा काय सुंदर कुत्रा आहे, सुंदर घर आहे, ही सुंदर स्त्री आहे, हा सुंदर घोडा आहे." तो म्हणाला, "तुम्ही मला 'सुंदर' असे समजले जाणारे पदार्थ किंवा व्यक्ती दाखवताय. मला पाहिजे आहे, 'सौंदर्य' म्हणजे काय? आता ज्याअर्थी तुम्ही या सगळ्या गोष्टींना 'सुंदर' असं म्हणताय, त्याअर्थी तुमच्या डोक्यामध्ये काहीतरी सौंदर्याबद्दलची कल्पना, संकल्पना आहे. म्हणून तुम्ही घोड्यालाही सुंदर म्हणताय, बाईलाही सुंदर म्हणताय, कुत्र्यालाही सुंदर म्हणताय, बिल्डिंगलाही सुंदर म्हणताय. ज्याअर्थी तुम्ही एकच शब्द सगळ्या गोष्टींना वापरून, मी 'सौंदर्य म्हणजे काय?' विचारल्यानंतर त्यांच्याकडे बोट दाखवता त्याअर्थी या सगळ्यांमध्ये काहीतरी एक common element असला पाहिजे. मग तो मला सांगा." म्हणजे तो त्यांना काय विचार करायला लावायाचा? आता शोधा. हे सुंदर कुत्रं आहे, सुंदर बाई आहे. मग ह्या दोघांना तुम्ही सुंदर का म्हणता?" मग त्यांना म्हणावं लागे की "बाबा form हा एक aspect असू शकेल. relationship हे ही एक असू शकेल." म्हणजे सौंदर्याचे घटक तो संकल्पनेमार्फत मांडत होता. म्हणजे, मला असं म्हणायचंय की संकल्पना याचा अर्थ शेवटी 'abstration' आहे.

abstrationशिवाय तर्कसंगती, नियम हे बसवता येणार नाही. Concept हीच मुळी abstract आहे. आणि म्हणून, मी तुम्हाला उदाहरण दिलं की concept म्हणजे काय? तर हजार सुंदर objects दाखवणं, वस्तू दाखवणं ही एक गोष्ट झाली, आणि त्यांच्यात

कुठला common element आहे हे बघणं, ही दुसरी गोष्ट झाली. आणि न्याय म्हणजे काय? हे एक बोलणं झालं आणि इथे अन्याय झाला का तिथे याबाबतीत न्याय झाला ही दुसरी घटना झाली. त्याचं हे application झालं. म्हणजे concrete गोष्टी आणि त्यांच्यातून निघणाऱ्या abstractions, conceptions या वेगळ्या असतात. तर, मला सांगायचंय असं की आपण concrete गोष्टींचा अभ्यास करतो आणि मग त्यातून काही संकल्पनांना जन्म देतो. त्या संकल्पना कुठल्या असतात? तर आम्ही उपयुक्त अशा संकल्पना मांडतो. मनुष्याच्या मनामध्ये काहीतरी भावना नावाची चीज मानायला हरकत नाही. म्हणजे 'भावना' ही आम्ही एक मानलेली 'संकल्पना' आहे. त्याचप्रमाणे 'व्यक्तित्व' ही आम्ही मानलेली दुसरी संकल्पना आहे. या पेटीमध्ये आम्ही अशा संकल्पना फेकतोय. पण त्या पद्धतशीर फेकतोय. त्याला काहीतरी एक कार्यकारणभावाची मीमांसा आहे. त्याचप्रमाणे एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे 'बोधना,' perception. याचा आपण विचार करणार आहोत उद्याच्या व्याख्यानामध्ये. त्याचप्रमाणे attitude म्हणजे 'अभिवृत्ती' असे ज्याला मराठी लेखक म्हणतात, फार महत्त्वाची कल्पना आहे.

आता तिसरी गोष्ट म्हणजे आपण म्हणतो ना की हे शिक्षण ज्याला म्हणतात, अगदी व्यापक अर्थानं 'शिक्षण'. म्हणजे सिगरेट ओढायला शिकणं, सायकल चालवायला शिकणं हा सुद्धा एक प्रकार आहे शिकण्याचा. आम्ही जेव्हा learning हा शब्द वापरतो तेव्हा व्यापक अर्थानं वापरतो. आणि ते learning खरं म्हणजे, आम्हाला कधी दिसत नसतं. शक्यच नाही दिसणं. आम्हाला दिसतं काय? performance दिसतो. म्हणजे तुम्ही काय करता ते आम्हाला दिसतं. पण ही तुम्हाला सवय लागली कशी आणि इतक्या भरभर तुम्ही सिगरेट कसे ओढता वगैरे वगैरे सगळं तुमच्या मनात झालेलं आहे, केव्हातरी, लहानपणापासून. म्हणजे 'शिक्षण' ही एक संकल्पना आहे. त्याप्रमाणे भावना, व्यक्तित्व असं काही दाखवता येत नाही की बुवा हे व्यक्तित्व. तर काही गोष्टींवरून आपण काही अनुमान काढून म्हणतो की याला व्यक्तित्व म्हणावं.

थोडक्यात, मानसशास्त्राचा आपल्याला जो अभ्यास उद्यापासून करायचा आहे तो म्हणजे संगीतशास्त्राच्या दृष्टीनं अनुमानावरून कोणत्या संकल्पना आपण या पेटीत भरलेल्या आहेत, त्या कशाच्या जीवावर भरलेल्या आहेत, त्याला प्रायोगिक अर्थ आहे काय, आणि असेल तर त्याचा सांगीतिक अभ्यासात काय उपयोग होऊ शकेल, हे आपण बघणार आहोत. एक दोन गोष्टींचा उल्लेख करतो फक्त. एक म्हणजे 'बोधना' किंवा perception. ही एक फार महत्त्वाची concept आहे. ही या पेटीमध्ये भरलेली आहे आम्ही. त्याचप्रमाणे attitude ही दुसरी महत्त्वाची concept आहे. आणि emotion ही एक concept व motive म्हणजे प्रेरणा ही चौथी महत्त्वाची संकल्पना आहे. या संगीताच्या दृष्टीने मला महत्त्वाच्या वाटलेल्या कल्पना आहेत. माझे मित्र प्रा. रानडे त्यामध्ये योग्य तऱ्हेचे बदल सुचवतील आणि आता ह्याच्यानंतर जो आपल्याला वेळ मिळेल, त्यात तुमच्याकडूनही मला काही शिकायला मिळेल. ह्या ज्या तीन-चार महत्त्वाच्या संकल्पनांचा मी आज उल्लेख केला, त्या, कुठून आल्या हे आपण उद्यापासून पहाणार आहोत. या आपल्या Black-Box मध्ये आपण मानलेल्या

संकल्पना आहेत आणि त्यांचा एकेकीचा अभ्यास करून आपण असं बघण्याचा प्रयत्न करणार आहोत की खरोखरच संगीताच्या अभ्यासकांना त्या संकल्पनांच्या अभ्यासाने काही फायदा होऊ शकेल काय?

प्रा. रानडे : मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून संगीताकडे कसं पाहता येईल याबद्दल प्रा. फडके यांनी आता काही विवेचन केलं. मला समजलेला त्याचा सारांश, मी पुन्हा सांगणार आहे.

आपण संगीताकडे कुठल्या दृष्टीनं पहायचं हे ठरवायचं असेल तर त्याच्यामध्ये त्यांनी असं निश्चित सांगितलं की कुठलाही मानसिक व्यापार हा अनुभव आणि वर्तन असतो. It is a behaviour and an experience. So music also can be described in terms of behviour and experience. जेव्हा आपण गाणं ऐकतो तेव्हा काय होतं? जेव्हा आपण गातो तेव्हा काय होतं? आणि जेव्हा गाण्याविषयी विचार करतो तेव्हा काय होतं? तर या तिन्ही गोष्टींमध्ये मानसशास्त्र येतं हे त्यांनी आपल्याला दाखवून दिलं. मग पुढं ते असंही म्हणाले की शेवटी आपण ज्याला 'ज्ञान' म्हणतो, ते काय असतं? भावभावना असते ती काय असते? आणि त्याचा मग आपण जेव्हा नेमका संबंध आणू पाहू लागतो तेव्हा मला असं वाटतं की संगीताविषयी बरीचशी विधानं आपण करतो आणि संगीताविषयी काही समजुती बाळगून त्याचा अभ्यास करतो, तिथं आपल्याला याचा अधिक विचार करावा लागेल.

उदाहरणार्थ, संगीताविषयीचं ज्ञान म्हणजे काय? तर संगीताविषयीचं ज्ञान असं म्हटल्यावर मग कदाचित आपल्याला असं म्हणावं लागेल की विशिष्ट रागामध्ये विशिष्ट स्वर येतात, विशिष्ट तालाच्या विशिष्ट मात्रा असतात. हे संगीताचं ज्ञान झालं. परंतु हे ज्ञान असल्यामुळं त्या संगीतकाराला तो राग नीट गाता येईल का? त्याला तो राग समजला असं आपण म्हणू का? त्याला तो ताल नीट समजला असं म्हणू का? तर, तिथं आपण तसं म्हणणार नाही. मग आपण असं म्हणू कदाचित की मला 'पूरिया' अधिक समजला, मला 'पूरिया'त शिरता येतं, मला 'पूरियाचा' mood अधिक समजतो. इथं भावभावनेचा दुसरा घटक जो आहे तो अधिक महत्त्वाचा ठरतो. आणि जेव्हा प्रत्यक्ष प्रयोग तुम्ही करायला लागता तेव्हा ह्या दोन्हीही गोष्टी झालेल्या असून सुद्धा प्रयोग नीट होईलच असंही नाही. म्हणजे पुनः लक्षात घ्या की, 'आम्हाला राग तर चांगला समजतो मग माझं गाणं कसं वाईट होतं?' असं जर कोणी विचारलं किंवा मला तो राग जाणवलेला आहे तरी सुद्धा माझं गाणं 'वाईट' असं लोक का म्हणतात? तर पुन्हा त्या कृतीच्या बाबतीत आणखी काही वेगळे घटक असतात. जेव्हा तुम्ही performance देता, तेव्हा तुम्हाला 'येतं' आणि तुम्ही 'चांगलं वाजवता' एवढं पुरेसं होत नाही. इथं दुसरा त्यांनी महत्त्वाचा भाग आणला की Music is a form of communication. Communication म्हटल्यानंतर नेहमी तिथं दुसऱ्याचा संबंध आहे. केवळ तुम्ही असल्यानंतर communication होऊ शकत नाही, असा मुद्दा त्यांनी मांडला; त्याचं अधिक विवरण पुढं येणार आहे. परंतु संगीताचा विचार मानसशास्त्रानं कां करावा? तर मानसशास्त्र सगळ्या communication चा विचार करतं आणि Music also is a form of communication. मग तिथं असं होणार आहे

की आपण जेव्हा संगीताचा प्रयोग करतो म्हणजे आपण गातो, तेव्हा हे आपलं वर्तन होतं असतं, परंतु त्या वर्तनाचा दुसऱ्यावर काय परिणाम होतो, ही दुसरी बाजू रहाते आणि ती बाजू आपल्या लक्षात येत नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आपण असं म्हणतो की--वास्तविक पहाता तो चांगला गायला परंतु लोकांना ते कळलं नाही ; तर त्यात असं होत असतं की एकाच बाजूविषयी आपण बोलत असतो, दुसऱ्या बाजूविषयी आपल्याजवळ काहीच data नसतो. मग प्रायोगिक मानसशास्त्र म्हणजे काय हे त्यांनी सांगितलं. जेव्हा आपण असं म्हणतो की वास्तविक पहाता पूरिआ हा 'गंभीर' प्रकृतीचा राग आहे, तर ह्याला आधार कुठला आहे? आपण नेहमी म्हणतो की शास्त्रात तो नियम सांगितला आहे. मग इथे त्यांनी असं स्पष्ट केलं की 'नियम' कशाला म्हणता येईल? की जो सदासर्वकाळ तसाच नीटपणे वावरतो असं दिसेल त्यालाच 'नियम' म्हणता येईल. मग ह्याला आपण काय म्हणायचं, असा आपल्यापुढे प्रश्न पडेल. तर मग आपल्याला त्यांनी असं उत्तर दिलं, सुचवलं की ह्याला आपण वास्तविक पहाता 'संकेत' म्हटलं पाहिजे. कारण हा तुमच्या माझ्या काही विशिष्ट group मधे रूढ झालेला असा एक संकेत आहे. तेव्हा संकेताच्या मागे 'रूढी' आहे आणि नियमांच्या मागे 'शास्त्र' आहे. आपण संगीत हे 'शास्त्र' म्हणतो. हा त्या संगीताच्या ज्ञानाचा भाग झाला. जेव्हा आपण संगीताचा परिणाम काय होतो असं बघतो तेव्हा एक affective परिणाम म्हटल्यावर तिथे psychology चा एक दुसरा भाग येतो असं त्यांनी आपल्या नजरेस आणून दिलेलं आहे. मला असं वाटतं की संगीताचा प्रयोग करीत असताना, संगीत ऐकत असताना आणि प्रत्यक्ष आपण जेव्हा त्याच्याविषयी विचार करतो, तेव्हा तेव्हा ज्या काही क्रिया घडत असतात, त्यांचं स्वरूप थोडं ना थोडं वेगवेगळं असतं हे आपल्या लक्षात येणं अतिशय आवश्यक आहे. कारण, नाहीतर ज्ञानी माणूस जो असतो तो असं म्हणतो की राग मला माहीत आहे आणि म्हणजे मला राग येतो. या दोन्हीमध्ये कुठेतरी मोठी गफलत होत असते. आणि आपण संगीतकार नेहमी असं म्हणतो, "तो तर शास्त्री आहे" ('वो तो पण्डत हैं।') म्हणजे तो गायक नाही असं म्हणतो. याच्यामध्ये आपल्याला थोडसं असं सुचवायचं असतं की त्याला गाता येत नाही ; म्हणजे तो कमी प्रतीचा. तसं न म्हणता 'गाणं हा त्याचा प्रांत त्याने ठेवलेला नाही. त्याने गाण्याचंच आकलन, गाणं या मानसिक व्यवहाराचं आकलन एका विशिष्ट अंगापुरतंच केलेलं आहे' असं आपण म्हणायला पाहिजे ; आणि मग ही तिन्ही अंगं जर समजून घेतली तर आपले सगळेच व्यवहार अधिक चांगले होण्याची शक्यता आहे. ही पुढची पायरी आहे. ती आपण लक्षात घेणं अतिशय आवश्यक आहे. मला असं वाटतं की प्रा. फडक्यांनी जे सांगितलं आहे त्याला मी कुठे 'धक्का' लावलेला नाही. संगीताशी जिथे आपण अधिक जाऊन पोहोचायला लागू, तिथे आपण त्याची अधिक उदाहरणं घेणार आहोत.

संगीताचे मानसशास्त्र

व्याख्यान दुसरे

व्याख्याते : प्रा. कि. मो. फडके

पहिल्या व्याख्यानात आपण विशेषतः मानसशास्त्राचा अभ्यासविषय काय आहे याच्याशी आपला परिचय करून घेतला. आज आपण त्याच्या पुढचा टप्पा गाठूया. आणि तो म्हणजे, Black-Box मधील ज्या संकल्पनांचा मी काल केवळ उल्लेख केला, त्यांपैकी एकेका संकल्पनेचा विचार आज आपण करणार आहोत.

पहिली संकल्पना आज मी विचारात घेणार आहे ती म्हणजे 'संवेदन' किंवा इंग्रजी-मध्ये ज्याला perception असं म्हणतात ती. ते सांगण्यापूर्वी काल जी एक गोष्ट सांगितली नाही आणि 'उद्या सांगेन' असं म्हटलं, ती आता आज सांगतो. Adjustment शब्दाचा अर्थ मी उद्या सांगेन असं म्हटलं होतं. त्याला मराठीमध्ये 'समायोजन' असं म्हणतात. कुणी 'जुळवाजुळवी', कुणी वेगळे शब्द सुचवले. मराठी पुस्तकामध्ये त्याला 'समायोजन' असं म्हणतात.

आता काल एक जो मुद्दा मी अस्पष्ट मांडला आणि जो प्रा. रानडयांनी नंतर नीट विशद केला तो परत मांडतो. संगीत म्हणजे एक communication process आहे असं स्पष्टपणे आपण आज मांडूया. काल कदाचित ते मी थोडयाशा बाजूवाजूने मांडलं असेल, indirectly मांडलं असेल. प्रा. रानडयांनी ते स्पष्ट केलं होतं. आज ते नीट एकदा आपल्या समोर मांडू या आणि मग बोधनेचा किंवा perception चा किंवा संवेदनेचा अभ्यास करायला लागूया.

आता, communication म्हणजे काय, असा जर आपण प्रश्न विचारला तर त्याचं उत्तर असं की त्याच्यामध्ये निदान पुढील गोष्टींचा अंतर्भाव झालेला असतो. एक म्हणजे जो communication करतो तो मनुष्य किंवा कुठलंतरी वाद्य. आता मी तुमच्याशी काही communication करतोय, मी तुमच्याशी बोलतोय. म्हणजे त्यामध्ये कुणीतरी person (transmitter म्हणू या आपण त्याला) implied आहे. तो transmitter काय करत असतो? तर त्याच्या मनात ज्या कल्पना असतात, विचार असतात, राग असतात, काय वाटेल ते म्हणा त्याला, ते सर्व तो कुठल्या ना कुठल्या तरी सांकेतिक भाषेमध्ये मांडत असतो. म्हणजे ते लेखन असेल किंवा तोंडी बोलणं असेल किंवा आपण ज्याला 'तार करणं' म्हणतो, ते तार करणारे लोक काही सांकेतिक लिपी वापरतात. code म्हणतात त्याला. एक दोन dots म्हणजे एक रेघ अशी त्यांची काही सांकेतिक लिपी आहे आणि वस्तुत: आपण जी भाषा बोलतो ती सुद्धा एक सांकेतिक अशा तऱ्हेची प्रतीकं आहेत. आणि communication मध्ये माझ्या मनातले जे विचार असतात ते मी या सांकेतिक भाषेमध्ये,

प्रतीकांमध्य transform करतो. म्हणजे माझे विचार मी प्रतीकांत मांडतो. या दृष्टीनं कुठल्या ना कुठल्या तरी तऱ्हेची प्रतीकं, आपण त्याला इंग्रजीमध्ये symbols म्हणू, code-language म्हणू ; ही communication मध्ये अंतर्भूत झालेली असतात. आणि त्यानंतर दुसऱ्या बाजूला receiver हवा. म्हणजे ज्याच्याकडे हे communication जातं, ज्याच्याशी मी बोलतोय. आता तुम्ही सगळे म्हणजे receivers आहात आणि मी हा transmitter आहे. मी बोलतोय आणि माझ्या मनातले विचार, मानसशास्त्र या विषयीचे माझे विचार मी काही एका सांकेतिक भाषेमध्ये, प्रतीकांमार्फत, शब्दांमार्फत भाषेमार्फत तुमच्याकडे पोहोचवण्याचं काम करतोय. आता, ह्याच्यामध्ये किती गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत ते बघा.

एक गोष्ट अशी गृहीत धरलीय की माझ्या मनातले जे विचार मी ज्या रीतीनं सांकेतिक भाषेमध्ये मांडतो, त्या प्रतीकांचा अर्थ तुम्हालाही, मला समजतो त्याप्रमाणं, समजतो. असं नसेल तर मला जे काही म्हणायचंय ते तुमच्यापर्यंत पोहोचणार नाही, तुम्हाला ते समजणार नाही, ते communicate झालं असे म्हणता येणार नाही. मुद्दा स्पष्ट करण्याकरता एक उदाहरण देतो.

आपल्याला असं नेहमी वाटत असतं की आपण अगदी स्पष्ट बोलत आहोत आणि लोकांना कळत का नाही ? विशेषतः आम्हा शिक्षक लोकांना नेहमी असं वाटत असतं, आमचं असं एक गोड स्वप्न असतं की आपण किती शुद्ध आणि स्पष्ट बोलतो बरं ! परंतु विद्यार्थ्यांना हे का बरं कळत नाही ? त्याला कारण असं असतं की आम्ही जे बोलतो, आम्ही ज्या रीतीनं बोलतो, जी प्रतीकं म्हणजे शब्द, भाषा आम्ही वापरतो, त्यांचे तुमच्या मनातले अर्थ काय असतात ह्याचा बऱ्याचदा आम्ही विचार करत काही आणि मग तुम्ही म्हणता : डोक्यावरून गेलं ; दारखिडक्यांशी हा मनुष्य बोलला ; स्वगत बोलला, प्रोफेसर म्हणवतो, काय बोलतो कुणास ठाऊक ! याचा अर्थ असा की ज्या रीतीनं मी माझे विचार मांडले, ती तुम्हाला परत विचारांकडे न्यायला (म्हणजे ज्याला decode असं इंग्रजीत म्हणतात) असमर्थ ठरली. Encoding म्हणजे माझे विचार मी एका भाषेमध्ये करणं, आणि decoding म्हणजे जो receiver आहे, तो माझे जे प्रतीकात्मक असे विचार आहेत, त्यांचा अन्वय लावत असतो. म्हणजे याच्यामध्ये हा अर्थ गृहीत धरलेला आहे की जे code मी वापरतो तेच तुम्ही वापरलं पाहिजे. म्हणजे मी जर मराठी बोलतो तर तुम्हाला मराठी समजलं पाहिजे. मी रशियन बोलायला लागलो तर तुम्हाला इथं काही कळायचं नाही. मलाही रशियन येत नाही म्हणा, पण आपणा सर्वांच्या communication मध्ये code किंवा जी प्रतीकं किंवा symbols आहेत ती सारखी पाहिजेत. मी तुम्हाला आणखी एक उदाहरण देतो आता.

एका माणसाला वाटतंय आपण किती स्पष्ट बोलतोय आणि या लोकांना काही समजत नाही. त्याच्यापुढे लोक बसलेले आहेत असं मानू या. आणि जगाच्या वेगवेगळ्या दोन भागातून ते आलेले आहेत, त्यांच्या मनात वेगवेगळ्या प्रतीकांबद्दल वेगवेगळ्या कल्पना आहेत. **अ** आणि **ब** अशा दोन व्यक्ती आहेत, आणि बोलणारा म्हणतोय, "गेल्या रविवारी आम्ही सहलीला गेलो होतो." त्याला वाटतंय मी किती साधं, स्पष्ट बोलतो आहे. "गेल्या रविवारी आम्ही तीसजण सहलीला गेलो होतो, सहल फारच मजेत गेली,

दुपारी फार उकाडा होता, ऊन फारच पडलं होतं. म्हणून एका झाडाच्या सावलीमध्ये आम्ही दोन तास विश्रांती घेतली. काही लोक पत्ते खेळले, काही रेडिओ ऐकत होते, काहींनी वामकुक्षी केली आणि नंतर आम्ही संध्याकाळी परत आलो." बोलणाऱ्याला वाटतंय, याच्यापेक्षा स्पष्ट ते काय असणार आणखी ?

आता, **अ** आणि **ब** या दोन व्यक्ती माझ्या समोर मी धरलेल्या आहेत, त्या जगाच्या दोन भागातून आलेल्या आहेत आणि जेव्हा 'झाडाच्या सावलीत बसलो' असे हा बोलणारा म्हणाला तेव्हा एका व्यक्तीच्या डोळ्यापुढं हे अशा तऱ्हेचं झाड होतं, त्याला अर्थ समजला. आंब्यासारखं मोठं किंवा वडाचं झाड आहे आणि त्याच्या सावलीमधे तीस लोक दोन तास जर बसले, कुणी पत्ते खेळले, कुणी वामकुक्षी केली तर त्यात. त्याच्या डोक्यात गोंधळ व्हायचं कारण नव्हतं.

दुसरी जी व्यक्ती आहे ती जगाच्या दुसऱ्या टोकाहून आलेली आहे आणि तिच्या मनामध्ये 'झाड' या विषयीची वेगळी अशी कल्पना आहे, कारण ज्या वातावरणात ती व्यक्ती वाढलेली आहे, जे सभोवतालचं वातावरण तिनं अनुभवलेलं आहे, त्यामधून 'झाड' म्हणजे अशाच तऱ्हेची उंच सुरूची झाडं. आणि एका झाडाखाली तीस लोक वामकुक्षी करू शकतात, खेळू शकतात अशी काय प्रचंड सावली त्या झाडाची पडत असली पाहिजे, असा प्रश्न ह्याच्या मनामधे आहे म्हणून तो कावराबावरा झाला की बोलणारा असं काय बोलतोय की तीस लोक दोन तास झाडाच्या सावलीत झोपत होते, खेळत होते, असं हे कसलं झाड असतं ? आणि बोलणाराला वाटतंय, एवढं ह्याला कठिण काय वाटतंय !, याला कारण असं की 'झाड' हा शब्द बोलणाराने उच्चारला, त्याचा अर्थ दोन व्यक्तींना वेगळ्या रीतीने समजला. कारण झाड ही concept आहे. अनेक झाडं असतात आणि आपल्याला जर विचारलं, वडाचं झाड कुठलं, पिंपळाचं कुठलं तर वेगवेगळ्या झाडांवर बोट ठेवू ; पण झाड म्हणजे, या सगळ्या झाडांना जर का आपण एक नाव वापरत असू, तर त्याला काही कारण आहे आणि त्याचा अर्थ, या नावाचा नेमका अर्थ, या साध्या शब्दाचा अर्थ दोन वेगवेगळ्या लोकांच्या डोक्यात वेगवेगळा आलेला आहे.

मला इतकंच सांगायचं आहे की हा जो communicationचा process आहे, त्याच्यामध्ये interpretation आहे आणि हे interpretation फार फसवं असतं.

आता संगीताकडे वळा आणि transmitter म्हणजे तुम्ही म्हणाल की कुणाचातरी सुरेल आवाज आहे, गळ्यातून निघणारा अथवा कुठल्या वाद्यातून निघणारा तो आवाज असेल. तो त्याने त्याच्या भाषेत मांडलेला आहे. सांकेतिक भाषा याचा अर्थ symbol एवढाच मला अभिप्रेत आहे. code म्हणजे, उदाहरणार्थ झाड हा शब्द आहे. शब्द हे सगळे symbols आहेत. Symbols शब्दाचा अर्थ परत वर्णन करतो.

रस्त्यातून जात असताना आपल्याला तांबडा दिवा दिसला तर त्याचा अर्थ 'थांबा' असा आपण घेतो. का बरं ? तर सांकेतिक दृष्ट्या आपल्या समाजामध्ये असं ठरलेलं आहे की तांबडा दिवा याचा अर्थ 'थांबणं' ; आणि हिरवा दिवा याचा अर्थ 'रहदारी चालू

करणं'. याचा अर्थ तांबडा रंग आणि हिरवा रंग रहदारीच्या संदर्भामधे symbols आहेत. त्यांना काही सांकेतिक अर्थ आहे. ज्या माणसाला तो अर्थ समजत नाही त्याला वाटेल, ही माणसं अशी एकदम वेड्यासारखी का बरं थांबली? कारण, तांबडा रंग म्हणजे 'थांबा' हे त्याला माहीत नसतं, त्याचा symbolic अर्थ त्याला कळत नाही. तेव्हा symbol चा अर्थ मी असा सांगेन: Anything which stands for anything else is a symbol. किंबहुना 'Stop' आणि Go ही सुद्धा symbols आहेत. सगळी भाषा ही symbol च आहे आणि आपण लहानपणापासून ती शिकत असतो. तर, Communication process मध्ये वेगवेगळी प्रतीकं आपण वापरतो. कवी आपल्या दृष्टीनं शब्द वापरत असतो आणि बरेच वेळा कवी जे लिखाण करत असतो त्याचा आपल्याला अर्थ कळत नाही. मग कोणी म्हणायला लागतात की 'दुर्बोधता हेच मुळी नव-वाङमयाचं व्यवच्छेदक लक्षण आहे.' आणि मग कुणीतरी त्याच्यावर लिहितं: 'मुख्यार्थाची कैफियत'. तर सारांश, मला काय सांगायचंय की communication च्या process मध्ये interpretation अंतर्भूत झालेलं आहे. मी तुम्हाला communicate करू इच्छितो, मग ते कुठल्याही कलेच्या मार्फत असेल, संगीत असेल, नृत्य असेल. कारण, नृत्यात सुद्धा 'संकेत' आहेत. दक्षिणी तऱ्हेचं नृत्य असतं की नाही, केरळाकडचं कथकली नृत्य, त्याच्यामधे काही संकेत आहेत. ते जे हात असे करतात, त्याचा जर आपल्याला अर्थ माहित नसेल तर आपल्याला वाटतं, हे काय आहे? मला हे समजू शकत नाही. साधी गोष्ट आहे. ते ज्याचे symbols आहेत, ज्याच्याकरता त्या गोष्टी वापरल्या जात आहेत, त्याचा आपल्याला अर्थ कळत नाही म्हणजे शेवटी 'अर्थ कळणं' ही फार महत्वाची गोष्ट आहे.

हे आज मी तुम्हाला इतक्या विस्तारानं सांगण्याचं कारण असं की मला कालचं व्याख्यान झाल्यानंतर फार थोड्या लोकांशी बोलायची संधी मिळाली. एकाशी मिळाली, खूप वेळ मिळाली आणि त्यातून माझ्या असं लक्षात आलं की हा जो communication चा process आहे तो मी जितक्या विस्तृतपणं सांगायला पाहिजे होता तितक्या विस्तृतपणं सांगितलेला नाही आणि प्रा. रानड्यांनी तो थोडक्यात सांगितला होता पण तो आज परत सांगतोय.

सांगण्याचं कारण असं की जर आपल्यापुढं अजून असा प्रश्न असेल की संगीत आणि मानसशास्त्र यांचा संबंध काय? तर याला एक उत्तर असं देता येईल की संगीत ही एक कला आहे, ती सामाजिक कला आहे, म्हणजे दुसरी माणसं त्यात involve झालेली आहेत. गाणारा व ऐकणारा. आणि त्यामुळे ते एकाकडून दुसऱ्याकडे जाणारं असं communication आहे. आणि दोन माणसांतले किंवा अनेक माणसांतील ते communication असल्यामुळे माणसांचे मनोव्यापार, त्याचं शास्त्र, ह्यांचा आणि कुठल्याही कलेचा अत्यंत निकटचा संबंध आहे. आता मी तुम्हाला communication process बद्दल सांगताना महत्वाची अशी एक संकल्पना आज सांगणार आहे आणि ती संकल्पना म्हणजे perception. त्याला मराठीत 'संवेदन' म्हणतात. त्याचा अर्थ काय, हाच आज आजच्या व्याख्यानाचा मुख्य उद्देश आहे. तेव्हा आपण त्याचा थोडा आढावा घेऊ. perception ला मी संवेदन असा शब्द वापरतो. कोणी 'बोधना' असाही वापरतात. पण रूढ शब्द आता 'संवेदन' असा झालेला आहे. आता आपण बघूया की perception म्हणजे काय?

Perception हा असा एक शब्द आहे की त्याच्याशी तुमचा सर्वांचा परिचय आहे. सामाजिक शास्त्रांचे हे दुर्दैव आहे की आम्ही जे शब्द वापरतो ते आपणा सर्वांना माहीत असतात. अर्थशास्त्र असेल, राज्यशास्त्र असेल, मानसशास्त्र असेल, ते असे शब्द वापरतं की ज्यांचे अर्थ आपल्याला माहीत आहेत. परंतु त्या त्या शास्त्रांमधे त्यांना काही विशिष्ट अर्थ देण्यात आलेले आहेत. म्हणजे त्यांची व्याख्या केली आहे. Definition च तशी आहे. त्यामुळे बरेचवेळा आम्ही काय बोलतो हे जगाला कळत नाही. म्हणून आम्हाला प्रथम आम्ही शब्द कोणत्या अर्थाने वापरतो हे सांगावं लागतं. Perception हा एक असाच शब्द आहे. आपल्याला बहुधा वाटतं, perception म्हणजे डोळ्यामधून होणारं ते perception. Perceive म्हणजे to see असा अर्थ डिक्शनरीत आपल्याला सापडेल आणि म्हणून कोणाला वाटेल की हा गृहस्थ आता काहीतरी डोळ्यातून निघणाऱ्या संवेदनेबद्दल बोलत असेल. हे बरोबर आहे. पण याच्यापेक्षाही विस्तृत अर्थ perception या शब्दाला मानसशास्त्रात आहे. मानसशास्त्रात perception हा शब्द फक्त 'दृश्य संवेदना' म्हणजे डोळ्यातून येणाऱ्या संवेदनांपुरता मर्यादित नाही तर, कोणत्याही ज्ञानेंद्रियामार्फत आपल्याला बाह्य वस्तूंचं आणि घटनांचं आणि व्यक्तींचं जे ज्ञान प्राप्त होतं, या ज्ञानप्राप्तीच्या मार्गाला 'perceptual process' किंवा 'संवेदनेची क्रिया' असं म्हणतात. उदाहरणार्थ कानावर संगीत येणं हे सुद्धा perception आहे. तुम्हाला असं वाटेल की हा perception शब्द कानाच्या बाबतीत कसा लावला? मानसशास्त्रात लावला. त्याची व्याख्या आम्ही अशी केलेली आहे: त्वचेमार्फत आपल्याला थंड, मृदू, दुःख, velvet चा स्पर्श, इत्यादी ज्या वेगवेगळ्या तऱ्हेच्या संवेदना होत असतात, त्यांनाही आम्ही मानसशास्त्रात perception म्हणतो. म्हणजे एखाद्या चांगल्याशा टेरेलिनच्या कापडाला हात लावून आम्ही असं म्हणू: 'How do you perceive the texture of it? सर्व ज्ञानेंद्रियांमार्फत आपल्याला बाह्य वस्तूंचं जे ज्ञान प्राप्त होतं, त्या प्रक्रियांना 'perceptual processes' असं म्हणतात. आणि जन्माला आलेल्या मुलाला हळूहळू या बाह्य घटनांचं ज्ञान व्हायला लागतं. पहा, जन्माला आलेल्या मुलाला 'आई' म्हणजे काय हे माहीत नसतं, तर ते त्याला शिकायचं असतं. परत परत जी व्यक्ती दूध देते, परत परत जी व्यक्ती अंगाखांद्यावर खेळवते, हसते, जवळ येते, कडेवर घेते ती व्यक्ती हळूहळू ओळखीची होऊ लागते. 'ओळखणं' म्हणजे एक व्यक्ती कायम डोळ्याने बघून, ऐकून, मग वय वाढल्यानंतर 'आई' हा शब्द शिकणं, म्हणजे आम्ही असं म्हणतो की आता; The child has started perceiving the woman as a mother. किंबहुना जन्माला आलेल्या मुलाकडे आपण पाहिले तर आपल्या लक्षात येईल की त्याला बाह्य वस्तूंचे, व्यक्तींचे ज्ञान नसतंच. त्याला ज्ञान कसं असू शकेल? ज्ञान त्याला मिळवायचं आहे. मग त्याच्या जवळ असतं काय? त्याला डोळे असतात, त्याला कान असतात, त्याला त्वचा असते, त्याला रुची असते. त्यामार्फत त्याच्यावर जे चेतक मारा करत असतात, त्यामधून त्याला जे जाणवतं त्याला मानसशास्त्रात 'वेदन' असं म्हणतात.

पहा, आता मी नवा शब्द तुम्हाला सांगितला: 'वेदन'. इंग्रजीमध्ये त्याला sensation असं म्हणतात. मी sensation आणि perception ह्यांमधे फरक करत आहे, तो artificial फरक आहे, कृत्रिम आहे. मग वेदन म्हणजे काय? 'आपल्या

वेगवेगळ्या ज्ञानेंद्रियांवर जे अनेक चेतक मारा करत असतात त्यांमार्फत आपल्याला जी अत्यंत प्राथमिक स्वरूपाची जाण होते, तिला 'वेदन' असं म्हणतात. आणि म्हणून मी लहान मुलाचं उदाहरण घेतो. लहान मुलापुढं तुम्ही एखादा राग गायलात तर त्याला राग किंवा संगीत असं काही कळणार नाही. ते कान टवकारील. कारण कर्णेंद्रियावर काही ध्वनि-लहरींनी चेतकांच्या सारखा मारा केल्यानंतर तिकडे लक्ष आकृष्ट होईल. पण त्याचा 'अर्थ' त्याला अजून कळलेला नाही. तो त्याला शिकावा लागेल. एवढच काय, वस्तूंचा सुद्धा अर्थ त्याला काही कळत नाही. हळूहळू चेंडू, दुधाची बाटली, दूध, माणसं हे सगळं तो शिकत असतो. म्हणजे आपण असं म्हणूया की आपल्याला सभोवतालचं जे ज्ञान असतं, जे आपण ज्ञान मिळवलेलं आहे, त्याचं जर आपण building-blocks काय आहेत, त्या कुठल्या विटा आहेत त्यांची सामग्री काय आहे याचा विचार केला तर आपल्या सर्व ज्ञानाची, आपल्या सर्व अनुभवाची (मग तो अनुभव संगीत ऐकण्याचा सुद्धा असेल, Art बघण्याचा असेल,) कुठल्याही अनुभवाची अत्यंत मूलभूत अशी साधने किंवा सामग्री काय असेल तर ती म्हणजे 'वेदन'. आणि वेदनाच्या नंतरची जी स्थिती असते त्याला आपण 'संवेदन' किंवा 'बोधना' असे म्हणतो. वेदनामध्ये आणखी काहीतरी होणं आवश्यक आहे म्हणजे त्यामुळे आपल्याला एखाद्या वस्तूची संवेदना किंवा ज्ञान प्राप्त होतं. ते काय? वेदनेचा ज्यावेळेला आपण काहीतरी 'अर्थ' लावतो, तेव्हा त्याला perception ही संज्ञा मिळते व sensation चं रूपांतर perception मध्ये होतं. म्हणजे, 'perception is meaning added to sensation' असं म्हणण्यात येतं.

असं बघा, बाहेर काहीतरी आवाज होणं—ज्याला noise म्हणतो आपण, ती एक गोष्ट झाली. तो जो noise असेल, ते केवळ 'वेदन' झालं. पण आकाशातून काहीतरी आवाज आला. 'अरे, हा विमानाचा आवाज आहे.' म्हणजे आपल्या कानावरती जे चेतक मारा करतात, त्या चेतकांमार्फत ध्वनिलहरींचं आपल्याला ज्ञान होतं. त्या ज्ञानामार्फत आपण नुसतं एवढंच म्हणत नाही की 'काहीतरी ऐकू येतंय', पण आपण म्हणतो, 'अरे हा विमानाचा आवाज दिसतोय'. ज्याला या गोष्टीची जास्त जाण असेल, अनुभव असेल तो एखादेवेळी म्हणेल की 'हे अमक्या तऱ्हेचं विमान, डाकोटा दिसतंय—हे तमक्या तऱ्हेचं विमान दिसतंय.' म्हणजे, तो त्या आवाजामार्फत वेगवेगळे अर्थ लावतो. आणि त्याची जी वेदन होती, sensations होती, 'auditory sensations', त्यांच्यामधून आता संवेदन प्राप्त झालं म्हणजे त्यांना अर्थ आला, 'हा विमानाचा आवाज'!

आपल्याला माहीत आहे की आपण एकदा माणसं ओळखायला लागलो की त्यांची 'चाल' आपल्याला कळते. 'चाल' म्हणजे चांगल्या अर्थाने मी शब्द वापरतोय, 'चाल-चलवणूक' म्हणत नाही. मनुष्य चालत असताना त्याच्या पायाचा, चपलांचा, गतीचा एक विशिष्ट आवाज होतो आणि आपली नेहमीची माणसं आहेत असं आपल्याला कळतं. दार बंद असतानाही, 'अरे, हा माझा मित्र आलेला दिसतोय. चपला फट्फट वाजत आहेत. तो जिना पहा कसा होतोय. नक्की आला.' आता, वस्तुतः माझ्या कानावर काय आलं? कोणी सांगितलंय मला, माझा मित्र आलाय? माझ्या कानावरती काही वेदनं येऊन थडकली.

पण त्या वेदनांचा मी अर्थ लावला. त्या वेदनांचं मी interpretation केलं. म्हणजे मला आता हे communication झालं. त्याच्या चपलांच्या फट्फट् आवाजावरून तो मला काही communicate करतो आहे. हे त्याला बिचाऱ्याला माहीतही नसेल एखादेवेळी.

संगीतज्ञ वेगवेगळ्या तऱ्हेचे आवाज करतात, हातवारे करतात, स्टेजवरती असताना, त्यांना माहीत असेल नसेल, पण जो समोर प्रेक्षकवृंद बसलेला आहे, तो त्याचा काहीतरी अर्थ लावतोय. कदाचित हा अर्थ लावला जावा, अशी गाणाऱ्याची इच्छाही नसेल. परंतु काहीतरी अर्थ तो माणूस लावत आहे. कारण, माणसांचा एक असा, असा स्वभावधर्म आहे की आपण नुसतं वेदन घेऊन स्वस्थ बसत नाही.

आता, एक महत्त्वाचा नियम मी तुम्हाला सांगतोय की आपण जे जे काही बघत असतो, डोळे उघडले, कान उघडे ठेवले की या सगळ्यांमार्फत आपल्यावरती जे चेतक मारा करतात त्याचा काहीतरी अर्थ लावणं अशी आपली सारखी धडधड असते. मनुष्याच्या ज्ञानमार्गाबद्दल, ज्ञानेंद्रियांमार्फत मिळणाऱ्या संवेदनांबद्दल असं म्हणता येईल की आपली सगळी धडपड ही काहीतरी अर्थ लावण्यासाठी अशी असते. तो चुकीचा लागला तरी चालेल, पण नुसतं बसलेलं आपल्याला आवडत नाही. काही आवाज झाला की चटकन् खिडकीतनं जाऊन बघून 'काही accident तर नाही ना? हो, accident च दिसतो!' असं आपण काहीतरी म्हणणार. आपल्याला समोर आलेल्या गोष्टींचं ज्ञान व्हावं, त्यांचा अर्थ समजावा, कळावा, अशी आपली धडपड असते. म्हणजे perception हे नेहमी meaningful असतं आणि तो अर्थ आपण लावत असतो. Perception is always organized. पहा, मला काय म्हणायचंय. जे जन्माला आलेलं मूल आहे, त्याच्यावरती अनंत चेतक मारा करत आहेत आणि त्याच्याबद्दल असं म्हणण्यात येतं की for a child it is a confusing mass of sensations. He is immersed in an ocean of sensation. त्याला एखाद्या समुद्रात, वेदनाच्या समुद्रात ढकलून दिलेलं आहे. कुणी लोक ओरडतात, कुणी त्याच्या अंगाशी चाळा करतात, कुणी त्याला उचलून घेतात. त्या बिचाऱ्याला काहीच कळत नाही. त्याला वेदनं आहेत, अनंत तऱ्हेची वेदनं त्याला आहेत. परंतु त्याच्यात अजून संवेदन जन्माला यायची आहेत, तो मोठा व्हायचा आहे आणि हे करत असतांना मग हळूहळू आपण त्याच्या पाळण्यावरती जर काही रंगीबेरंगी टांगलं तर त्याची दृष्टी त्याच्याकडे जायला लागते. हळू-हळू सभोवतालच्या या पार्श्वभूमीवर काहीतरी रंगीत हलणारं, ज्याला आपण 'खेळणं' म्हणतो. त्याला फक्त एक पार्श्वभूमी आणि वरती काहीतरी असं आता त्याला एक संवेदन व्हायला लागलेलं आहे. तेव्हा perception या शब्दाचा आम्ही असा अर्थ लावतो की बाह्य जगताकडून आपल्यावरती जे चेतक मारा करत असतात, त्यातून आपण नुसतं 'वेदन' निर्माण करत नाही तर त्यातून आपण काहीतरी अर्थ लावतो आणि तो अर्थ म्हणजे 'अर्थासहित असलेलं वेदन' म्हणजेच 'संवेदन' किंवा त्याला कुणीकुणी perception म्हणतात. वस्तुतः आपण जी मोठी माणसं आहोत ना, त्यांना कधी प्रायः वेदन होत नाही. क्वचित होतं. कारण जे काही चेतक आपल्यावर मारा करतात, त्यांच्यामार्फत आपण काहीतरी अर्थ लावतो. मी लहान मुलाचं उदाहरण घेतलं, कारण

त्यावरून कळतं की sensation आणि perception ह्यांच्यातला फरक काय ? मोठ्या माणसाच्या बाबतीत जर तुम्ही विचाराल, त्याला कधी वेदनाचा अनुभव येतो काय ? वेदन म्हणजे pain नाही; sensation. वेगवेगळ्या ज्ञानेंद्रियांवरती जो चेतकाचा आघात होतो त्यातून निर्माण होणारी बोधना. तर असं म्हणू आपण, समजा, जर एखाद्या नवीन ठिकाणी एखाद्या दिवशी आपण झोपलो, काही कारणामुळे, आणि सकाळी जागे झालो, तर प्रथम आपण जेव्हा उठतो त्यावेळेला आपल्याला चटकन अर्थ उमजत नाही. आपली जी नेहेमीची खोली असते, नेहेमीची खिडक्यादारं, वगैरे ही आपल्याला दिसत नाहीत, आणि क्षणभर आपण म्हणतो, 'अरे, हे काय आहे ?' आणि मग आपल्याला आठवतं की 'अरे, आपण आज दुसरीकडे झोपलेलो आहोत.' म्हणजे एक क्षणभर का होइना, आपल्याला वेदनं जाणवतात आणि मग अर्थ कळतो, 'अरे, बरोबर ! ही नवीन खोली आहे. मी काल इथं झोपलो होतो, नाही का ?' म्हणजे काय झालं ? डोळे उघडल्याबरोबर आपल्याला जी नेहमीची सवय आहे की सभोवतालच्या जगाचा अर्थ समजणं, ती थोडावेळ का होइना, थबकली.

आता, आपण संवेदनेचा अभ्यास एवढा केल्यानंतर संवेदनेचं कार्य आपल्या जीवनात आणि विशेषतः कलांमधे, विविध कलांमधे काय आहे, याचा थोडासा विचार करू या.

आजचा मुख्य विषय संवेदना हा आहे, perception हा आहे आणि मी जास्त लक्ष श्रुतिसंवेदनेवरतीच देणार आहे. आता आपण असे बघू या की हा जो perceptual response आम्ही म्हणतो, बोधना आपल्याला झाली. संवेदना झाली, ती कशामुळं झाली ? म्हणजे आपण जर असं एका बाजूला 'प्रक्रिया' किंवा response असं लिहिलं आणि एक formula द्यायचा प्रयत्न केला की, response is equal to किंवा response is determined by, is evoked by, is dependent on, is caused by, तर perceptual response हा कशामुळं दिला जातो ? आपल्याला बोधना कशामुळं होते ? कशा प्रकारची होते ? तिथं काही नियम आहेत का ? हे बघण्याचा आपण प्रयत्न करू या आणि अगदी ढोबळ अशा अर्थाने तुम्हाला मी एक equation देतो. याचा एक अर्थ function. जे mathematics शिकलेले आहेत त्यांना function म्हणजे काय ते कळेल. response is dependent upon (1) stimulus—चेतक. मला काय बोधना होइल, ही एक गोष्ट म्हणजे, बाहेर काय तऱ्हेचे चेतक माझ्यावर आदळतात त्याच्यावर अवलंबून राहील. आणि त्याहीपेक्षा दुसरी गोष्ट म्हणजे, O म्हणजे Organism, 'जीव' म्हणजे 'मी' कशा तऱ्हेचा आहे, मी काय आहे, माझ्यातील काही घटक. थोडक्यात म्हणजे, मला होणाऱ्या संवेदना—response हा इथे संवेदना आहे—त्या कशामुळे होतात किंवा त्या कशामुळे ठरतात ? याचं उत्तर एक म्हणजे, माझ्या ज्ञानेंद्रियावर कशा तऱ्हेचे चेतक आदळत आहेत, sensation काय आहे ? stimuli काय आहेत ? आणि दुसरी गोष्ट, माझ्यामधे काही घटक आहेत, 'मी ही अशी व्यक्ती की जिच्यामध्ये काही घटक अंतर्भूत झालेले आहेत, की ज्यामुळे माझी संवेदना आकार घेते आणि आज आपण जे हे सूत्र तुम्हाला दिलेलं आहे त्याचा क्रमाक्रमानं अभ्यास करणार आहोत. एकदा stimulus-factors चा विचार करू, एकदा organic factorsचा विचार करू.

'S' stands for stimulus—चेतक. वेगवेगळे चेतक, ज्ञानेंद्रियांवर आदळलेले. प्रकाश हा चेतक आहे. वारा हा चेतक आहे. ध्वनिलहरी हा चेतक आहे. थोडक्यात म्हणजे, मला संवेदना कशी होईल ? ह्याचं उत्तर असं : एक म्हणजे बाह्य उद्दीपक कोणते आहेत आणि माझी स्थिती काय आहे, यावर अवलंबन राहील. आता ह्याच्याकरिता मी तुम्हाला आणखी एक छोटंसं सूत्र सांगणार आहे. ते सूत्र अगदी भगवद्गीतेतील शब्द आहे म्हणजे चांगलं लक्षात राहील अशा रीतीनं लेखकानं मांडलेलं आहे. सं जी आणि व. आता, पहा संजीव म्हणजे काय ? हे जे 'सं' आहे, ह्याचा अर्थ 'संपर्क'. बाह्य जगताशी मनुष्याचा संपर्क साधतो. कलेमार्फत होतो, संगीतामार्फत होतो, बोलण्यामार्फत होतो, स्पर्शा-मार्फत होतो. कुठल्या ना कुठल्यातरी ज्ञानेंद्रियामार्फत आपला भोवतालच्या जीवनाशी संपर्क साधला जातो. 'जी' म्हणजे जीव,—Organism. आणि व म्हणजे 'वर्तणूक'. मी काहीतरी करतो. हा माझा response आहे. तेव्हा मनुष्याच्या वर्तणुकीचे, कुठल्याही बाबतीतल्या वर्तणूकीचं सूत्र हे जगाशी काहीतरी संपर्क साधणं. तो जीवाने साधलेला संपर्क आहे. त्याला इंग्रजीमधे 'SOR' असं म्हणतो. 'S' म्हणजे stimulus, 'O' म्हणजे Organism आणि R म्हणजे Response.

एवढं बघून आता आपण perception कडे वळू या. आणि हे S व O factors काय आहेत याचा थोडासा सखोल विचार करू या.

आता, आपलं perception, आपली संवेदना ही या दोन घटकांमुळे कशी तयार होते ह्याचं वर्णन मी करणार आहे. प्रथम आपण stimulus factors म्हणजे उद्दीपकात अंतर्भूत असलेले घटक कोणते, आपली संवेदना ठरवण्यामधे, याचा अभ्यास करू या.

थोडक्यात म्हणजे, मला काय बोधना होईल, मला काय संवेदना होतील ? याला एक घटक असा असतो की माझ्या जगात भोवताली काय तऱ्हेचे चेतक आहेत ? मला काय दिसेल, मी काय पाहीन, हे त्या चेतकांच्यामुळं ठरवलं जातं. एक नियम असा आहे की ज्या गोष्टी जवळ असतात, निकट असतात त्या एकत्र बांधण्याची, बघण्याची आपली धडपड असते, अगदी साहजिकपणे, नैसर्गिकपणे. ज्या गोष्टी एकमेकांच्या जवळ असतात त्यांना एकत्र बघण्याकडे आपला कल असतो.

कारण आपण जे बघतो, आपल्याला जी बोधना होते, ती आपल्या चेतकांच्यामुळे किंवा चेतकाच्या स्वरूपामुळे ठरलेली आहे. संगीतातसुद्धा ह्याला महत्त्व आहे. संगीतात, रानडे तुम्हाला कदाचित सांगतील की दोन स्वर एकमेकांजवळ असणं म्हणजे त्यांचा अबाधित संबंध आपण लावतोय, ऐकणारा लावतो. ते एकमेकांच्या जवळ आहेत. म्हणजे, जवळीक असणं. ही जवळीक दोन प्रकारची असते कां ? एक जवळीक म्हणजे 'स्थलाची जवळीक', स्थलात असलेली जवळीक. आणि कालावरती अवलंबून असलेली सुद्धा जवळीक असू शकते. जी संगीतात असते. एका स्वरानंतर येणारा दुसरा स्वर हा किती नजिक आहे ? रानडयांच्या पुस्तकात त्यांनी उदाहरण दिलेलं आहे ; की आज आपण एक स्वर लावला आणि दोन हजार एक साली दुसरा लावला तर त्यांचं एकमेकाशी काही नातं

सापडणं कठिण आहे. म्हणजे, जर एकमेकाशी relationship असायला हवी असेल, किंवा relationship निर्माण होत असेल तर 'जवळ असलेले चेतक आपण एकत्र बघतो' हा त्याचा नियम आहे आणि जवळीक ह्याचा अर्थ दोन तऱ्हेचा, एक स्थल व दुसरा काल या विषयाचा असतो. मी हे चेतकांबद्दलचे नियम फक्त सांगतो आहे आणि आपली संवेदना ही चेतकांच्या स्वरूपावरून ठरते बऱ्याच वेळेला. आणि हे त्याचं एक उदाहरण आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे 'साम्य'. म्हणजे ज्या गोष्टी सारख्या असतात, जे चेतक सारखे-सारखे असतात, ते एकमेकांशी बांधलेल्या स्थितीत पाहण्याकडे आपला कल असतो. समजा, मी जर असं काही drawing काढलं, तर साहजिकच अशी वृत्ती असते बघण्याची, बऱ्याच लोकांना जर विचारलं तर ते म्हणतील ही एक रेघ आहे, ही एक रेघ आहे, ही एक रेघ आहे. हा एकत्र 'बंध' बांधण्याकडे आपली वृत्ती असते. कारण त्याच्यात काहीतरी साम्य आहे. वस्तुतः अशीसुद्धा एक line आहे असं म्हणता येईल. आणि नीट पहात गेलो तर त्या सुद्धा linesच आहेत. पण चटकन् बघणाऱ्याला मात्र ती गोष्ट एकासारखी एक आहे आणखीन् लायनीमधे आहे, म्हणजे आपण ह्याच्याकडे row म्हणून बघण्यापेक्षा colomn म्हणून बघण्याकडे आपला कल होतो. कारण त्या रीतीनेच ते चेतक काढलेले आहेत. stimulus अशा organize केलेल्या आहेत, त्या चेतकांचं natureच असं आहे की ज्यामुळे माझी संवेदना काय होईल हे त्याप्रमाणे ठरतं.

दुसरी गोष्ट, काहीतरी 'पूर्णत्व' आणण्याकरता माणसाची धडपड असते. पूर्णत्व असावं एखाद्या गोष्टीला, completion म्हणतात त्याला, त्याकडे आपली धडपड असते. त्यामुळे 13 असं जरी मी काही काढलं, तरी तुम्ही 'तेरा' किंवा कदाचित नीट काढलं तर 'B' असा अर्थ घेऊ शकाल त्यातून; जरी ती एकमेकाला touch केलेली नसली तरी. आपण जी गोष्ट बघतो, त्यामध्ये काहीतरी 'पूर्णत्व' आणण्याचा आपण प्रयत्न करतो. अपूर्ण असेल तर ते आपण पूर्ण करतो. चित्रकलेतल्या बऱ्याच गोष्टी याच्यावरती अवलंबून असतात. तुम्ही नीट न्याहाळून पहाल तर तुम्हाला कदाचित् कळेल की रेघा काही सगळ्या पूर्ण दाखवलेल्या नाहीत. ते पूर्ण करण्याचं, त्याच्यातून आकृती तयार करण्याचं काम आपण करत असतो. कारण आपली संवेदनेची क्रियाच अशी आहे की काहीतरी पूर्णत्व त्यात असावं, त्यात काहीतरी pattern असावा अशी आपली धडपड असते. ती संगीतात असणारच. ज्या काही स्वरांचा तुम्ही त्याच्यावरती आघात कराल, जे चेतक म्हणून वापराल, त्याच्यातून आकृतिबंध करण्याचा मनुष्य प्रयत्न करत असतो. त्याचा योग्य रीतीने उपयोग करून घेता येतो. चित्रकलेत तो मोठ्या रीतीने करून घेतलेला आहे. कारण, काहीतरी gap ठेवलेली आहे, आणि ती बुजवण्याचं काम हा प्रेक्षक करीत असतो. हे एक तिसरं principle आहे असं म्हणता येईल.

चौथं principle म्हणजे, जे काही आपण बघतो त्याला काहीतरी अर्थ असावा, चांगलेपणा असावा असाच आपला बघण्याचा कल असतो. म्हणून कितीही वेडंवाकडं काहीतरी काढलेलं असेल तरी त्याला काहीतरी एक सुबक आकृती आहे असं बघण्याकडे आपला कल असतो.

अशी ही तत्त्वं आहेत; ती उद्दीपकाच्या स्वभावाबद्दलची तत्त्वं आहेत. उद्दीपक म्हणजे stimuli किंवा चेतक, त्यांची रचना, त्यांचे बंध, आकृतिबंध कसे करावेत याचा जर आपण नीट अभ्यास केला, तर या तत्त्वाप्रमाणे तुमच्या संवेदना मी control करू शकतो. मग मी असं म्हणू शकेन की मी काही गोष्टी जवळ काढल्या आहेत त्यामुळे एकमेकांशी related असंच पाहणार तुम्ही. जर साम्य असेल त्यामध्ये, तर तुम्ही ते साम्य बघणार.

आता आपण थोडीशी वेगळी कल्पना घेऊ या. मी तुमच्यापुढं एक अगदी साधं असं drawing काढणार आहे. Drawing म्हणायला धजावत नाही, चित्र, रेखोटया काढणार आहे. तुम्ही सगळ्यांनी ते बघा. आणि तुम्हाला काय वाटलं ते मला सांगा. मी अनेक श्रोतृवृंदापुढं अशा तऱ्हेचं चित्र काढलं आहे. आणि प्रत्येक वेळेला मला वेगळं responses मिळाले आहेत. कारण, मला दाखवायचंय असं की मी जे काढतो ते एक आणि त्याचा तुम्ही जो अर्थ लावता, म्हणजे तुम्हाला जी perceptions आहेत, तुमच्याजवळ बोधना आहे ती कशी वेगळी असू शकते बघा.

हे अगदी साधं चित्र झालं. आता मला सांगा एकेकजण, तुम्हाला हे ×× काय वाटतंय? तुम्हाला वाटेल ते सांगा. तुम्हाला काहीच वाटत नाही का? काय काढलंय मी असं तुम्हाला वाटतंय?

एक श्रोता: एखादा अपुरा राहिलेला काठ असावा असं वाटतं.

प्रा. फडके: हे पहा, नवीन response आहे हा मला मिळालेला, या audience पुढं. स्त्रीकडून हं, स्त्रीकडून आलेलं उत्तर आहे. बरोबर आहे. आणि कुणीतरी..?

दुसरा श्रोता: लाकडाचा खुंट आहे.

फडके: बरोबर आहे. असे खुंटही असतात. हा जास्त material आणि उपयुक्त आहे. हे दोन्ही responses मला नवीन आहेत.

तिसरा श्रोता: Two crosses.

प्रा. फडके: पहा, ह्यांनी जे सांगितलं ते मी अनेकवेळा अनुभवलं आहे, कारण मी मी काढतानाच मुळी दोन cross काढतो आणि माझ्या movements ज्यांनी पाहिल्या आहेत त्यांना वाटतं, हा दोन crosses काढतोय, आणि हे उत्तर आलं.

चौथा श्रोता: दोन नर्तक दिसताहेत त्याच्यामधे.

प्रा. फडके: नर्तक दिसतायत? सांगा, कुठंकुठं आहेत ते?

तोच श्रोता: फक्त दोन crossच्या मध्ये zero टाका. दोन नर्तक नाचताना दिसतील तुम्हाला.

प्रा. फडके : ठीक आहे. म्हणजे बघा त्यांची संवेदना असं करू शकली. Interpretation आहे ते. (प्रा. रानडे : पूर्ण केले.) पूर्ण केलं. मनानं ते पूर्ण केलेलं आहे. आणि काही ? हे तीनही responses नवीन आहेत. हे खुंट, हा काठ, आणि हे नर्तक.

पाचवा श्रोता : मला 'मज्जाव' वाटतो.

प्रा. फडके : हा त्यांनी कुठेतरी रेल्वेत पाहिलय. धूम्रपान निषिद्ध आणि × केलेला असतो त्याच्यामधे correct अर्थ आहे. त्यांनी अर्थ लावला आहे ह्या cross चा : 'मज्जाव'.

सहावा श्रोता : Angles.

प्रा. फडके : कसले angles ? There are many angles.

प्रा. रानडे : असं म्हणूया की मधे एक शंकरपाळी आहे आणि दोन बाजूंना दोन अर्धी आहेत.

प्रा. फडके : आहे. असा response दिलेला आहे मला. मला आणखी rariety पाहिजे आहे. Imagination ही creative लोकांत जास्त असली पाहिजे. सांगा.

सातवा श्रोता : एक आख्खा त्रिकोण आहे.

प्रा. फडके : त्रिकोण. बरोबर आहे.

आठवा श्रोता : जाळी आहे.

प्रा. फडके : जे लोक ब्रिज खेळतात ना, त्यांनी मला सांगितलं होतं की हा एक चौकट आहे व त्याला दोन कल्ले आहेत. ते बहुधा सारखे पत्त्यांत रममाण झालेले जीव असावेत. अजून काही ?

नववा श्रोता : एक W आणि एक M आहे.

प्रा. फडके : correct . हा response मला मिळालेला आहे.

दहावा श्रोता : अर्धवट बांधलेला कंदील आहे. आकाशदिवा आहे.

अकरावा श्रोता : उलट सुलट V आहे.

प्रा. फडके : बरोबर आहे. हा response मिळालेला आहे. ही एक V आहे आणि त्यावर उपडी घातलेली एक आहे. बोला बोला.

बारावा श्रोता : दोन डोंगर एकमेकावर उपडे ठेवलेले आहेत.

प्रा. फडके : तेच ते. त्यांनी V सांगितले, तुम्ही डोंगर म्हणताय.

पहा, म्हणजे किती झालं. M त्याच्यामधे आहे, चौकट आहे, त्याला कल्ले आहेत, रेल्वेचं फाटक होऊ शकेल, कुणी बागेचं compound सांगितलं आहे, कुणी खुंट सांगितला आहे. अनंत गोष्टी या दोन त्रिकोणात ; कुणी गुणाकाराची दोन चिन्हं सांगतात कारण ती काढतानाच तसं काढतो.

थोडक्यात म्हणजे, तुमच्यापुढे मी जे चेतक मांडले, ते सगळ्यांना एकच आहेत, फळ्यावरती काढलेला हा एकच चेतक आहे. पण त्यातून जे तुम्हाला संवेदन झालं, तुम्हाला जो अर्थबोध झाला तो किती वेगवेगळ्या रीतीचा आहे, तो कुठल्या कुठल्या वेगवेगळ्या तऱ्हांनी ठरवलेला आहे हे सांगण्याकरता हे मी उदाहरण घेतलं.

मी आतापर्यंत, फक्त stimulus factorsबद्दल बोलत होतो. त्यांची जवळीक, closureची tendency, structural factors म्हणतो आम्ही त्याला. structure stimulus कसलं ? माझ्याबाहेर असलेलं structure आणि त्याच्याकरता हे उदाहरण घेतलं. म्हणजे, माझी संवेदना ही माझ्यात असलेल्या काही घटकांमुळं तयार झालेली आहे. ते घटक कुठले ?

पहिला घटक असा की माझ्या ज्या गरजा असतात किंवा माझ्या ज्या needs असतात, माझ्या ज्या प्रेरणा असतात, त्याप्रमाणे मी सगळं जग बघत असतो. हे अगदी सामान्य ढोबळ तत्त्व मी तुम्हाला सांगतो. आपण म्हणतो ना, 'मनी वसे ते स्वप्नी दिसे', तसा प्रकार आहे हा. जे आपल्याला सारखं हवं असतं ते आपण बघत असतो. त्याला आम्ही इंग्रजीमधे म्हणतो की perception is a functionally organizased pattern. त्याचं तुम्ही काहीतरी organization बनवलंत तुमच्या मनात. ते functionally selective आहे किंवा functionally organised. ह्याचा अर्थ, that serves some function in your life. त्याच्यामार्फत तुमच्या जीवनात काहीतरी कार्य साधण्यात येतं. हा जो मुद्दा आहे, तो एका छोटयाश्या प्रयोगावरून तुम्हाला सांगतो.

एक पेटी घ्यायची. त्या पेटीला एक बारीकसं छिद्र, कॅमेऱ्याला असतं तसं ठेवायचं. ती मोठी पेटी आहे. जवळजवळ दीडफूट आत अंतर आहे म्हणा आणि मागच्या टोकाला एक electric चा bulb आहे. आणि तिथं कुठलंही कार्ड ठेवता येतं आणि हे अगदी कॅमेऱ्याच्या aperture सारखंच आहे. तुम्ही ती gun दाबा आणि ते aperture एक दशांश सेकंद उघडं पडतं. फक्त चटकन् तुम्ही त्यात पाहिलं पाहिजे. आत दिवा आहे, एक कार्ड आहे आणि तुम्हाला विचारलं, काय पाहिलंत सांगा. हा असा साधा प्रयोग करताना आम्ही दोन तऱ्हेचे groups घेतले विद्यार्थ्यांचे. एक म्हणजे भिकाऱ्यांची मुलं की ज्यांना बरेच वेळा, बऱ्याच तासांमधे, दिवसांमधे खायला अन्न मिळालेलं नाही ; आणि त्यामुळे अन्न ही ज्यांची साहजिकच अत्यंत महत्वाची अशी प्रेरणा त्यांच्या आयुष्यात आहे, त्यांची प्रेरणा मुद्दाम वेगळी दाखवण्यासाठी अशी भिकाऱ्यांची मुलं निवडली, ज्यांना खायलासुद्धा मिळत नव्हतं. आणि दुसरा group म्हणजे अशी चांगल्या स्थितीतील मुलं की जी खेळण्यांशी खेळतात, ज्यांना जगाचा परिचय आहे आणि ज्यांचं आयुष्य व्यवस्थित आहे अशी सुस्थितीतील त्याच वयाची तेवढीच मुलं घेतली. आणि त्या सगळ्यांना काही ठराविक तऱ्हेची कार्डं आत दाखवली. त्या कार्डावर जे काढलं होतं, ते modern art सारखं होतं, meaningless pattern होतं. काहीही

अर्थ काढावा त्यातून. म्हणजे असं की मी जे काही काढलं त्याच्यातून अनेक अर्थ निघतात. आणि बहुतांशी काय झालं ? जी भिकाऱ्यांची मुलं होती, ज्यांची प्ररणा अन्न ही होती, त्यांनी बहुतेक वेळेला आत काहीतरी खायचे पदार्थ असल्याचं त्यांनी सांगितलं. चित्र कसलं आहे ? कोणी सांगितलं, ice-cream ; कोणी सांगितलं, चांगल्यापैकी मीठ दिसतंय. थोडक्यात म्हणजे, त्यांना काहीतरी खाण्याचे पदार्थ दिसले. आपण म्हणू 'भावले'. दुसरा जो group होता, तो व्यवस्थित शिक्षण घेतलेला, खाऊन पिऊन सुखी असलेला group होता. त्यांनी कुणी खेळणी सांगितली, कुणी काही चित्र सांगितलं, कुणी सांगितलं, scene आहे. असं काहीतरी आत ठेवलेलं होतं की जे ambiguous आहे ; म्हणजे ज्याच्यातून अनेक अर्थ निघू शकतील, आणि ते फार वेळ पाहिजे तर नक्कीच कळेल ते काय आहे म्हणून $\frac{1}{10}$ सेकंद ते फक्त दाखवलं. आणि ह्यातून आम्ही असं दाखवलं की आपला जो perceptual response आहे, आपल्याला ज्या संवेदना होतात, त्या जशा बाह्य structureमधून म्हणजे, stimulus factorमुळं ठरतात त्याप्रमाणेच त्या आपल्या काही अंतर्गत घटकांमुळंही ठरतात. एक घटक मी वर्णन केला, आपल्या गरजा, आपल्या प्रेरणा. आता दुसरा घटक असा, की आपला mental set. 'Mental set' ला मराठीत अन्वेषण असा शब्द आहे. set ह्याचा अर्थ readiness, to be ready. उदाहरण देतो तुम्हाला. ज्यावेळेला पळण्याची शर्यत असते, त्यावेळेला umpire म्हणत असतो, "Be ready on your mark, get ready." म्हणजे सगळी माणसं त्या पळायच्या रेषेपाशी, अशी पळायच्या postureमध्ये असतात. म्हणजे त्यांचा physical set असतो. शारीरिक दृष्ट्या ती पळायला तयार झालेली असतात. They are ready. They are prepared. ही जी preparationची stage आहे, ती मी तुम्हाला शारिरीक preparation ची सांगितली. 'Be ready now ! go, !', 'पळा !' तशीच मनाची सुद्धा एक अशी धारणा बनलेली असते, mental set तयार झालेला असतो. म्हणजे, we are ready to perceive something. उदाहरण देतो. म्हणजे बरेच वेळा असं व्हायचं आणि जगात नेहमी सगळीकडे असं झालं आहे. आपल्या महाराष्ट्रामध्ये अत्र्यांच्या बाबतीत झालं आहे की अत्रे हे विनोदी लेखक आहेत. आपण सगळे हे शिकलेलो आहोत की ते विनोदी लेखक आहेत, त्यांचं बोलणं आपण ऐकलेलं आहे. आपण जेव्हा त्यांच्या व्याख्यानाला जातो, तेव्हाच 'हे विनोदी बोलणार' असं गृहीत धरून त्यांच्या व्याख्यानाला जातो, अशाच mental setने जातो. आणि त्यामुळे ह्या लोकांची अशी tragedy झालेली आहे. मार्क ट्वेन ची सुद्धा अमेरिकेत झाली होती. अत्र्यांनी एके ठिकाणी लिहिलंय मला वाटतं की, 'मला serious आता बोलताच येणार नाही, कारण लोक मला serious बोलूच देत नाहीत. मी जे काही बोलेन, त्यात त्यांना विनोदच वाटतो. माझ्याकडून विनोदाचीच ते अपेक्षा करतात आणि मी साधं बोललो तरी त्यातून ते विनोदी अर्थ काढतात. कारण ह्यांना माझ्या बोलण्याच्या ज्या संवेदना होत आहेत, त्यांच्या त्या मानसिक set वरती, mental set-वर, readiness वर, अवलंबून आहेत. 'हा मनुष्य विनोदी आहे. तो बोलतो ते विनोदी' असा एक set झाला. ही एक फार महत्त्वाची concept आहे. त्यामुळे कित्येक गोष्टी ठरतात. एखाद्याला संगीतातले जर काही माहीत नसेल आणि त्याला जर कोणी मोठ्ठे

नाव सांगितलं की अमका अमका गाणारा आहे. (किंवा त्याचं हे वाद्यसंगीत आहे) तर तो मग लोकांत आपलं अज्ञान व्यक्त करण्यापेक्षा 'वा ! वा !' हे फार चांगलं होतं' म्हणेल, He was ready to praise, कारण सगळे लोक हे ज्याअर्थी 'हे फार चांगलं' म्हणतायत, त्याअर्थी आपणसुद्धा त्यात असावं आणि त्याला मनापासून वाटेल की 'हे चांगलं होतं', because he came with that mental set. असं सगळीकडे होतं. उदाहरणार्थ, वक्त्याबद्दल असं होतं की जर समजा, कुठल्या का कारणाने होईना, लोकांचं एकदा त्या वक्त्यावरचं मन उडालं की तो जे काही बोलेल त्याबद्दल म्हणतील की 'हे फार रटाळ आहे बुवा !' आणि ह्याच्याउलट, एकदा जर काही चांगलं मत झालेलं असेल तर मनाचा set असा तयार होतो, की 'हे ठीक आहे हं.' शेवटी जर त्यांना विचारलं, 'काय हो काय शिकलात तुम्ही ?' 'नाही, तसं नाही सांगता येणार. पण बरं वाटलं बुवा.' हे 'बरं' काय वाटलं तुम्हाला ? तुमचे कुठल्या ना कुठल्या तरी कारणाने त्या माणसाबद्दल favourable opinion झालं आणि त्यामुळे तुमचा mental set तसा झाला. तेव्हा एक गोष्ट मी तुम्हाला जर अशी सांगितली की आपली need किंवा आपली प्रेरणा, आपली गरज ही आपल्या संवेदना ठरवत असते.

आता मी organic factors म्हणजे आपणात असलेले घटक सांगतो. एक म्हणजे आपली गरज, प्रेरणा, आपली एक तयारी, पूर्वतयारी म्हणा त्याला ; पण शब्द फार मोठा झाला. पूर्वतयारी म्हणजे आपण एखाद्या विषयाबद्दल अगदी लहानपणापासून जे ज्ञान आत्मसात केलं आहे ती होईल पण मी mental set म्हणजे temporary mental set म्हणतोय. 'तात्कालिक अन्वेषी वृत्ती' असं त्याला मराठीत म्हणतात. त्याचप्रमाणं असा जर काही enduring set असेल मनाचा तर attitude सुद्धा म्हणता येईल त्याला. एखादा attitude झालेला असतो काही लोकांचा की harmonium ही कसली french पेटी ! त्यात काय आलंय ? त्यात कसले स्वर आलेयत ? म्हणजे त्यांचा harmoniumकडे बघण्याचा काहीएक मानसिक attitude आहे. आणि त्याला काहीही जरी त्याच्याबद्दल सांगायचा प्रयत्न केला तरी त्याच्याकडे उघड्या मनानं बघणं त्याला अशक्य आहे. Communication त्याच्याशी अशक्य आहे. कारण असं होतं की तो जे तुमचं बोलणं ऐकतोय ते काही एक filter ठेऊन ऐकतोय. ही आज मला तुम्हाला filter ची कल्पना या communication मधे सांगायची आहे. Attitude ला अभिवृत्ती असं म्हणतात.

आपण जे बघतो, ते बघत असतांना आपलं मन हे जर एक कॅमेरा आहे असं समजलं तर त्याच्या द्वारापाशी दोन filter आपण लावलेले आहेत. या दोन filterची आता तुम्हाला मी थोडक्यात माहिती सांगतो. Filter म्हणजे तुम्हाला माहीती आहे, Physics चे अभ्यासक ,सांगतील की त्यांच्याकडे वेगवेगळ्या तऱ्हेचे filter असतात. म्हणजे जर तुम्हाला फक्त तांबडा रंग हवा असेल तर अशी एक काच असते की जिच्यातून फक्त एकाच तऱ्हेच्या प्रकाशलहरींना आत येण्याची परवानगी मिळते. बाकीच्या obstruct केल्या जातात. हिरवा रंग असेल तर त्याच तऱ्हेच्या लहरी त्या आत घेतात,

असे filters असतात. ते selective असतात. मला सांगायचाय तो filter याचा अर्थ: येणाऱ्या चेतकामधून काही विशिष्ट चेतक निवडले जातात आणि हे आपल्या बोधनेच्या क्रियेचं फार महत्वाचं अंग आहे. मग ती कुठल्याही तऱ्हेची बोधना असो. आपण जे ऐकतो, जे बोलतो, जे आपल्याला समजत असतं, ते काही सगळंच्या सगळं जे बाहेर अस्तित्वात आहे ते समजत नसतं; तसंच्या तसंही समजत नसतं. Perception is selective. मघाशी मी सांगितलं, perception is organized. ते एक सूत्र सांगितलं आता सांगतोय, perception is selective आणि ते selective कशामुळं होतं? दोन गोष्टींमुळं होतं. एक म्हणजे जी गोष्ट आपल्याला बघायची इच्छा आहे, ती बघण्याकडे आपला कल असतो. त्याला म्हणतात इंग्रजीमधे perceptual vigilance. म्हणजे आपण अगदी तयार असतो. ती गोष्ट बघायला तयार असतो. उदाहरण देतो म्हणजे समजेल.

आपला मित्र गावाहून येणार आहे, त्याने पत्र पाठवलंय, 'संध्याकाळी सातच्या सुमाराला V. T. station वर ये'. आपण जातो. त्या गाडीला खूप गर्दी आहे आणि आपण नजर लांब करून बघतो, तो आपला मित्र आला आहे असं आपल्याला वाटतं. कारण आपण त्याला बघायला अगदी उत्सुक झालेले आहोत. आपण त्याला बघायला आलेलो आहोत, आणि मग ती व्यक्ती जवळ आल्यावर कळतं, 'अरे, हा नाही माझा मित्र. हा त्याच्यासारखाच दिसणारा भलताच निघाला कोणीतरी. मग पहिल्यांदा असं का झालं? कारण जी कोणी माणसं आहेत, त्यांच्यामध्ये तू filter लावून एक बसलेला आहेस. म्हणून तुझं perception हे selective झालं, आणि नीट सम्यक्‌ज्ञान झाल्यानंतर तुला कळलं की ती व्यक्ती ही नाही आहे. असं बऱ्याच वेळेला होत असतं आपल्या जीवनामध्ये. अभ्यांचं उदाहरण सांगितलंच मी.

एकदा असं जर समजलं की हा विनोदी बोलतो तर त्यांच्या बोलण्यातला विनोद पहायला आपण अगदी टपलेले असतो. ह्याला म्हणायचं perceptual vigilance. To perceive something because we are ready to perceive it, whether that is there or not. त्याचप्रमाणे दुसरा एक filter त्याच्यामधे आपण घालत असतो, आणि तो म्हणजे perceptual defence. ह्या दोन कल्पना मला तुम्हाला आज सांगायच्या आहेत. एकाला म्हणायचं perceptual vigilance आणि दुसऱ्याला म्हणायचे perceptual defence. Defence म्हणजे संरक्षण. संरक्षण कोणतं? या जगात नेहमी आपण फक्त एकाच गोष्टीचं संरक्षण करीत असतो. आणि ती गोष्ट म्हणजे 'मी', माझा 'स्व' आणि ह्याला धक्का बसू नये अशी आपली सारखी धडपड चाललेली असते. आणि त्यामुळे ह्या धडपडीतून आपण बऱ्याच वेळेला जे बघतो ते कमालीचं defective असतं. कारण, आपण ज्या गोष्टी आपल्याला रुचत नाहीत, आपल्या स्वत्त्वाच्या कल्पनेत बसत नाहीत त्या बघायचं टाळतो, बघतच नाही. त्याला म्हणायचं perceptual defence. We do not perceive those things which threaten our well-being. कित्येक मार्गांनी हे आपण करत असतो. एकदोन अगदी साधी उदाहरणं देतो.

समजा आपण टेनिस खेळतोय. आणि आपली स्वतःबद्दलची अर्थातच कल्पना अशी आहे की आपण अगदी उत्तम टेनिस खेळतो आणि shot तर काय मस्त हाणतो! आणि समजा, असाच आपण आविर्भावानं एक shot मारला आणि तो ball, net मध्ये अडकला; मग आपण काय करतो चटकन्? आपण चटकन् रॅकेटकडे पाहतो. आता वस्तुतः रॅकेटनें बापडीनं काय केलेलं आहे? म्हणजे आपल्या मनाला हे सहन होत नाही की माझा shot चुकला' तर आपण त्या ball कडे बघतो. आणि मग कोणी म्हणतं, 'हां, हा ball तर तुम्ही उगीच वापरताय. आता टाकून द्या तो. जुना झाला'. तो माझा shot चुकला, माझा अंदाज चुकला, एवढं सोडून मी सगळं बोलेन त्या विषयावर. ह्याला इंग्रजीत आम्ही rationalization असं म्हणतो. खोटं काहीतरी कारण देऊन स्वतःचा बचाव करणं. आपण परीक्षेत नेहमी असंच करतो. 'मी अभ्यास केला नाही म्हणून; नाहीतर नक्कीच पास झालो असतो.' म्हणजे माझं 'मी'त्व कायम ठेवलेलं आहे मी. 'अभ्यास केला नाही एवढंच.'

ही जी सगळी धडपड आहे, ह्याला म्हणायचं perceptual defence आणि ज्या संवेदना आपल्याला होत असतात, त्यांच्यामधे हे नेहमी दोन अशा तऱ्हेचे selective filters बसवलेले आहेत. एक म्हणजे, जे आपल्याला पहायचं आहे ते पाहण्याकडे आपण इतके उद्युक्त झालेले आहोत की ते आपल्याला दिसतं; नसलं तरी. शाळेत असताना आमच्याकडे एक टूम निघाली होती, की असं जर कपाळ एक हजार वेळा मधल्या बोटानं घासलं तर राम दिसतो म्हणे! आणि लहान पोरं शाळेतली, ती आपली सकाळ दुपार सारखी आपली बोटं अशी घासताहेत. म्हणे राम दिसतो! रामकाठी! व्हायचं काय? इथलं कातडं सोललं जायचं आणि मग 'ह्याला बघ रामकाठी! ह्याला राम दिसला होता'. म्हणजे ज्याच्या इथं अशी सालडी निघाली असतील त्याला राम दिसला होता. का? तर असं ठरलेलंच आहे की जो असं एक हजार वेळा घासेल त्याला राम दिसतो.

तर, अशा तऱ्हेचे आपण filters लावत असतो आपल्या मनापुढे आणि जग बघत असतो. म्हणून आपल्याला सरतेशेवटी बाह्य जगाचं जे ज्ञान प्राप्त झालेलं असतं, ते destorted असतं, ते selective असतं, ते functionally selective असतं, ते organized असतं. हे दोन mechanism, perceptual vigilance आणि perceptual defence, ह्यांमधून ते बरंचसं असं झिरपून निघालेलं ज्ञान असते.

आता, मी जास्त काही बोलण्याच्या अगोदर मला वाटतं, ह्याची काही implications प्रा. रानडे सांगतील किंवा याबद्दल तुम्हाला जर काही विचारायचं असेल तर मी बोलेन. आता माझं बोलणं थांबवतो आणि उत्तर देण्याकरता मी बोलेन.

प्रा० अशोक रानडे:

आजचा विषय कालच्या सूत्रापासून निघालेला आहे. आणि त्यातला अतिशय महत्वाचा भाग म्हणजे, ज्याला त्यांनी सुरुवात केली होती काल, communication. त्याला कोणता शब्द आपण वापरला? संपर्क की काय?.. (प्रा. फडके: हो,हो) संपर्कक्रिया. संपर्कक्रिया

हा गाण्यामधील अतिशय महत्त्वाचा भाग. आणि मग communication कशाच्या द्वारे
होतं आणि communication ची पद्धती काय ? ह्याच्याविषयी त्यांनी आज थोडक्यात
विवेचन केलं. ह्यातला प्रत्येक घटक हा महत्त्वाचा आहे. आपण समजा, असं उदाहरण
घेतलं की आपण गातो आहोत, तर आपण 'कर्ता' आहोत. आणि आपण काहीतरी माहिती
दुसऱ्याला देणार आहोत. ती ऐकणाऱ्याकडे जाणार आहे. मनात लगेच शंका येते की मी
एकटा गात असतो, तेव्हा काय करतो ? तेव्हासुद्धा आपण ऐकत असतो. म्हणजे आपल्या-
पैकीच एका कुठल्यातरी भागाला आपण माहिती देत असतो असं आपण म्हटलं पाहिजे.
कारण, तसं जर नसतं तर आपण चुकल्यावर आपल्याला 'चुकलो' ही जाणीव झाली नसती.
तेव्हा आपल्या मनामध्ये तो एक भाग आहे. ही फार लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट आहे.
जसं, आपण गात असतांना 'तान घसरली' तर पुन्हा घेऊ शकतो. त्याला कारण असं की
आपण ती तान ऐकत असतो ; आपण आपल्याला माहिती देत असतो जणू काही आणि
ती आपल्याला पुरी मिळाली नाही की पुन्हा आपण घेऊ शकतो. तबल्याच्या बाबतीत
तेच होणार आहे हे काही मी सांगायला नको. पुढं मला जे सांगायचंय, तो समजा, संदेश
आहे असं आपण म्हटलं. पुन्हा एकदा सांगतो की या संपर्कक्रियेचीच मी फोड करू
पाहतोय. जर आपण गाण्याचं उदाहरण घेतलं तर यमन मला गायचा आहे असं जर
म्हटलं तर यमन हा एक संदेश होइल. पण त्या यमनाचं मला अभिप्रेत असलेलं जे संपूर्ण
रूप आहे, तो माझा संदेश झाला तुम्हाला, म्हणजे गाणाऱ्याचा संदेश झाला. नंतर, हा
कशाच्या द्वारे तुम्हाला दिला जातो ? तर त्याची त्यांनी सांगितल्याप्रमाणे एक सांकेतिक
भाषा असते. आणि ही सांकेतिक भाषा रागांच्या बाबतीत कशाच्या द्वारे मी तुमच्यापर्यंत
पोहोचवू पाहतो ? तर, राग मांडण्याचे काही संकेत असतात हा त्या भाषेपैकीच एक महत्त्वाचा
घटक झाला. हे राग मांडणं म्हणजे, काही विशिष्ट स्वरांना महत्व देणं, विशिष्ट स्वरांना
गाळणं, नंतर एखाद्या तालामध्ये जर मी गात असेन तर काही भागावर जोर देणं, म्हणजे समेवर
येणं किंवा समेवर न येणं किंवा त्या तालाचे विभाग दाखवणं. नंतर ताना, बोलताना असं म्हणत
त्या रागाच्या खाचाखोचा मांडणं. हे सगळे सांकेतिक भाषेचे घटक झाले. ज्याप्रमाणे
भाषेत शब्द आहेत, त्याप्रमाणे या संगीताचा, यमनाचा संदेश देण्यासाठी जी भाषा
वापरतो ती संगीताची भाषा झाली. ही भाषा झाल्यानंतर, ही भाषा ऐकणारा माणूस
पुनः समजून घेत असतो. म्हणजे ज्याला त्यांनी decoding म्हटलं, ती प्रतीकं उलगडून
पहायची. कारण, जो ऐकणारा आहे त्याला सुद्धा तुम्ही जे जे काय करता ते उलगडून
पहायला लागतं. तो कसा उलगडून पहातो ? तर 'राग' ओळखणं' ही जर
क्रिया पाहिली तर तो एक कोडं उलगडत असतो, decoding the language हा
प्रकार तिथं घडत असतो. आपण सर्वसाधारणतः ऐकायला बसल्यानंतर राग कसा
ओळखतो तर ह्याच्यामध्ये कुठले स्वर घेतो अन् कुठले नाही ही पुढची क्रिया होते.
म्हणजे आपण पूर्वतयारी अधिक केल्यावर जे होतं ते होतं. पण सर्वसाधारणतः आपल्याला
येत असलेली एखादी यमनमधील चीज किंवा यमन ऐकलेला असतो, त्या नाट-
कातल्या पदाशी ह्याचं साम्य आहे, हे साम्य आपण पटदिशी पहिल्यांदा ओळखतो. आणि
तिथं आपल्याला हे कोडं उलगडायला सुरुवात झालेली असते. तर ही उलगडण्याची क्रिया
होत गेल्यानंतर मग त्याचा अन्वयार्थ लावतो ऐकणारा आणि मग तो संदेश तिथपर्यंत पोहोचला.

ही पोहोचण्याची क्रिया त्यावेळेला पुरी होते. यातल्या प्रत्येक घटकामध्ये, म्हणजे, संदेश
माझ्या मनांत उद्‌भवून तुमच्यापर्यंत पोहोचेपर्यंत ज्या ज्या पायऱ्या आल्या, त्या प्रत्येक पायरीवर
धोके असतात आणि या प्रत्येक पायरीवर संदेश हा, ज्याला काही वेगवेगळे filter असतात त्या-
प्रमाणे लागून कदाचित् ह्यातला भाग गळत गळत जाऊ शकतो. आता आपण तिकडेही पुढं येणार
आहोत. उदाहरणार्थ, ह्यांनी जेव्हा perception चा विषय घेतला तेव्हा मी एक माझ्या
मनाशी एक असं उदाहरण घेतलं की समजा, पाश्चात्य वाद्यवृंद आपण ऐकत आहोत. तर तो
ऐकत असताना, ज्यांना अजिबात गाणंबजावणं आवडत नाही त्याला केवळ वेदन होईल. म्हणजे,
केवळ हा आवाजाचा कुठलातरी एक समूह त्याच्या कानावर आदळतोय ; हे वेदन झालं.
त्याच्यानंतर, ज्याला गाणंबजावणं थोडंसं आवडतं त्याला संवेदन होईल असं आपण म्हणू, कारण
त्याला तिथं, तो असं म्हणेल की इथं काहीतरी चार वाद्यं वाजत आहेत, इथं percussion
instruments वाजत आहेत, इथं काहीतरी string instruments आहेत आणि ह्याच्याही
पलीकडे गेल्यानंतर मग इथं harmony आहे किंवा इथं counterpoint सुरू झालेला आहे
किंवा ही 'बाख'च्या युगामधली एक रचना आहे असं जेव्हा तो सुरू करेल तेव्हा ज्ञान झालं.
म्हणजे मी असं म्हणेन की वेदन, संवेदन आणि ज्ञान अशा जर आपण पायऱ्या कल्पिल्या,
तर ह्याप्रमाणे हे जे काही communication होत असतं, संगीताचा जो अन्वयार्थ
श्रोत्यापर्यंत पोहोचत असतो त्याच्यामध्ये ह्या एवढ्या सगळ्या पायऱ्या असू शकतात. आणि
ह्या प्रत्येक पायरीवर काहीतरी धोका संभवू शकतो म्हणजे असं म्हणूया की जेव्हा
मी गातो, मी वाजवतो तेव्हा कितपत गाणंबजावणं उभं राहतं ? याच्यामध्ये ह्या प्रत्येक
पायरीवरचे जे धोके आहेत ते आपण लक्षात घेतले पाहिजेत आणि हे लक्षात न घेता आपण
कुठल्याही एकाच पातळीवर येऊन विधान करणं हे चुकीचं ठरणार आहे. कारण आपण असं
म्हणू की मी एवढा चांगला यमन गायलो पण त्यांना समजला नाही. त्यांना माहीत असलेला
जो यमन होता, त्याच्या आधारे ते तुमचा यमन पाहणार आहेत आणि मग ही एक आदर्श
रसिकाची अवस्था कल्पायला लागेल की मला माहीत काय आहे यापेक्षा तुम्हालाच
काय काय मांडायचंय ते पहाणं; पण ही फार पुढची अवस्था होऊ शकेल.

ह्याच्यानंतरचा संवेदनेचा जो भाग घेतला, perception चा, तो अतिशय महत्त्वाचा
भाग आहे आणि त्यांनी दिलेला जो काही एक formula आहे तो formula सुद्धा
आपल्याला अतिशय उद्‌बोधक असा वाटण्यासारखा आहे. पुन्हा त्याच्यामध्ये त्यांनी असे
भाग पाडले. ते असं म्हणाले की चेतकांच्यामुळे आपल्या बोधनेचं, आपल्या perceptionचं
स्वरूप बरंचसं ठरत असल्यामुळे ह्या चेतनेच्या बाबतीत, चेतकांच्या बाबतीमध्ये कुठलेकुठले
नियंत्रण करणारे घटक आहेत हे त्यांनी आपल्यापुढं मांडलं. मग तिथं त्यांनी 'समीपता'
हा पहिला घटक मांडला, पहिली condition—अट आहे, पूर्वशर्त आहे. इथे त्यांनी माझ्या
पुस्तकातलंच उदाहरण दिलं त्यामुळे मला अर्थात् बरं वाटलं. ते असं म्हणाले की जर एखादी
संगती सिद्ध व्हायला हवी असेल तर ते समीप असले पाहिजेत त्या संगीताचे घटक. उघड
गोष्ट आहे. समजा मी आज 'सा' म्हटला आणखीन् मग समजा दोन हजार वर्षांनी 'रे'
म्हटला तर 'सारे' ही जी काही संगती आहे ही काही सिद्ध होऊ शकणार नाही. कारण
ह्याच्यामध्ये स्थलाची आणि काळाची दोन्हीचीही कदाचित् समीपता असणार नाही.

आता, संगीतामध्ये स्थलाचं सामीप्य येतं की नाही ? की ते केवळ कल्पनासाम्य वा analogy च्या दृष्टीनं, हे कदाचित बघायला लागेल. कारण संगीतामध्ये फक्त 'काल' आहे. परंतु 'स्थल' नाही असं म्हटलं जातं. परंतु कदाचित ते एका विशिष्ट वेगळ्या अर्थाने असू शकेल. हा पुढचा प्रश्न झाला. ज्याला आपण म्हणतो की 'ही तान पुरी झाली नाही. तू अर्धवट सोडलेली आहेस.' त्याला कारण कदाचित काय असू शकेल ? तर ह्याला मला असं वाटतं की पुढचं जे पूर्णत्त्व हा जो त्यांनी सांगितला, हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. याचीही आपल्याला सारखी प्रचीती येते. किंबहुना पूर्ण करण्याकडे जी आपली प्रवृत्ती असते, त्याचं एक उदाहरण म्हणजे असं की म्हातारी माणसे जेव्हा गात असतात तेव्हा त्यांनी न म्हटलेले स्वरसुद्धा ते त्यांनी म्हटले आहेत असं समजून आपण 'वाहवा' देतो. आता हे आपल्याला सगळ्यांना माहीत आहे की समजा, मा. कृष्णराव गात असले किंवा मला अगदी पुस्तकातलं उदाहरण आठवतंय की अल्लादिया खाँसाहेब इथं 'रामकली' गायले हे गोविंदराव टेंब्यांनी वर्णन केलेलं आहे. ऐंशी वर्षांचे असतांना त्यांचा आवाज पुष्कळच कापत असणार आणि त्यांनी जी कथा दिलेली आहे ती अशी की सारंगीयांनी त्यांना विचारलं की हा राग कुठला ? तेव्हा गोविंदरावांनी असं लिहिलंय की त्यांनी चिरपरिचित रामकली इतका वेगळ्या तऱ्हेने मांडला की त्या सारंगियाला 'राग कुठला' असा क्षणभर प्रश्न पडला. हाच प्रश्न आपण वेगळ्या तऱ्हेनं टाकू शकतो की त्यांनी जो रामकली मांडला, तो इतक्या अस्पष्ट तऱ्हेनं मांडला गेला होता की ज्याला 'रामकली' परिचित आहे त्यालासुद्धा एक क्षणभर संभ्रम निर्माण झाला. त्यानं तो पुरा केला असणार. पूर्णत्वाची ही जी प्रवृत्ती आहे त्याप्रमाणं यांनी तिथं नसलेल्या गोष्टी substitute सुद्धा केल्या असतील आणि 'हा रामकली आहे' इथपर्यंत तो येऊन ठेपला असेल. कॉलिंगवूड नावाच्या एका टिकाकाराने एक उत्तम उदाहरण दिलंय. मी इथं भारतीय संगीताचं उदाहरण घेऊन स्पष्ट करतो की समजा, एक तासभर एखादा गायक मालकंस गातोय. आणखीन त्याच्यामध्ये मालकंसमध्ये नसणारे तीन स्वर लागले ; तीन वेळा तीन स्वर लागले. तर तो तासभर राग कुठला गायला ? आपण म्हणू शकतो की त्यानं जर मालकंसमध्ये नसणारे तीन स्वर तीन वेळा लावलेले आहेत तर हा तासभर काही मालकंस गायला नाही, असं जर म्हटलं तर मग आपण लगेच म्हणू की, 'नाही. असं नाही. मालकंसच गायला तो. तीनवेळा तो चुकला.' पण तिथं मग आपण पूर्णता केली की तिथं नसलेली एक गोष्ट तिथं 'आहे' अशी आपण त्याची पूर्तता केली. त्याचप्रमाणे अस्पष्ट उठणारा जो स्वर असतो, तो सुद्धा आपण कुठला हे जाणून घेऊन तिथं तो स्वर होता असं म्हणतो किंवा अनाघात सम हे माझ्या कल्पनेनं, पूर्ण करण्याच्या प्रवृत्तीचं उदाहरण आहे. तिथं सम नाही. वास्तविक पाहता ज्या तऱ्हेनं सम दाखवली जाते त्याअर्थानं तिथं सम नसते पण तरी 'ती सम तिथं आहे,' हे धरून आपण पुढं जाऊ शकतो—आणि यात कुठल्याही तऱ्हेनं आपल्याला धोका पोहोचला असं वाटत नाही. तर हे पूर्ण करण्याच्या प्रवृत्तीचं असंच एक लक्षण म्हटलं पाहिजे. आणि असे जे चेतक येतात त्यांचं एकमेकांशी नातं कल्पिण्याकडे आपली प्रवृत्ती असते. त्याला 'साम्य' असं फडक्यांनी म्हटलं आणि मग एक महत्त्वाचा सिद्धान्त मांडला की काही चेतकांच्यामध्ये अंगभूत प्रवृत्ती असते की त्यांनी एक आकृती म्हणून पुढं यावं. आणि इथं मला वाटतं पुन्हा संगीत हे काळाशी जास्त संबंधित असल्यामुळं तिथं कालाच्या दृष्टीनं

जवळ येणं हा अतिशय महत्त्वाचा घटक ठरेल. मी मघाशी मनात असा विचार करत होतो की ज्याच्यामध्ये 'नि रे ग म ध नी सां' हे यमनाचे समजा, आरोह अवरोह हे तासभर रेकॉर्ड केलेले आहेत आणि नंतर लगेच काहीही वेळ न जाऊ देता 'सारेगमपधनीसां' भैरवाप्रमाणे रेकॉर्ड केलेले आहेत आणि आपण यमन जिथे संपतो त्यातले बरोबर दोन स्वर, आणि भैरव जिथं सुरू होतो त्यातले बरोबर दोन स्वर, असे जर घेतले तर ते आपण एकत्र group करू का ? आपण ते एकत्र म्हणून ऐकायला लागू का ? तर मला असं वाटतं, hypothetically असं वाटतं, हा प्रयोग करून बघण्यासारखा आहे, की आपण ते तसं करणार नाही. त्याला कारण असं आहे की जे केवळ जवळ असतं, त्यांच्यामध्ये नातं आहे असं मानणार नाही. तर काही विशिष्ट गोष्टीच जवळ येऊ शकतात असा आपण कुठंतरी मनात एक निश्चित संकेत मानलेला आहे आणि त्यामुळं आपण तिकडचं म्हणजे पाश्चात्यांचं संगीत जेव्हा ऐकतो, तेव्हा कोमल आणखी समजा शुद्ध रे स्वर लागोपाठ येत गेले तर ते आपण 'संगीत' असं मानायला आपल्याकडे प्रवृत्ती नसते. आपण कुठल्यातरी रागात ते बसविल्याशिवाय आपल्याला ते घेता येत नाहीत. आणि त्यामुळे light music ऐकताना आपली सगळ्यात मोठी पंचाईत भारतीयांची होते. नंतर संगीत देत असताना संगीत दिग्दर्शकांची पंचाईत तीच होते की त्यांना रागाच्या बाहेर पडता येत नाही, तालाच्या बाहेर पडता येत नाही. नुसती लय देऊन संगीत द्या म्हटलं तर देता येत नाही. त्याला कारण काही गोष्टीच जास्त जवळ मानण्याकडे आपला कल आहे. कदाचित् आपल्याला एकंदर संस्कृतिशास्त्राकडे जावं लागेल या बाबतीत ; की काही लोकांची प्रवृत्ती काही गोष्टींनाच जवळ मानण्याकडे का ? हे कदाचित आपल्याला बघायला लागेल.

नंतर आणखी एक महत्त्वाचा मुद्दा फडक्यांनी मांडला की ज्या अर्थी चेतकांची भूमिका ही आपल्या संवेदन, response च्या बाबतीत अतिशय महत्त्वाची असते, त्याअर्थी जर आपण चेतकांच्यावर नियंत्रण आणलं, काही नियंत्रण ठेवू शकलो तर आपण response वर नियंत्रण ठेवू शकू. याचा अर्थ आपण जरूर जाणून घेण्यासारखा आहे की समजा, असं धरलं की समीपता आणि पूर्णत्त्व या नियमांना आधारूनच माणसं गाण्याला 'वाहव्वा' देत असतात असं जर गृहीत धरलं तर या नियमांना धरून जर आपण नेहमी गात गेलो तर 'वाहव्वा' आपल्याला आलीच पाहिजे असं आपल्याला थोडंसं म्हणायला लागेल आणि मला असं वाटतं की लोकांच्या 'वाहव्वा' ह्या काही वेळेला नियंत्रित होत असतात. त्यांना माहीत असतं की अमक्या ठिकाणी टाळी येणार. ती टाळी देण्यासाठी मग आधीचा भाग कदाचित् ते घाईघाईने गुंडाळतात, आणि तिथपर्यंत येऊन पोहोचतात आणि मग टाळी येते. आता ती टाळी येते ती कशामुळे येते, हा कदाचित् पुन्हा संशोधन करण्याचा विषय आहे. conditioned response असू शकेल. जसं फडक्यांनी पुढे एके ठिकाणी सांगितलं की वाहव्वा माणसं केव्हा देतात, त्याप्रमाणे, सगळी माणसं जर ह्याला मान डोलावतायत तर आपण डोलावलेली बरी. म्हणजे असा त्यांचा भाव होतो. मला इथे आठवलं की वसंतराव पहिलवानांना एकदा मा. कृष्णरावांनी विचारलं होतं की तुमचा देवावर विश्वास नाही म्हणता तुम्ही आणि पुण्यामध्ये आपलं कुठेही मारुतीचं मंदिर दिसलं की चप्पल काढून नमस्कार करायचा, पुन्हा चप्पल घालायची, पुढे जायचं हा काय प्रकार आहे ? ते म्हणाले, "मला माहीत आहे देव नाही. पण असलाच तर

नुकसान होऊ नये." तर त्याप्रमाणे हे होणार आहे की आपण काय म्हणू की कदाचित् हे चांगलं नसेल सुद्धा. पण चार चांगली माणसं जर ह्याला वाहव्वा देतायत, तर वाहव्वा देण्यात काही तोटा नाही असं म्हणून आपण कदाचित वाहव्वा देत असू. तर, हा एक फार महत्त्वाचा मुद्दा आहे असं मला वाटतं.

नंतर, चेतक तोच असून बोध वेगवेगळे का ? हा पुढचाही मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे, की तसं पाहिलं असता 'सुजन कसा मन चोरी' आणखी 'जबसे तुमीसन लागली !' भूपात आहेत. भूप ऐकताना तुम्हाला कोणता भूप आठवतो ? हे त्यांनी मघाशी झाडांची जी उदाहरणं दिली त्याप्रमाणे होणार आहे, की नाटकं ज्यांनी जास्त पाहिली आहेत, उदाहरणार्थ आमच्या प्रिन्सिपॉल ढेकण्यांना, यमन ऐकला तर 'नाथ हा माझा'च पहिल्यांदा आठवणार; आणि वामनराव देशपांड्यांना आठवणार नाही. वामनरावांना शास्त्रीय संगितातलीच चीज आठवणार आणि कदाचित ज्यांनी ऐकलं असेल त्याला कदाचित 'ज्योतिकलश झलके'च आठवेल. त्याला दुसरे काही आठवायचे नाही. तेव्हा हे सुद्धा चेतक तसं पाहतां तोच असून त्याचे बोध मात्र वेगवेगळे कां होतात हे पाहणं हे या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरेल. आणि इथे मग मला असं आठवलं की stravinsky नांवाच्या एका लेखकाने असं म्हटलेलं आहे की माणसं, 'they can only recognize, they can't cognize.' असं त्याने म्हटलेलं आहे. की ज्याचा आपल्याला आधीच परिचय आहे तेच माणसं ओळख शकतात. नव्या गोष्टींचा परिचय त्यांना करुन घेता येत नाही आणि हा सर्वसामान्यतः आपली सगळ्यांची तक्रार असली पाहिजे की जे जे गवई, जे जे वादनकार प्रसिद्ध झाले त्याचं सगळ्यांचं मोठं दुःख असं की लोक माझ्याकडून मी पूर्वी गायलोय तेच आजहि मी गावे अशी अपेक्षा करतात. मी वेगळं गायला लागलो तर लोक तयार होत नाहीत स्वीकारायला. त्यासाठी बराच वेळ जायला लागतो. आणि मग हेही लक्षात घेण्यासारखे आहे कि गाण्यामध्ये, बजावण्यामध्ये कदाचित आपल्याला असं काही मिश्रण ठेवायला लागेल की जे थोडसं लोकांना माहित आहे ते थोडं असं आधी भरवत जायचं आणि मग एक चार गोष्टी त्यांना माहीत नसलेल्या, टाकायच्या ; पुन्हा त्यांना माहित असलेल्या चार गोष्टी टाकायच्या. हे कदाचित् चालू ठेवायला लागेल. आणि कदाचित गाण्यामध्ये मुखड्याचं कार्य हेच असू शकेल की मुखडा तसाच का घ्यायचा असं जर विचारलं तर कदाचित एक परिचित गोष्ट पकडून श्रोते गाणं ऐकू शकतात. म्हणन मुखडा घ्यायचा. समेवरच कां यायचं नेहमी ? कधी तेराव्या मात्रेवर अन् कधी बाराव्या मात्रेवर कां येऊ नये ? आमचा जर आलाप संपला समजा, दहाव्या मात्रेला तर आम्ही तेराव्यावरच का येऊन ठेपू नये. ह्याला logically कारण काय ? तुम्ही असं म्हणाल की अहो, ती आकृती ? अहो, आमची आकृती पूर्ण झाली. आम्ही काय दररोज सोळाचीच करावी असं कुणी सांगितलय ? आमची आज तेराची आत्ता लहर आहे. पण मग तिथे कदाचित असं होणार आहे कि ते परिचीत जे चेतक आहेत, ते मनामध्ये बसणार आहेत श्रोत्यांच्या आणि त्याच्यावर हा नवीन ठसा उमटणं शक्य होणार नाही. म्हणन त्याच्या आधारेच पुढे सरणं हा महत्त्वाचा भाग आहे आणि मग mental set 'ग्रहणक्षम मनोधारणा' असं मी तिथे लिहून ठेवलें. हा बरा असेल शब्द असं वाटते आणि मग इथे

पुन्हा येतं की आपण जर अगदी उत्कट होऊन गेलो की आज आपल्याला चांगलं गाणं ऐकायला मिळणार असं ठरवून गेलो तर बरचसं गाणं चांगले ऐकायला मिळतं ही गोष्ट आणि मग मला असं आठवतय की एकदा ए. कानननी एक अतिशय मजेशीर गोष्ट सांगितली होती. तो म्हणाला कि कलकत्त्यामध्ये आम्ही खाकरलो तरी वाहव्वा होते. म्हणाला, पुण्यामध्ये आम्ही खूप चांगले गायलो तर तासभर मान डोलावली जात नाही. नंतर नारळ आणि एक रुपया हातात दिला जातो आणि म्हणाले, मुंबईमध्ये चांगला गायलो तर चांगले पैसे मिळतात. म्हणजे त्यांनी response ची तूलना करुन सांगितली. मग हा जो काही प्रकार आहे कलकत्याला, त्यांनी सांगितलेला' की बुआ खाकरल्यावर सुद्धा वाहव्वा होते. म्हणजे, तिकडचे लोक, त्यांचा mental set असा असतो की ते वाहव्वाच करण्यासाठी म्हणून आलेले असतात. असाच त्याचा अर्थ लावयाला पाहिजे आणि हे आपल्या आवडत्या गवयांच्या बाबतीत आपण करतो, हे तुमच्या लक्षात येईल. की अल्लारखाँ बसल्यानंतर त्यांनी नुसती हातोडी ठोकली की वाहव्वा देतात लोक की त्यांनी काय चालाचं दर्शन घडवलं असं म्हणतो आपण. म्हणजे दुसऱ्या एका माणसाने अगदी जरी तासभर चांगली लय ठेवली तरी मान हलत नाही आपली पण त्यांनी तिकडे हात टाकला की वाहव्वा देतो. अर्थात् ह्यामुळे बैठक रंगायला मदत होते पुष्कळवेळा हा आणखीन् एक वेगळा भाग झाला performance चा. परंतु हा mental readiness to appreciate हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. आणि मग त्यांची गरज ; पूर्वतयारी अभिवृत्ती, attitude आणि मग filters चे उल्लेख केले. हा सगळाच भाग अर्थात् अतिशय महत्त्वाचा आहे. फक्त आपण गात असताना जी घडते ती क्रिया बरीच गुंतागुंतीची असते. आणि तसं पाहता गवई लोक जे अनुमानधक्कयांनी जे काही त्यांनी बांधलेले अंदाज असतात, ते बरेचसे ह्याला धरुन असतात हीही आपल्या गोष्ट लक्षात येईल. की एखादा addienee बघून काय गायचं हे ठरवायचं हा जो महत्त्वाचा भाग आहे, ह्याची जाणीव त्याच्यामागे ही आहे की अरे, शेवटी काहीतरी त्यांना पोहोचवायचय माझ्या मनांत आलं म्हणन मी गायलो असं चालत नाही आणि असे जे गवई होते त्यांनासुद्धा त्यांना वाहव्वा मिळायला बराच वेळ जावा लागला. म्हणजे, जे कोंण असे होते की मला जे आहे तेच मी गाणार ज्यांना ऐकायचं त्यांनी ऐकावं तर शेवटी ज्यांना ते ऐकायचयं होतं अशी माणसं ठरायला लागली आणि असा एक त्यांचा श्रोतृवर्ग तयार व्हायला लागला. तितका काळ गेल्याशिवाय ते चाललं नाही आणि तसा काळ राहिला नाही. म्हणजे इतका वेळ राहणार नाही आपल्याला अशी जर परिस्थिती येणार असेल तर ह्या सगळ्या ज्ञानाचा असं मला वाटतं की आपल्या प्रत्यक्ष अभ्यासात आणखी प्रत्यक्ष गाण्याच्या प्रयोगात ह्याचा उपयोग होऊ शकेल.

संगीताचे मानसशास्त्र

व्याख्यान ३ रे

व्याख्याते प्रा. कि. मो. फडके.

आपल्या कालच्या व्याख्यानापासून आपण मनाबद्दल जी एक अंधारी पेटी अशा तऱ्हेची कल्पना केली होती, त्यामध्ये काही संकल्पनांचा अंतर्भाव करायला सुरुवात केली. पहिल्या व्याख्यानामधे एक मॉडेल आपल्यापुढे आपण ठेवले एक नकाशा ठेवला आणि असं सांगितलं की यामध्ये काही संकल्पनांचा अंतर्भाव आपण करुया आणि त्याप्रमाणे कालच्या व्याख्यानामध्ये वेदन आणि संवेदन, perception, sensation या विषयांचा अंतर्भाव काल केला. म्हणजे अंधाऱ्या पेटीमध्ये एक संकल्पना आपण आता जिवंत करुन पाहिली. आता उरलेली ही जी तीन व्याख्याने आहेत, त्यांचे स्वरुप काय आहे ते आज सांगतो.

आजच्या व्याख्यानामध्ये आणखी एका संकल्पनेचा परिचय करुन घ्यायचा आहे. आणि ती संकल्पना म्हणजे Attitude किंवा अभिकृती. किंवा काही लेखक त्याला 'स्थिरवृत्ती' असेही म्हणतात. इंग्रजीत त्याला attitudes असं म्हणतात. पुढच्या आठवड्यामधे म्हणजे सोमवारी आणि मंगळवारी आणखी दोन संकल्पनांचा अंतर्भाव या अंधाऱ्या पेटीमधे आपल्याला करायचा आहे आणि त्या म्हणजे 'प्रेरणा' (motivation) आणि पांचव्या व्याख्यानामधे भावभावना (feelings & emotions) अशा तऱ्हेचा मला वाटतं प्रा. रानडे आता आपण, म्हणजे मी मागे काय लिहून दिलं हे मला आठवत नाही सुदैवाने, परंतु मी प्रत्यक्ष व्याख्यान द्यायला लागल्यानंतर मी असा क्रम ठरवला आता की, आज attitude. नंतर उरलेल्या दोन व्याख्यानांमधे प्रेरणा आणि भावभावना अशी विभागणी अभ्यासाची आपण करू या.

तेव्हा, आता आपण आज attitudes बद्दल म्हणजे अभिवृत्तीबद्दल किंवा स्थिर-वृत्तीबद्दल काही ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करु या. साधारणतः कुठल्याही संकल्पनेची ओळख करुन घेण्याचे माझे मार्ग ठरलेले आहेत. विवरण करण्याचे मार्ग असे की प्रथमतः आपण असं बघु या की अभिवृत्ती म्हणजे काय? त्याचं स्वरुप काय? कोणत्या रीतीने त्यांचे वर्णन करता येईल? त्यात कुठल्या घटकांचा अंतर्भाव झालेला आहे? एखादी त्याची व्याख्या करता येणं शक्य आहे कां? थोडक्यात म्हणजे, जी कल्पना आपण समजावून घेणार आहोत तिच्याबद्दल ची सर्वसामान्य माहिती करुन घेणं. दुसरी गोष्ट म्हणजे, त्या संकल्पनेचा, म्हणजे ह्याबाबतीत बोलायच म्हणजे स्थिरवृत्तीचा आपल्या जीवनात उपयोग काय? त्यांचं कार्य काय? या स्थिरवृत्तीमुळे attitudes मुळे कार्य असं काय आपल्या जीवनात साधलं जातं? त्याला इंग्रजीमधे आम्ही म्हणतो 'functions of attitudes' आणि तिसरी गोष्ट म्हणजे, ह्या स्थिरवृत्तींचं संघटन कसं काय झालेलं असतं? त्याची अंतर्गत संगति कशी असते? internal consistency कशी असते? त्यातले घटक जे असतात, त्याचं एकमेकाशी नातं काय असतं? अशा तऱ्हेच्या प्रश्नांचा विचार आज आपल्याला

करायचा आहे. म्हणजे मी आता एवढच तुम्हाला सांगितलं कि आज आपण कुठले प्रश्न चर्चेला घेणार आहोत? त्या प्रश्नांची आपण साधारणपणे तीन विभागांमधे गठवारी करु शकतो. विभाग एक असा की अभिवृत्ती या संकल्पनेची माहिती, सर्वसामान्य माहिती, अर्थ करुन घेणे, जमल्यास थोडीशी व्याख्या देणे. दुसरी गोष्ट अशी की त्याचे जीवनात कार्य काय? याची ओळख करुन देणे, function of attitude. पहिल्या विभागाला म्हणुया nature of attitude, दुसऱ्याला म्हणुया functions af attitude आणि तिसऱ्याला आपण म्हणुया की organization of attitude म्हणजे संघटना, अभिवृत्तींची संघटना असं आपण सोयीकरता हे विभाजन करुन घेऊ या. organization of attitude असे मुख्यत्वेकरुन तीन भाग आपण आजच्या व्याख्यानाचे करु या आणि आता त्यातल्या एकेका भागाकडे वळया. म्हणजे मी इतका वेळ तुम्हाला एवढच सांगितलं की आज आपण कशाचा अभ्यास करणार आहोत आणि तो अभ्यास तीन भागात आपण आपल्यापुढे ठेवलेला आहे.

पहिला भाग : अभिवृत्ती म्हणजे काय? त्याचं स्वरुप काय? त्याचं विशेषतः संगीताच्या अभ्यासकांना महत्व काय असावं? इ. प्रश्नांची आज आपण चर्चा करु या. आता बघु की अभिवृत्ती म्हणजे काय किंवा Attitude म्हणजे काय?

तुम्हाला मी सांगितलं की अशी काही गोष्ट दाखवता येण्यासारखी नाही आहे ही; कि ह्याला अभिवृत्ती म्हणा, त्याला अभिवृत्ती म्हणा. ती एक संकल्पना आहे. कशावरुन मांडलेली आहे? मनुष्याचं वर्तन वारंवार पाहिल्या नंतर त्यामध्ये काहीतरी संगति आपल्या दृष्टोत्पत्तिस येते आणि त्या संगतीवरुन आपण काहीतरी संकल्पना ठरवण्याचा प्रयत्न करतो आणि मानतो की अभिवृत्ती अशी जर काही संकल्पना आपण मांडली तर माणसाचं वर्तन, माणसाची वर्तणूक, वर्णन करायला ,समजायला सोपी जाईल. काल जशी आपण वेदन आणि संवेदन, sensation and perception ची ओळख करुन घेतली, तसंच आज आपण करणार आहोत. हो. yes जरुर बोला. welcome.

एक श्रोता : इथे तुम्ही संगीत म्हणजे एक संकल्पना झाली नाही कां? कारण आपण अभिवृत्तीचं वर्णन हे संगीत म्हणून केलंत.

फडके : नाही, मी अजून अभिवृत्तीचं वर्णन केलेलं नाही. तो तिसरा topic आहे. त्यामध्ये organization of attitude म्हणजे आपल्याला ज्या अनंत अभिवृती असतात त्यांची एकमेकात काही संगती असते कां? हे आपण बघणार आहोत. तेव्हा त्याच्यापर्यंत येइन मी. मी फक्त काय करतो, नेहमी सांगताना साधारणतः तुमच्या डोळ्यापुढे, मला मांडायचा विषय ठेवून बोलतो. तुमची tendency सुद्धा अशी असणार की पहिल्यांदा एकदा सांगा बुआ मला आज तुम्ही काय करणार आहात? म्हणजे मला वेळ नसेल तर मी माझी bag घेऊन मी निघून जातो. म्हणजे काहीतरी मला जर interesting असेल तर बसतो. असं व्हावं तुम्हाला सोपं, समजावं, मी आज काय बोलणार आहे, म्हणन मी सर्वसामान्य व्याख्यानाचा आराखडा तुमच्यापुढे ठेवला. नंबर

एक अभिवृत्तीचा अभ्यास. तो तीन घटकांखाली करायचा ; तीन गटांखाली करायचा. अभिवृत्तीचं स्वरुप म्हणजे nature, त्याचं function म्हणजे कार्य जीवनात आणि त्याच्यातील संघटना किंवा organization, ती कशी आहे ते क्रमाक्रमाने आपण बघुया. तेव्हा प्रथम आपण विचारात घेउ या की अभिवृत्ती म्हणजे काय ? त्याचा अर्थ काय ? त्याचा संगीताच्या अभ्यासकांना उपयोग, होण्याची शक्यता आहे काय ? आणि आहेच आहे. ते आज आपण बघ या.

अभिवृत्ती म्हणजे काय ? सर्वसामान्यतः असं म्हणता येइल की अभिवृत्ती म्हणजे एकतऱ्हेचा टिकणारा mental set, बराच काळ टिकणारा. आणि mental set ला मराठी पुस्तकातून 'न्यास' 'लक्षणवेधी' '(लक्षान्वेधी ?) वृत्ती' असाही शद्ब दुसरा वापरलाय. 'मनोवृत्ती' असाही वापरलाय. मनोवृत्ती हा समजायला सोपा दिसतोय. 'न्यास' म्हणजे मला तर बुवा काही कळत नाही आहे. काय संस्कृतोद्‌भव असावा. पण मराठीत वापरलाय, आणि 'attitude' आणि 'न्यास', म्हणजे तसा काही फरक फारसा मराठीत बोलून होईल असं काही. 'मनोवृत्ती' हा शब्द बरा आहे (मध्ये कोणीतरी बोलतात.) मग चांगलं झालं. मग हा शद्ब तुम्हाला जास्त जवळचा वाटेल. न्यास म्हणजे पदन्यास. तर इथे आम्ही तो set या अर्थी वापरतो, mental set. पण कशातऱ्हेचा mental set ? temperory नाही. तर एकतऱ्हेचा टिकून राहणारा इंग्रजीत ज्याला आम्ही enduring set असं म्हणतो आणि त्यामधे काय काय गोष्टींचा अंतर्भाव झालेला आहे ? set ची कल्पना काल मी तुम्हाला सांगितली. set म्हणजे readiness. तयारीची स्थिती. कशाची तरी तयारी आहे तुमच्या मनाची. मग ती कशाची आहे ? असा पुढचा प्रश्न आला. तर तीन गोष्टींची तयारी आहे ; असं आपल्याला म्हणता येइल. एक म्हणजे काहीतरी जाणून घेण्याची तुमची तयारी आहे. त्याला आपण म्हणु cognitive aspect किंवा cognitive element. हे शद्ब मी काल आणि परवा वापरले होते. cognitive element म्हणजे attitude मध्ये एक cognitive element असतो. ह्याचा अर्थ cognitive म्हणजे ज्ञान, माहिती. आणि attitude मध्ये एक cognitive element आहे ह्याचा अर्थ काहीतरी माहितीवजा, information सारखं काहीतरी त्यात असलं पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की काहीतरी affective element त्याच्यामध्ये आहे. भावभावनासंबंधीचा आणि तिसरी गोष्ट म्हणजे cognative element म्हणजे काहीतरी प्रेरणात्मक म्हणजे कृतिप्रवण करणारा, त्याच्यामध्ये काहीतरी action होते. हे तीन शद्ब तुम्हाला शिकलेच पाहिजेत. मानसशास्त्र जर समजायचं असेल तर ह्याची चांगली माहिती, ह्या शद्बांची असली पाहिजे. cognative mental process म्हणजे ज्याच्यामार्फत आपल्याला वस्तूंचं, घटनांचं ज्ञान होतं, आपण विचार करतो, कल्पना करतो अशातऱ्हेची सगळी गोष्ट ह्या cognitive aspect मध्ये येते. Affective म्हणजे त्याच्याबद्दल काहीतरी वाटणं, वेगवेगळ्या भावना आपल्याला वाटतात. ह्याला affective tone असं म्हणतात आणि cognative म्हणजे प्रेरणात्मक, म्हणजे कृति दर्शवितं त्याच्यामधे. म्हणजे समजवून घेणं अगदी सोप्या भाषेत म्हणजे काहीतरी बरवाइट वाटणं आणि काहीतरी करणं. अशा माणसाच्या मनोव्यापारांच्या तीन अगदी मलभत

अशा दिशा आहेत असं म्हणता येइल. आणि attitude मध्ये हे तीन घटक अंतर्भूत झालेले असतात. या तीन घटकांच्या attitude बनलेला असतो. attitude म्हणजे एक set आहे mental set. एक न्यास आहे असं म्हणा आणि ती एक तयारी आहे. तयारी कशाची आहे ? तर काहीतरी समजुन घेण्याची, काहीतरी जाणण्याची, काहीतरी वाटण्याची, बरंवाइट वाटण्याची, काहीतरी करण्याची तयारी आहे. जास्तीत जास्त मी हे आता स्पष्ट करीत जातो. मला इतकच सांगायचय कि attitude म्हणजे एकतऱ्हेचा readiness एकतऱ्हेची tedency. ती कृती नाही आहे. attitude म्हणजे कृती नाही आहे. पण कृतीला पोषक ठरेल अशाप्रकारची ती तयारी आहे आणि ती अशी तयार झालेली जीवनामध्ये तुमच्या की त्यामुळे काहीतरी समजावून घेणं, काहीतरी वाटणं आणि काहीतरी करणं सुकर जावं.

आता, ह्या attitudes कशा तयार झाल्या ? तर, जन्माला आल्यापासून चे तुम्ही जेव्हा लहान मूल पहाल तेव्हा काही त्याच्या मनामध्ये attitudes नसतात. nobody is born with attitudes. म्हणजे पहिली गोष्ट अशी की attitudes आपण शिकत असतो. ही जी मनोवृत्ती ज्याला आपण, म्हणतो, ते आपण शिकत असतो, म्हणजे acquire करत असतो. जीवनात राहून आपण त्या संपादित केलेल्या गोष्टी आहेत. आता कशा संपादित केल्या बघा.

ज्यावेळेला एखादा मनुष्य त्याच त्याच घटनांशी सारखा परिचित होऊ लागतो, त्याच त्याच व्यक्तींशी जेंव्हा त्याची आंतरक्रिया घड लागते, interaction होऊ लागते, त्याच त्याच वस्तूंशी त्याची interaction व्हायला लागते, तेव्हा ह्या सारख्या होणाऱ्या आंतरक्रियेमुळे त्याच्या मनामध्ये काही तऱ्हेचे हे mental set तयार होतात. कारण का ? तर एकच गोष्ट आपण जर परत परत पहायला लागलो तर दरवेळेला काही आपण ती खोलात जाऊन बघत नाही. पूर्वीच्या अनुभवांमधून काही तरी त्यासंबंधीचं ज्ञान आपण मिळवलं काहीतरी वाटलं ते लक्षात राहीलं. काय करावं हेही ठरुन जातं. सामान्य उदाहरण देतो मग पुढे जातो.

समजा, तुम्ही जेंव्हापासून आंघोळ करण्याकरिता साबण वापरायला लागलात तेव्हा साबण ह्या गोष्टीशी तुमचा जेंव्हा जाणत्या वयानंतर परिचय झाला, तेव्हा साबणाबद्दल तुमचा काहीतरी mental set किंवा attitude तयार झाला, एक readiness तयार झाला. असं आपण मानुया की तुम्ही सतत 'Lux' साबण वापरत आलेले आहात. काही ना काही कारणामुळे म्हणजे 'Lux' साबणाबद्दल तुमच्या मनामध्ये काहीतरी एक ज्ञानमूल्य element cognitive आहे. काय तऱ्हेचा असू शकेल तो ? एक असा असू शकेल की Lux हा soap जो आहे तो शरीरप्रकृतीस, शरीरप्रकृतीकरिता, त्वचेकरिता फार चांगला आहे. त्याने चांगल्यातऱ्हेने त्वचा स्वच्छ होण्याचे काम केले जाते. म्हणजे हा त्या Lux साबणाबद्दलचा जो attitude मधला cognitive element आहे, त्याच्यात माहिती include केली आहे. कुणीतरी आणखी पुढे म्हणू शकेल की त्याचे जे chemical composition आहे ते scientifically फार चांगलं

आहे. असही कुणी म्हणुं शकेल. कुणाला त्याच्या रंगाबद्दल काही ज्ञान असेल तो म्हणेल, ह्याचे जे चार रंग आहेत त्यांच्याशी मी परिचीत आहे. त्यातला गुलाबी रंग मला सगळ्यात आवडतो. कुणी म्हणेल की त्याची माहिती अशी असू शकेल कि काही नटचा, माझ्या आवडत्या नटचा तो soap वापरतात असं मी वाचलय. तो Hindustan Lever Company ने बनवलेला आहे, तयार केलेला आहे त्यामुळे त्या कंपनीबद्दल तुमचं मत चांगलं असू शकेल. ही सुद्धा माहिती तुमची त्या Lux बद्दलची झाली. शिवाय त्याचा वास तुम्हाला आल्हाददायक वाटेल. म्हणजे तुमच्या भावना त्याच्याशी कशा झाल्या? संमुख भावना झाल्या. म्हणजे त्या बाजला जाण्याचा. going towards it. तुम्हाला आवडता झाला तो soap. म्हणजे त्याबद्दलची तुमची आता attitude मधली favourable element आली आणि ती भावनात्मक आहे. म्हणजे याचा अर्थ ती तुम्हाला आवडते. तो soap आवडतो, त्याचा वास आवडतो, त्याबद्दल सगळं काही तुम्हाला आवडतं rapper सुद्धा आवडेल. सगळ काही आवडेल जर favourable attitude तयार झाला असेल तर. आणि शेवटी काहीतरी क्रिया करण्याकडे तुमचा 'कल असतो' मला 'set' म्हणजे 'कल' म्हणायचय. प्रत्यक्ष कृती नाही. ready आहात तुम्ही काहींतरी करायला. आणि क्रिया काय? तो वापरणं, तो विकत घेणं, तो दुसऱ्याला सांगणं, recommend करणं, अनेक गोष्टी त्याच्यामध्ये अंतर्भूत झालेल्या आहेत. अगदी फारच आवडत असेल तर 'त्याच्या शिवाय दुसरा कुठला साबण मी वापरणार नाही' इथपर्यंत तुमची मर्यादा जाऊ शकेल. मग आम्ही असं म्हणू, इतकं जर आमच्या लक्षात आलं की ह्या व्यक्तीचा ह्या साबणाबद्दल काहीतरी चांगला म्हणजे favourable संमुख जाणारा असा एक--मानसिक क्रिया तयार झालेली आहे. त्याचा favourable attitude तयार झालेला आहे. हे अगदी साधे उदाहरण सांगितले. अशा रीतिने कुठल्याही व्यक्तीबद्दल आपले attitudes असतात.

आपण, मित्र असतो ज्याला आपण लहानपणापासून मित्र म्हणतो तो. त्याच्या काही गोष्टी, त्याचे काही गुणविशेष आपल्याला माहीत होतात. तो उदार मनाचा आहे, तो मदत करणारा आहे, तो प्रामाणिक आहे, तो सज्जन आहे. हे आपल्या मित्रबद्दल जे काही attitudes आहेत, त्यातले cognitive element आले. कारण ते information आहे. काय information आहे? कि तो प्रामाणिक आहे, सच्चा आहे, मदतीला धावून येणारा आहे वगैरे वगैरे. त्याचप्रमाणे तो फार प्रेमळ आहे, आपल्याला तो आवडतो. त्याचप्रमाणे तुम्हाला त्याच्याबद्दलची likes आणि dislikes आहेत, तयार होत आहेत आणि मित्र असेल तर तुम्ही म्हणाल की तुम्हाला की तुम्हाला चांगल्यापैकी आवडता मित्र आहे. जिगरदोस्त आहे वगैरे. affective element त्यातला आहे. आणि cognitive म्हणजे त्याच्या सहवासात रहावं, त्याला भेटावं, त्याने आपल्याकडे यावं अशाकरता तुम्ही आतूर असता. म्हणजे ही क्रिया झाली. आणि मग आम्ही असं म्हण की तुमच्या मित्राबद्दलचा जो तुमचा attitude यावरुन दिसतोय तो favourable attitude दिसतोय. असं म्हणता येइल की जगातल्या ज्या ज्या घटनांशी, ज्या ज्या व्यक्तींशी, ज्या ज्या वस्तूंशी तुम्ही सारखे परिचीत होत जाता त्या सर्वांबद्दल तुम्ही कुठल्या ना कुठल्या तऱ्हेचे attitude वाढवत असता, बाळगत असता. अस बघा, ह्यांना महत्व काय आहे? जेव्हा सांगितीक अनुभव आपल्याला येत असतो,

जेव्हा कुणीतरी गात असतो कुणीतरी instrumental music वाजवत असतो आणि कुणी तरी ते ऐकत असतं, मग एवढं होऊन थांबणार नाही, कारण जे ऐकणारे आहेत त्यांच्या मनामध्ये अनेक गोष्टींबद्दलच्या अभिवृत्ती तयार झालेल्या असू शकतील. गाणाऱ्याबद्दल किंवा vocal music ह्या कल्पने- बद्दल किंवा instrumental music ह्या कल्पनेबद्दल, त्याचप्रमाणे instruments मधल्या अमक्या तऱ्हेचे instrument ह्याबद्दलच्या त्याच्या काही attitudes ठरलेल्या आहेत. त्या सगळ्यांमार्फत तो आता तुमचं गाणं ऐकतोय आणि त्याची त्याला बोधना होते आहे, संवेदना होते आहे. मला म्हणायच आहे की हे जे attitudes आहेत ना they actually influence your perception. तुम्ही जे ऐकता, जे जाणता त्याच्या वरती ह्या attitudes चा effect होत असतो आणि समजा एखाद्याची अशी काहीतरी गाणाऱ्याबद्दल कल्पना आहे असं धरु या. कुणी मनाला लावून घेऊ नका हं मी अगदी उदाहरण म्हणन देतो आहे. की काही लोकांनी जीवनामधे लहानपणापासून, वाढल्यापासून काहीतरी त्यांचा गाणाऱ्याबद्दलचा असा समज आहे की गाणारा म्हणजे कोण? की जो साधारणतः झब्बा घालतो, आमच्यासारखा शर्ट आणि टाय वापरत नाही आणि त्या झब्ब्याला कॉलर नसते आणि जो पायजमा घालतो, ज्याच्या तोंडात बरेचवेळा विडा असतो आणि कानात अत्तराचा फाया असतो, त्याला साधारणतः शिस्त नकोशी वाटते, तो शिस्तबद्ध विचार काय आणि शिस्तबद्ध नोकरी काय तो नोकरी सोडतो. "नको बुआ, ती अगदी सकाळी ९ ते ५ ची नोकरी माझ्या तब्येतीला मानवणार नाही मी कलावंत आहे" म्हणजे तुमचा जो काही अनुभव अशा व्यक्तींशी आलेला आहे कलावंतांच्या बद्दल, मग तो कवि असेल नाहीतर गाणारा असेल. ह्यावरुन तुमचा एक असा attitude ठरलेला आहे की हा गाणारा काय, कलावंत काय, किंवा कवी काय ही व्यक्ती ही अशी असते. तिला खरोखरीच काही-तरी कारण असू शकेल की तुम्ही जी माणसं पाहिली आहेत ती तशा तऱ्हेची होती असं असू शकेल. पण मघाशी मी तुम्हाला सांगितलं की attitude हा enduring असतो आणि दुसरं एक विशेषण आता सांगतो त्याला. तो generalized असतो. म्हणजे एक-दोन जर गाणारे तुम्ही असे पाहिलेत एक-दोन कलावंत तुम्ही असे पाहिलेत तर तुम्ही एकदम ठरवून टाकता कि कलावंत हा असाच असतो. त्याला शिस्तीचं वावडं आहे. त्याला वेळी-अवेळी पान खायची सवय आहे, त्याचा dress वेगळा आहे, तो अत्तराचे बोळे कानात ठेवतो वगैरे वगैरे वगैरे. आणि भसाड्या आवाजात गाऊन माझी झोप मोडतो. अशा-तऱ्हेचा सुद्धा जर attitude एखाद्याचा गाणाऱ्याबद्दल असू शकतो. असे अनंत तऱ्हेचे attitudes आपल्या मनामधे आहेत. आता ही दोन जी मी adjectives सांगितली, generalized आणि enduring आता मी असं म्हणेन, attitude ची व्याख्या अशी देईन. that an attitude is a mental set. It is a predesposition to act in a favourable or an unfavourable manner depending upon what attitude you have, and that mental set is enduring and generalized. म्हणजे एकदोन असे कलावंत बघून तुम्ही असं ठरवून टाकलत, 'नको त्याची संगत बाबा!' असे आपण attituder शिकत असतो, अशा कल्पना आपण बांधत असतो. ह्याला कधीकधी 'स्थिरप्रतिमा' असेही म्हणतात. स्थिरप्रतिमा म्हणजे काय? की एखाद्या धंद्याबद्दल, एखाद्या जमातीबद्दल, एखाद्या वर्गाबद्दल आपल्या काही कल्पना आपण ठरवून टाकतो. आता तुम्ही-आम्ही जेव्हा लहान

होतो, तेंव्हा आपल्या आई–वडीलांनी अशी काळजी घेतली होती की आपल्यावर चांगले संस्कार व्हावेत, भलतं–सलतं, घाणेरडं वाचन आपल्या हातून होऊ नये. म्हणन बहुतेक आपण सगळेजण काय वाचतो? सानेगुरुजींची पुस्तके वाचतो. मग त्याच्यामधून आपला एक काय attitue निर्माण होऊ शकेल? कि माता म्हणजे एक कुणीतरी कमालीची प्रेमळ असे अनेक attitudes आपण शिकतो, असे वाचन, ऐकून, आपल्यावर जे संस्कार होतात त्यातून म्हणजे बघा, माता म्हणजे कुणीतरी नेहमीच प्रेमळ, self-sacrifice करणारी, प्रोफेसर म्हणजे कुणीतरी बुद्धिमान, कारकून म्हणजे खरच कुणीतरी बावळट आणि मास्तर म्हणजे कुणीतरी खरच गरीब. अशा तऱ्हेचे किंवा ऑफिसर म्हणजे कुणीतरी फायलीत डोके खुपसून सारखं काम करणारा अशा काही कल्पना आपण उराशी बाळगतो, शिकलेले असतो, नकळत शिकलेले असतो आणि त्याचे आपण असे consolidated attitues तयार केलेले असतात आपल्या मनामध्ये. म्हणजे attitudes किती असतात? अनंत असतात. आणि त्याचा अभ्यास आपल्याला फार महत्वाचा आहे. कुठल्याही सामाजिक आंतरक्रियेत तो महत्वाचा आहे. म्हणून सांगितीक अनुभवातसुद्धा तो महत्वाचा आहे. मघाशी मी तुम्हाला सांगितलच की मैफलीमध्ये काय चाललेले आहे? तुम्ही गाताय पण जे ऐकणारे आहेत त्यांच्या मनामधे असंख्य तऱ्हेचे attitudes आहेत. ते किती सूक्ष्म असू शकतील, किती ढोबळ असू शकतील, मी नवा मुद्दा आता मांडतोय.

काहींचे attitudes कमालीचे ढोबळ असतात की संगीत म्हणजे कटकट. इतपतच त्यांचं cognitive element त्याबद्दलचं असतं. त्यांना माहितीच नसते त्या विषयाची. याउलट जो त्यातला दर्दी आहे, ज्याने अभ्यास केलेला आहे, तुमच्यासारख्या लोकांना त्याच्याबद्दल कितीतरी सूक्ष्म माहिती झालेली आहे. आवाजाचे अनेक प्रकार तुम्ही सांगु शकाल. ते वर्णन करण्याचे मार्ग तुमच्याजवळ आहेत. vacal आवाजसुद्धा तुम्ही वेगळ्या वेगळ्या रीतींनी descriminate करु शकाल. वेगळ्या माणसांचा थोडक्यात म्हणजे, तुमचा जो संगीताबद्दलचा attitude आहे, शिकल्यामुळे, तुमच्या interest मुळे तो complex आहे. म्हणजे, त्याच्यामध्ये जे elements आहेत ते खूप तऱ्हेचे आहेत. ते काही ढोबळ attitude नाही आहेत. काही लोकांचे attitues ढोबळ असतात. मग ते ढोबळ favourable सुद्धा असतात. लता मंगेशकरचा आवाज 'आवडतो' ह्याच्या पलीकडे त्यांना काही सांगता येणार नाही. त्यांचं ज्ञान त्याबद्दलचं इतकच आहे आहे कि गोड गळा आहे, ऐकायला बरं वाटतं. म्हणजे त्यांचा favourable attitude आहे. आणि तो affectively fevourable आहे. म्हणजे तो खरोखरीच आवाज ऐकून त्यांना बरं वाटतं, प्रसन्न वाटतं.

पण त्या आवाजाबद्दलची त्यांची जी ज्ञानात्मक भूमिका आहे, cognitive element आहे, तो कमालीचा ढोबळ, superficial आहे. तोcomplex नाही आहे. त्याच्यामध्ये वेगवेगळ्या तऱ्हेचं net-work असं नाही आहे. जसं कुठल्याही विषयाचं जसजसं जास्त ज्ञान होत जाइल, तसं त्याबद्दलचं cognitive element तुमचं जास्त होत जातं. कुणी electrical engineer असतील, आपण नसतो आणि आपण जो रेडिओ उघडुन बघितला आतल्या बाजूला, तर आपल्याला वाटतं, 'कसल्या ह्या tubes आणि कसल्या wires

जातायत? काहीतरी गुंता आहे बुआ! आत नको उघडायला'. एवढंच आपल्याला त्याच्याबद्दलचं ज्ञान असतं की रेडिओ म्हणजे आत कमालीचा गुंता असलेलं काहीतरी हे instrument दिसतय! परंतु जो trained radio-engineer आहे त्याच्या दृष्टीने त्याला खूप वेगळा अर्थ आहे, त्याबद्दल त्याला खूप माहिती आहे, 'radio' ह्या गोष्टीबद्दलचा त्याचा जो attitude आहे, information आहे, ती जास्त complex आहे, rich आहे, परिपूर्ण आहे वगैरे वगैरे. Affective-element ची ही तीच तऱ्हा असते. एकदम एका टोकाला जाऊन 'फार चांगलं' आणि 'फार वाईट' अशातऱ्हेने attitudes असू शकतात माणसाचे की मला फार आवडतो लता मंगेशकरचा आवाज आणि अमक्याचा आवाज तर अजिबात आवडत नाही. म्हणजे, attitude ला एक नेहमी direction असतं, एक कुठलीतरी दिशा असते आणि आता मी काय सांगतोय? ही दिशा ही मूल्यवाचक असते. attitude मधली ही जी दिशा आहे, ती मूल्यवाचक असते. attitude मधली ही जी दिशा आहे, ती मूल्यवाचक असते. म्हणजे चांगली वाईट, आवडती नावडती. त्याच्याबाजूला तरी तुम्ही असता नाहीतर विरुद्ध तरी असता. म्हणजे मी असे म्हणेन कि तुमच्या attitude चं हे dimention आहे plus (+) म्हणजे असं म्हणूया की favourable dimention आणि इकडच्या बाजूला unfavourable dimention. म्हणजे, 'नको ते संगीत!' म्हणण्यापासूनचा attitude, 'हवेत कशाला हे संगीताचे चाळे? University त संगीत कशाला हवय? बाकीचे विषय काय कमी पडले आहेत का? इथपासूनचा attitude असू शकतो तो अगदी, 'बाकीच्या शास्त्रांनी काय केलय? काय होणार आहे शिकून? आजकाल आपल्या देशाला जर कशाची गरज असेल तर humanityची आहे आणि अशा गोष्टींची, finance ची गरज जास्त आहे. आपण तो विषय neglect केलेला आहे? आणि म्हणन त्याच्याबद्दलचा तुमचा फार favourrable attitude असू शकेल. म्हणजे मला दाखवायचय की attitudes मध्ये एक अंतर्भूत झालेली गोष्ठ म्हणजे मूल्यवाचक दिशा त्याच्यामध्मे असते. किंबहुना, मी त असे म्हणेन की attitude चं सगळ्यात महत्वाचं लक्षण असं आहे की ते काहीतरी एक मूल्यवाचक विधान आहे. मला मूल्य म्हणजे evaluative judgement असं त्याच्याबद्दल म्हणायचय इंग्लीशमध्ये. लक्स (Lux) साबण तुम्हाला नुसतं 'माहीत आहे' असं नाही. तर तो तुम्हाला आवडतो किंवा आवडत नाही. अर्थात् ह्या सर्वतऱ्हेच्या पायऱ्या त्याच्यामधे आहेत. मध्ये अशी पायरी असू शकेल की 'मला फारसं आवडतही नाही. मी त्याबद्दल साधारणतः indifferent आहे. म्हणजे मी त्याच्याबद्दल फारसं चांगलं ही मत देणारा नाही आणि फारसं वाईटही मत त्याच्याबद्दल माझं नाही. अशा टोकापासून आपले वेगवेगळे attitudes असतात आणि आम्ही मानसशास्त्र हे मोजण्याच्या प्रयोगात प्रयत्नासारखे असतो असो. मला सांगायचय असं की मी तुम्हाला इतका वेळ attitudes चे nature काय आहे, attitudes ची कल्पना मी तुम्हाला सांगण्याच्या प्रयत्नात आहे.

तर, अभिवृत्ती म्हणजे, 'आपण आपल्या आंतरक्रियेतून जी एक मनोवृत्ती तयार केलेली असते, अजाणपणे तयार केलेली असते, दरवेळेला काही आपण अगदी समजून attitudes तयार केलेले नसतात. ते होत असतात, ते बांधले जातात, ते आपल्या मनात रुजले जातात.

कशामुळे आंतरक्रियेमुळे, interaction मुळे. जी गोष्ट सारखी सारखी आपल्या अनुभवाला येते त्याबद्दल आपण काहीतरी attitude ठरवतो आणि अशा प्रकारे आपल्या मनामधे हे जे असंख्य वेगवेगळे attitudes असतात, त्यामुळे आपल्या आपल्या perceptions वरती त्याचा परिणाम होतो असं म्हणता येईल.

'Attitudes influence your perception' आपण काय बघतो, आपल्याला काय संवेदना होतील, हे ज्या अनेक गोष्टींवर अवलंबून आहे असं काल मी तुम्हाला सांगितलं, एक म्हणजे आपल्या गरजा आणि दुसरं म्हणजे आपले attitudes. आता याच्यानंतर इतपत ढोबळ माहिती दिल्यानंतर आणखी एक थोडीशी कल्पना स्पष्ट येण्याकरता attitudes चं वर्णन मी करतो. (एका व्यक्तीचा प्रश्न :—"आपण nature, function and Organization of attitudes जे म्हणालात ते दिलंत ?") नाही. नाही. मी फक्त nature सांगतोय. मी अजून function पर्यंत आलेलो नाही अजून माझ्या मनाप्रमाणे मी nature वर्णन करु शकलेलो नाही आहे. अजून एकदा एक वेगळ्या रीतीने सांगण्याचा प्रयत्न करतो आणि ती कल्पना म्हणजे की attitude म्हणजे, ही एक, आम्ही इंग्रजीमध्ये म्हणतो की attitude is a frame of reference. कसं ते पहा.

असं कदाचित चित्र काढलं, फुटपट्टी वगैरे घेऊन, तर असं म्हणता येईल की हा जो प्रकार, चौकोन काढलेला आहे मी तो, आणि हा, अगदी बरोबर याच्यासारखे काढता येतील geometrically. परंतु दिसायला तुम्हाला हा चौकट किंवा dimand दिसतोय आणि हा चौकोनच वाटतोय. ह्याला कारण असं असू शकतं की ही वस्तुत: geometrically म्हणजे, अगदी शास्त्राप्रमाणे मोजून बघाल तर त्यांची लांबीरुंदी सारखी आहे. पण ही जी बाजुला frame मी त्याला घातली आहे, त्याच्या बरहुकम तुम्ही ह्या आकृतीकडे बघताय, म्हणन तो तुम्हाला dimand वाटतोय. म्हणजे dimand as such worth चौकट हा तुम्ही कशावरती म्हणता ? तर त्याच्या भोवती जी काही frame घातली आहे त्याच्या दृष्टीने तो चौकट झाला. अस म्हणा, हे जे संगीत आहे हे म्हणजे ही मध्य–आकृती आहे आणि लोकांचे जे attitudes आहेत संगीताबद्दलचे, ते म्हणजे ही भोवताली घातलेली frame आहे. आणि मग तो चौकट दिसतो का सरळ चौकोन दिसतो, ठरेल. म्हणून आम्ही असं म्हणतो, 'Attitude is a frame of reference. Frame of reference म्हणण्याचं कारण काय ? मला असं दाखवायचंय की ह्याच्याबद्दलची तुमची संवेदना, ह्या मधल्या आकृतीबद्दलची संवेदना ही निरपेक्ष नाही आहे. ही सापेक्ष आहे. कशाशी सापेक्ष आहे ? ती ज्या चौकटीमध्ये मी बसवलेली आहे, त्याच्याशी ती सापेक्ष आहे. अशारीतीने वेगवेगळ्या आकृत्या काढून असं दाखवता येईल की आपली संवेदना कशी सापेक्ष असते. आता ह्याच्यातल्या angle कडे जर तुम्ही बघाल तर हा angle कुणी right angle आहे असं म्हणू शकणार नाही. मोजून पाहिलात तर तो काही right angle नाही आहे. परंतु नीट विचार केलात, सारखं बघत राहिलात आणि तो एका खोलीचा कोपरा आहे असं तुम्ही जर समजायला लागलात तर मग तो सुद्धा तुम्हाला right angle दिसायला लागेल. कारण असं झालं की तुमचा मी आता frame of

reference बदलला, तुमच्या मनामध्ये मी एक नवी कल्पना टाकली की ह्याच्याकडे तुम्ही आता एका खोलीचा कोपरा म्हणून बघा. मग तुम्हाला वाटतं yes. खोलीचा कोपरा म्हणून बघू, तर तो right angle असाच काढणार आणि असाच दिसणार. थोडक्यात म्हणजे, attitudes are a frame of reference आणि त्याच्यामधून आम्ही सगळं, आपण सगळं जग बघत असतो आणि मधून आपल्याला जे काही दिसतं ते नुसतं वस्तुस्थिती असते तसं दिसत नाही. म्हणजे गाणारा प्रत्यक्ष काय गातो किंवा आपण काय ऐकतो हे आपल्या attitudes वरुनसुद्धा ठरत असतं, फार महत्वाची गोष्ट त्याच्यावरुन ठरत असते. किंबहुना, अस म्हणता येईल, मी काल एक उदाहरण दिलं, की काल ह्यांनी आपल्याला उदाहरण दिलं. कलकत्यामध्ये एखादा गवई जरी खाकरला तरी त्याला फार चांगला response मिळतो. म्हणजे त्याच्याबद्दलचे इतके favourable element तिथे already आहेत, की त्याने काहीही करायची खोटी आहे की ते मान्य झालेलं आहे, favourable element त्याच्यामध्ये आलेलं आहे. आणि ह्याच्या उलट एखाद्या व्यक्तीबद्दल जर unfavourable मत झालेलं असेल, व्यक्ती म्हणजे गाणारी असेल, त्याचे साथीदार असेल, आता attitude किती complex असू शकतात बघा. मी तुम्हाला सांगितलं, काही लोकांचे attitude ढोबळ असू शकतील. काही लोकांचं असं म्हणणं असेल की गाणारा, त्याची वेळ, तो कुठे गातो, microphone ची सोय कशी काय आहे ते acoustics हॉलचं कसं आहे ? ह्याबद्दल सगळी त्याची काहीतरी काहीतरी एक विशिष्ट अशी कल्पना आहे आणि त्या कल्पनेत बसेपोतर त्याला ते मान्य होत नाही. कुठलं instrument तो हातात धरतो, त्याला साथ कोण करतो, ह्या सगळ्याबद्दलचे त्याचे काहीतरी विशिष्ठ attitudes आहेत. आणि त्याच्यामार्फत तो सगळा performance आता ऐकणार आहे. एवढी मला वाटतं, attitude ची मी कल्पना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यावरुन तुम्हाला attitude म्हणजे काय हे समजायला मदत आली असेल. मी अजून फक्त attitude चं विवेचन केलं. आता ह्याची एक summary सांगतो आणि मग कार्याकडे वळतो. ह्याची summary अशी की Attitude is a metal set. It is a tendency to act. हा readiness आहे. मला readiness शब्द का stress करायचाय की जणु काही तुम्ही धावायला तयार आहात. आता तुम्हाला मनुष्य आवडतो ना ? मग आता त्याने काही काही बोलायची खोटी आहे की तुम्ही ते चांगलं म्हणायला तयार आहात आणि त्याचप्रमाणे ते एक मूल्यवाचक विधान आहे. म्हणजे त्याच्यामध्ये काही तरी एक evaluative element दडलेला आहे. नुसताच attitude नाही आहे. तर तो favourable किंवा unfavourable आहे. Affectively you like it or you dislike it. असाही त्याच्यामधे भाग आहे. ती एक frame of reference आहे. त्यामधून आपण जग बघत असतो. आणि ते attitudes हे जन्मजात नसतात, ते आपण शिकत असतो, अजाणपणे develop करत असतो. हाही एक भाग त्याच्याबद्दलचा मी सांगितला. Attitudes वर खूप बोलता येण्यासारखं आहे. असं म्हणण्यात येतं कि 'सामाजिक मानसशास्त्र म्हणजे अभिवृत्तींचा अभ्यास' कारण, तुमच्या आता एक गोष्ट आली असेल लक्षात की आपण एका व्यक्तीबद्दल बोलत नाही आहोत. एक व्यक्ति आणि तिच्यासमोर बसलेला श्रोतृवृंद,

एकमेकांच्या ह्या आंतरक्रियेबद्दल आता आपण बोलत आहोत म्हणून attitudes ला महत्त्व आहे आणि आपल्या ज्या सगळ्या interactions असतात, एकमेकांशी जी आपली देवाणघेवाण जगात चालत असते, ती ह्या आपल्या मनात जे काही attitudes असतात त्यावर बऱ्याच बाबतीत अवलंबून असते.

आता मी दुसऱ्या मुद्द्याकडे वळतो की ह्या अभिवृत्तीचे माणसाच्या जीवनात कार्य काय असते ? What functions do they serve in our lives ? What functions do attitudes serve in our lives ? सामान्यत: attitudes हे चार कार्ये आपल्या जीवनात करीत असतात. दरवेळेला चारही करतात असे नाही. कधी एक करतात, कधी दोन करतात. जास्तीत जास्त चार करू शकतात. एक म्हणजे adjustment समायोजन. बघा, आपण ज्या घरात राहिलेलो असतो, तिथे वडीलधारी माणसं असतात, समाज असतो भोवतालचा आणि त्यांच्याशी आपल्याला जुळवाजुळव करुन घ्यायची आहे. समायोजन म्हणजे adjustment. आणि साहजिकच मग आपण अशा अभिवृत्ती develop करतो, अशा अभिवृत्ती वाढवतो की ज्या त्यांच्याबरोबर जीवन जगण्याला मदत करतील. म्हणन तुमच्या लक्षात येईल बऱ्याचवेळेला, आईवडिलांची राजकीय मते असतात तीच बरेच वेळेला मुलांची असतात. कारण, तशी असणं किफायतशीर असतं. ते family मध्ये रहायला, घरात रहायला उपयुक्त असतं, त्याला functional value आहे. तीच गोष्ट संगीताबद्दल म्हणता येईल कि साहजिकच जे कानावरती जातय, जे ऐकतोय लहानपणापासून मुलगा, त्याच्यावर त्याचा परिणाम होतो आणि नकळतपणे तो त्याच्याबद्दलचा त्याचा fevourable attitude develop करतो. कारण त्याला काहीतरी functional value आहे. adjustment function आहे. ऑफीसमध्ये बरेच वेळेला असं होतं की ज्या अभिवृत्ती आपल्या वाढत असतात, त्याला कारण त्याचा उपयोग तसा असतो आपल्या रोजच्या जीवनामध्ये आणि आपल्याला तिथे तग धरून नोकरी करायची आहे म्हणून तशातऱ्हेचे attitudes मनुष्य नकळत बनवत जातो. त्याला जर सांगितलं कोणी दहा वर्षांनी, की तू पूर्वी किती वेगळा होतास रे ! तर तो म्हणेल 'नाही रे नाही.' असं उगीच तुला वाटतंय'. पण बाकीच्यांना कळेल की आता हा बराच बदललाय. म्हणजे काय झालय ? त्याचे attitudes आता बरेच बदललेयत. एकेकाळी त्याला वाटत असेल की 'नको ही नोकरी की जिच्यामध्ये मला बरेचवेळेला धादान्त खोटं बोलावं लागतं.' पण हळूहळू आता त्याला वाटतय की व्यवहारामध्ये अगदी गरज पडतेच असं करायची आणि ते आत्मसात् त्याने केलेलं आहे. त्याचा attitude थोडासा बदलेला आहे. एखादेवेळी अगदी असं म्हणता येईल की असा एखादा गाणारा असू शकतो कि मला बुआ Popular music करायचं नाही आहे. मी popular लोकांकरता गात नाही आहे. 'I don't want to play to the galaries.' असा त्याचा attitude असतो. मी शास्त्रीय गाणारा आहे. इच्छा असेल तर ऐका ; न पेक्षा मी माझ्या घरी बसून गाईन आणि काही कालांतराने असं होऊ शकेल, गरजेपोटी म्हणा होऊ शकेल कि त्याचा असा संबंध ह्या जनतेशी येऊन त्याला म्हणावं लागेल कळत नकळत कि थोडंतरी मला जनतेकडे लक्ष दिलं पाहिजे, त्यांच्याकरिता काहीतरी हलकं फुलकं केलं पाहिजे आणि म्हणून त्याचा थोडा attitude बदलून, मुरड घालून त्याच्या

attitude ला तो वेगळ्या तऱ्हेचं काही गायन-वादन करू शकेल. तर, म्हणजे समायोजन adjustment करिता आपण कुठले जे attitudes असतात, they serve the function of adjustment in our lives. मग तो मनुष्य attitude बदलतो आणि म्हणतो 'yes. It it necessary some-times to compromise and say that yes, public wantthis; so I will also try to play them. असं कधी कधी करावं लागतं म्हणन तो आपल्या attitudeला थोडी मुरड घालू शकतो.

दुसरे function असे आहे कि ' self-defence ' 'आत्मसंरक्षण'. काल मी बोललो त्याच्याबद्दल. self-defencive. नेहमी आपण ज्या अभिवृत्ती वाढवलेल्या असतात, त्यातून आपण आपले संरक्षण करीत असतो. म्हणजे समजा, आपल्या बद्दलची ,स्वत:बद्दलची जी काही एक प्रतिमा आपण बाळगलेली असते उराशी 'स्वप्रतिमा' ' self image ' असं त्याला इंग्रजीत म्हणतात. self-image. मी कसा आहे, ह्याच्याबद्दल आपले काही attitudes असतात. कारण attitudes हे आपणाबद्दलही असतातच की. प्रत्येकाला आपल्याबद्दल, स्वत:बद्दल कितीतरी कल्पना असतात खऱ्याखोट्या. कुणाला वाटत असतं की मी फार सुंदर आहे, कुणाला वाटत असतं की मी फार बुद्धिमान आहे किंवा एकाच माणसाला हे दोन्हीही वाटत असतं. आणि अनेक गुण तो आपल्याला चिकटऊन घेत असतो आणि त्याला naturally ही जी आपली स्वत:ची कल्पना आहे, तिच्यामध्ये कधी दोषांना जागाच नसते. परंतु प्रत्यक्षात मात्र बरेचवेळा आपल्या नजरेस लोक दोष आणून देतात. आणि मग आपण काय म्हणतो ! मग आपण defensive होतो. कोणाचा defence करतो ? स्वत:चा आणि मग आपण असे attitude करायला लागतो, 'तो माझ्यावर टीका करतो ह्याला कारण असं आहे की त्याला माझा हेवा वाटतो.' म्हणजे आता मी असा attitude बनवला की त्या सगळ्यांना माझा हेवा वाटतोय म्हणन ते माझ्यावर टीका करताहेत. कारण इतके गुण माझ्यापाशी आहेत, इतका all round मनुष्य मी आहे ! तेव्हा आता माझा मत्सर वाटणं हे साहजिकच आहे. अशातऱ्हेचा आता आपण attitude त्यांच्याबद्दल develop केला. म्हणजे आपण intact राहिलो ह्या सगळ्यामध्ये तेव्हा, self-defence हे एक function attitude मार्फत साधला जात असतो.

तिसरे function म्हणजे value-expression. मूल्यवाचक कार्य साधण्यात येते. value-expression. माझा धंद्यातले उदा. घेऊन मी तुम्हाला सांगतो. प्रत्येक धंद्याला variety असते. तशी माझ्या धंद्यालाही variety आहे. आमच्या धंद्यात, म्हणजे प्राध्यापकमंडळींना, स्वत:बद्दलचे काही concepts असतात. म्हणजे आम्ही फार विद्वान ही पहिली कल्पना. नाइलाजच आहे हा ! धंदाच पत्करलाय विद्वतेचा ! त्यामुळे आम्ही असं म्हणायला पाहिजे 'आम्ही विद्वान' मग त्या विद्वत्तेच्या अनुषंगानं कित्येक गोष्टी आम्ही त्याच्यामध्ये include केलेल्या आहेत. कशा ? की विद्वान म्हणजे अर्थात् पुस्तकं पाहिजेत ; वाचली नाहीत तरी निदान हातात तरी पाहिजेत. त्याचप्रमाणे ती घरात पाहिजेत. मग माझी जर drawing-room असेल तर त्याच्यामध्ये एक चांगल्यापैकी show-case पाहिजे आणि त्याच्यात सोन्याने चांगली लिहीलेली bind केलेली काही

volumes पाहिजेत. आता जर तुम्ही नीट विचार कराल तर तुमच्या असं बरेच वेळेला लक्षांत येईल कि कुणाची जर drawing-room तुम्ही पाहिलीत तर त्यातल्या furniture वरुन तुमच्या असं लक्षांत येईल की आम्हीं असं म्हणतो की तो मनुष्य स्वतःचीं जीं एक कल्पना आहे, आत्मकल्पना आहे, प्रतिमा आहे, तीं साकारत असतो त्याच्या त्या furniture मधून. त्या निरनिराळ्या वस्तू विकत घेत असतो, ज्या रीतिने त्या मांडत असतो म्हणजे, समजा, एखाद्या प्राध्यापकाचीं अशी जर कल्पना असेल की तो फक्त ज्ञानार्जन करतोय, ज्ञानाच्या तो मागे आहे तर तो असं मुद्दाम दाखवायचा प्रयत्न करेल कि माझ्या घरातलं furniture अगदी rugged आहे. गरजेपुरतं furniture आहे. पण तुम्हीं पुस्तकं बघा माझ्याकडे किती आहेत. म्हणजे, इकडून तिकडून नुसतीं पुस्तकं तो मांडून ठेवील कळत नकळत आणि दाखवायचा प्रयत्न करील की माझ्या जीवनाच्या values काहींतरीं वेगळ्या आहेत. म्हणजे value-expression function attitudes करतात. आणि ह्यामार्फत तो असं दाखवील की माझ्या इथे frames नाहीं आहेत, फोटो नाहीं आहेत, उत्तम furniture नाही आहे, drapery नाही, curtains नाहींत. आहे काय ? फक्त जिकडे-तिकडे पुस्तकं आहेत. आणि कोणी हात लावू नका. मी त्याच्यावरची धूळ सुद्धा झटकत नसतो. कुणीं आवडत नाही धूळ झटकलेली. आता ह्याच्यावरुन तुम्हाला attitudes मध्ये हा emotional aspect कसा आहे ते कळेल. आता बाबारे, तुला पुस्तकाविषयीं प्रेम असेल तर त्याच्यावरचीं धूळ का झटकू नये ? उलट जास्त टिकतील पुस्तकं, पण त्याच्यातून त्याला असं दाखवायचं आहे कीं माझ्या जीवनाच्या values ज्या आहेत त्या वेगळ्या आहेत आणि अशा राहणीमधून, अशा बोलण्यामधन, अशा वस्तू खरेदी करुन, त्या मांडण्यामधून तो आपले attitudes express करत असतो. आणि——

शेवटचे function म्हणजे knowledge. म्हणजे आपल्याला घटनांचे, व्यक्तींचे ज्ञान ह्या अभिवृत्तींमुळे सुकर झालेले असते. पहा, दरवेळेला जीं माणसे आपल्याला भेटतात, ज्या घटना घडतात त्याची साधकबाधक चर्चा करुन, त्याचे pros & cons बघून, त्याच्याबद्दल मत बनवायचं ठरवलं तर आपल्याला रोजची नोकरी करणं सुद्धा अशक्य होईल. कारण जीवन हे असे आहे की ज्याच्यामध्ये काहीतरी कृतीं करणे भाग आहे. आणि प्रत्येक वेळेला सगळ्या गोष्टी आपण ठरवत बसत नसतो. मग आपण काय करतो की आपण काही आपल्या अभिवृत्ती नक्की करुन स्थिरप्रतिमा बनवलेल्या असतात. उदाहरणार्थ, एखाद्याची कल्पना हे जे राजकीय पक्ष आहेत, त्याच्याबद्दलचीं काहींतरीं असते. communist कसा ? आंघोळ न करणारा, नीट भांग न पाडणारा, नेहमीं क्रांतीबद्दल बोलणारा आणि साधरणतः ज्याच्या तोंडात radical भाषा आहे असा. वगैरेवगैरे काहींतरी कम्युनिस्टांबद्दल त्याची प्रतिमा झालेली आहे. ही प्रतिमा म्हणजे अनेक अभिवृत्तींचा समुच्चय आहे. म्हणून मीं संघटनेकडे येणार आहे. त्याचप्रमाणे जनसंघ म्हणजे काय ? अशीं एक त्याचीं प्रतिमा झालेलीं आहे की जो हिंदुत्वाबद्दल बोलतो, ज्याला आद्य संस्कृतीबद्दल आणि वेदांबद्दल फार प्रेम आहे, जो मिशांचीं ठेवण एका तऱ्हेने ठेवतो, ज्याचे कपडे एका विशिष्ठ तऱ्हेचे असतात, तो टोपी एका तऱ्हेची वापरतो. अशा कल्पना observation मधून निरीक्षणांमधून आपण ह्या सगळ्या आपल्या अभिवृत्तीत आकलन केलेल्या असतात, संकलित केलेल्या असतात. आणि मग नंतर

जर आपल्याला कुणीं दाखवून दिलं कीं अमका तमका मनुष्य ना, हा communist party चा ticket-holder 'आलं लक्षांत' म्हणजे आपण म्हणतो. ? 'आलं लक्षात' म्हणजे काय ? तर knowledge function म्हणजे एकादा आपल्याला कळलं कीं हा communist party चा member आहे की त्याच्याबद्दल सगळं काही समजल्याचं आपल्याला वाटतं. 'माहितीं आहे मला. समजलं सगळं काहीं. R. S. S. आहे ना ? आलं लक्षांत ? ह्या 'आलं लक्षांत' मध्ये आपण आपला जो attitude आधीं बनवलेला आहे, त्यामार्फत आपण काहीतरी त्या व्यक्तीबद्दलचं ज्ञान मिळवून टाकलं. short-circuit process म्हणतात तसं करुन टाकलं ते आता. जास्त detail समजून घ्यायची गरज नाहीं. कारण नाही. कारण मला अगोदरच त्या पक्षाबक्षाबद्दलच, त्या लोकांबद्दल, तऱ्हेबद्दल सर्व काहीं माहीत आहे.

आता, हीं जीं चार तऱ्हेची कार्यें आहेत त्याला आम्हीं functions असं म्हणतो आणि मग आता मीं असं म्हणेन कीं, Attitudes by and large, serve these four functions in our lives, sometimes one, sometimes the other, but in all they serve these functions. But, I want to show is that attitudes develop because they are useful, because they serve some functions in life. नाहीतर ते टिकून रहाणार नाहींत.

आता तिसऱ्या मुद्द्याकडे आपण वळू या. आणि तो म्हणजे ह्या 'अभिवृत्तींचे संघटन' किंवा organization of attitudes'. हा थोडासा आता किचकट वाटणारा मुद्दा आहे. Organization of attitudes ह्याचा अर्थ काय, हे मी प्रथम सांगतो. ह्याला दोन अर्थ आहेत. एक म्हणजे, 'एकाच अभिवृत्तीत असलेल्या घटकांचे संघटन. म्हणजे cognitive, conative, affective elements आहेत. त्याचे संघटन एकाच attitude मध्ये कसे असते. एकच attitude म्हणजे माझा कम्युनिस्टांबद्दलचा attitude, माझा जनसंघांबद्दलचा attitude, माझा संगीताबद्दलचा attitude माझा instumental music बद्दलचा attitue काहीं लोकांना काल माझ्या बोलण्यावरुन लक्षांत आलं कीं नुसतं संगीतच असं कीं त्याच्यामध्ये शब्दाला आणि अर्थाला महत्त्व आहे की नाहीं ? हा खोलात जाऊन एक मुद्दा असू शकतो. आणि काही लोकांचा attitude त्याप्रमाणे ठरलेला असतो की बाबा, तुम्हीं आता असं गाताय. ठीक आहे. पण ह्यामध्ये तुम्ही अर्थाला बगल देताय आणि शब्दांचीं ओढाताण इतकीं करताय कीं तुम्हीं अर्थ काहीच महत्त्वाचा समजत नाहीं हे कसं ? तो attitude एका टोकाला घेऊन असं कोणी म्हणू शकतो की असं करणं म्हणजे आपण मनुष्य आहोत, आपल्याला देवाने भाषेची देणगी दिलेली आहे तिला आपण विनाकारण बाजूला टाकणं आणि एका Lower-level वरचं pleasure घेणं आहे की आपण नुसतच संगीत ऐकतो कीं ज्याच्यामध्ये शब्दांना आणि अर्थाला फारसं महत्त्व नाही. अशाप्रकारचे वेगवेगळे attitudes होऊ शकतात. मला दाखवाचय असं कीं एकाच attitude मध्ये, एकाच अभिवृत्तीमध्ये जे तीन घटक आहेत, त्यांचे एकमेकांशी नाते काय असते ? म्हणजे हा cognitive element हा affectiv element आणि हा conative element ह्यांचे एकमेकांशीं नाते म्हणजे संघटना, relationship काय असते ? हा एक अर्थ झाला संघटनेचा.

दुसरा अर्थ ज्या अनेक अभिवृत्ती आपल्यामध्ये आहेत, त्यांचे एकमेकांशी नाते काय असते? म्हणजे, इंग्रजीमध्ये आम्ही असं म्हणू, 'Inter-attitude relationship' किंवा organization, and Intra-attitude relationnship. म्हणजे एकाच अभिवृत्तीमधले हे जे तीन घटक आहेत, त्यांचे संघटन कसे काय झालेले असते आणि दोन किंवा वेगवेगळ्या ज्या अभिवृत्ती आहेत त्यांचे एकमेकांशी कसे काय जमते, पटते, जुळते असाही विचार आपल्याला करता येईल आणि त्याला आपण 'संघटना' असे म्हणू या. थोडक्यात म्हणजे, मला आता असं सांगायचय, ज्याला आपण अभिवृत्ती असे म्हणत होतो त्या काही ऐकमेकांपासून बंदिस्त अशा वेगवेगळ्या कप्प्यांमध्ये रहात नाहीत. रहाता येत नाही त्यांना, कारण, आपल्या जीवनामध्ये अनेक अनुभव आपल्याला सतत येत असतात, मारा करत असतात आणि एक attitude नेहमी दुसऱ्याशी संबंधित असतोच, एक अभिवृत्ती संबंधित असते आणि म्हणून असं म्हणता येईल की वस्तुतः आपल्याकडे, आपल्या मनात ज्या वेगवेगळ्या ह्या अभिवृत्ती असतात त्यांचे संघटन कसे झालेले आहे? कधीकधी त्यांचे संघटन कमालीचे सुसंघटित, well-organized, well-knit, systematically organized असं म्हणा वाटलं तर. अगदी व्यवस्थित बांधणी त्यांची झालेली आहे असं आपल्याला म्हणता येईल. उदाहरण सांगतो मी तुम्हाला.

समजा, माझा communism ह्या विषयाबद्दल काहीतरी attitude आहे. हा एक general attitude झाला. पण त्याच्यामध्ये हा आपण घेऊ या की माझा एक विशिष्ट attitude toward communism. ह्या attitude मध्ये वस्तुतः अनंत अभिवृत्तींचा समावेश झालेला असू शकतो. 'उदाहरणार्थ, त्यांचे निश्चित असे काहीतरी तत्त्वज्ञान, मार्क्स-लेनिन प्रणीत तत्त्वज्ञान म्हणजे त्याच्याबद्दल काहीतरी माझी नुसती ढोबळ समजूत नाही आहे. तर त्या तत्त्वज्ञानाबद्दल सखोल विचार मी केलेला आहे, ते आत्मसात् केलेले आहे, त्याची मला पूर्ण माहिती आहे. त्याचप्रमाणे त्या तत्त्वज्ञानातून ज्या वेगवेगळ्या आर्थिक, राजकीय, सामाजिक विषयांची implicatios निघतात त्याबद्दलचेसुद्धा माझे ठरलेले मत आहे. पहा, तुम्हाला सांगतो, जर communist विचारसरणी एकदा आत्मसात् केली तर, तुम्ही त्यांची जर पुस्तके वाचाल तर ते म्हणतील की literary critism from the point of your dilecticai materialism. म्हणजे, कलेचे मूल्यमापनसुद्धा ते त्यांच्या चौकटीतून करणार. from that point of view. बरीच वर्षे बेडेकर तसं करत होते, दि. के. बेडेकर. परंतु आता त्यांनी ती चौकट बाजूला टाकली कारण त्यांचा attitude communism बद्दलचा बदलला. प्रख्यात टीकाकार दि. के. बेडेकर हे एकेकाळी communism point of viev ने समीक्षा करीत असत. तसेच, ह्याच्या नंतरची cr t cism म्हणजे की बाबा, समाजामध्ये धंदे हे स्वतंत्र असावेत की ते राष्ट्राने एकत्रित केलेले असावेत ह्याबद्दलचे त्याचे काहीतरी ठरलेले मत आहे. शिक्षण समाजामध्ये कशा रीतिने दिले जावे, शिक्षणात वेगवेगळ्या विषयांना स्थान काय आहे हे सुद्धा त्याचे ठरलेले आहे. मला दाखवायचय असं की त्याचा जो मूळ एक attitude आहे की जवळजवळ जीवनाची मूल्ये झालेली आहेत. Values of life. ज्याला आपण जीवनाची मूल्यें म्हणतो ती म्हणजे दुसरी तिसरी काहींच सून वेगवेगळ्या अभिवृत्तींमधून संघटित झालेली, सुसंगत अशी एक प्रणालिका म्हणजेच ही

जीवनमूल्यें असतात. जीवनाची मूल्ये म्हणजे प्रणालिका आहे. कशाची प्रणालिका आहे? अनेक attitudes ची, वेगवेगळ्या अभिवृत्तींची. एकमेकांशी कमालीची सुसंगत अशी एक प्रणालिका म्हणजे जीवनमूल्यें असू शकतात. आणि मला असं सांगायचय कि बरेच वेळेला ह्या ज्या अभिवृत्ती असतात, त्या एकमेकांशी निगडीत झालेल्या असतात. संगीताबद्दलची उदाहरणे प्रा. रानडे तुम्हा देऊ शकतील. आता नंतर असं बघूया की ह्याच्यामुळे काय होते? ह्याच्यामुळे असे होते की तुम्हाला जर एखादी, ह्या संबंध ह्या structure मध्ये विसंगती दिसली, inconsistency आली म्हणजे उदाहरणार्थ, असा माझा attitude आहे की जे काही communist आहे ते सगळं चांगल आहे, देशाच्या आणि जनतेच्या कल्याणाकरता आहे, वगैरे, वगैरे, वगैरे. आणि मग मला जर कोणी दाखवलं कि अहो, पण रशियामध्ये असं झालेलं आहे म्हणतात की currption चिक्कार आहे आणि गरीबांकरता काही फारसं चांगलं झालेलं नाही वगैरे वगैरे. म्हणजे कुणीतरी माझ्या मनांत ही आता inconsistency विसंगती introduce करण्याचा प्रयत्न करतो आहे. कसली विसंगती झाली? cognitive कारण माझा जो काही समज आहे रशियन संस्कृतीबद्दलचा, त्याच्यामध्ये एक नवा आता मला हा element कुणीतरी घुसडू बघतोय. मग मी काय करतो अशावेळेला? संघटना मी सांगतोय attitude ची. मग मी एक म्हणजे असं म्हणतो, 'वेडा आहेस तू. तुला कुणी सांगितलं हे? अरे खोटा असा प्रचार करतेय अमेरिका. हे सगळं खोटं आहे. मला स्वतःला माहीत आहे, असं काही नाही आहे चांगली स्थिती आहे. प्रचारावर भुलला.' म्हणजे मी काय करतो, ती गोष्ट मी संपूर्णपणे माझ्या मनामधून बाजूला ढकलतो, deny करतो. म्हणजे त्यातला जो cognitive element आहे तो मी शेवटी काय करायचा प्रयत्न करतो consistent राखण्याचा प्रयत्न करतो. इथे संघटन्बद्दल मला असं म्हणायचय की आपले जे attitudes असतात ते आपण सुसंगत ठेवायचा प्रयत्न करतो. काल मी तुम्हाला सांगितलं की एकदा ठरलं एखाद्याचं की भारतीय संगीताच्या दृष्टीने हे जे Harmonium, ती पेटी कसली आणलीय? त्याच्यात काही अर्थ नाही आहे. त्यातून आमच्या उपयोगी, आमच्या तऱ्हेचे सूर निघणं शक्य नाही. असा एखाद्या attitude असला आणि त्याला कोणीही उत्तम रीतीने पेटी वाजऊन दाखवली तरी तो ऐकायला तयार व्हायचा नाही. आणि प्रत्यक्ष ऐकली तरी म्हणेल, 'नाही रे ह्याची सर, तुला वाटतंय, आपल्या ह्याच्यामध्ये बसत नाही.' असच तो म्हणणार. त्याचा attitude fixed झालेला आहे आणि तो इतका complex असू शकेल की त्याना एका तऱ्हेनं गायलेलं, इतकी एका वेळेला मनुष्याची स्थिती होते, खेळणाराची होते तर संगीताची होत असलीच पाहिजे. एखादा बॅडमिंटन खेळत असेल तर त्याला एकाच कंपनीने बनवलेली रॅकेट आवडते. कारण तो अनेक रॅकेटस् बघतो आणि त्याचा एक opinion एका रॅकेटबद्दल झालय की त्यामुळे त्याला वाटतं की हा खेळ खेळायचा असेल तर माझ्या हातात याच, अशाच तऱ्हेची रॅकेट पाहिजे, असंच shuttle पाहिजे. असे त्याचे विचार आणि attitudes अगदी ठरलेले असतात. त्यात कुणी 'बदल' करु म्हणाल तर त्याला ते आवडणार नाही. मग खेळाला तो अनेक नावं ठेवील आणि म्हणेल, 'हे काही आजचं नीट जमलं नाही बुआ. तेवढी भट्टी जमली नाही आजची.' कारण त्याचं हे जे भयंकर well-knit असं structure आहे, त्याच्यामध्ये कुठेतरी विसंगती तुम्ही introduce केलेली आहे.

आता मी काय सांगतोय की वेगवेगळे जे attitudes असतात त्यामध्ये विसंगती कशी येते ? ह्याला कारणे दोनचार आहेत. एक म्हणजे, जगामध्येच प्रत्यक्ष विसंगति असते ना. समजा, एखाद्याचे मत असे झालेले आहे, की बायबल वाचलेले आहे ज्याने, की अमक्या अमक्या तारखेला जग निर्माण झालं, पण प्रत्यक्ष आता शास्त्र काही वेगळं सांगायला लागलय. मग आता प्रश्न आला की बायबलमधले सत्य मानावे, धर्मग्रंथातले सत्य मानावे कि शास्त्रातले सत्य मानावे ! मग काही काही माणसे काय करतात, 'शास्त्राचा हा विषय नाही रे बाबानो. तुम्हाला नाही समजायच हे. ह्या विषयावर बोलू नका तुम्ही. पूर्वापार ते ठरलेलंच आहे सगळं. ब्रह्मवाक्य आहे, शब्द आहेत ते, शब्दप्रमाण्य तिथे मान्य केलं पाहिजे. त्याचा अनुभव घेतला पाहिजे. थोडक्यात म्हणजे, तो आपली internal consistency आपला attitude maintain करील आणि जी नवीन elements तुम्ही घुसडून देताय त्याच्या attitudes मध्ये, तो deny करील. किंवा काय करु शकेल मनुष्य ? किंवा असं दाखऊ शकेल ; बरेच लोक असं करतात की तुम्हाला वरवर पहाता विसंगति ह्याच्यात वाटत आहे की शास्त्राने नव्या सिद्ध केलेल्या गोष्टी आणि धार्मिक गोष्टींही तशी नाही आहेत. नीट सखोल विचारांनी तुम्हाला असं कळेल की शास्त्र आणि धर्म ह्यांचं एकमेकांशी असं शत्रुत्व नाहीच आहे. तुम्ही वरवर अभ्यास करता दोन्हींचा. म्हणून तुम्हाला असं वाटतय. नाहीतर ते एमेकांशी सुसंगत आहेत. म्हणजे परत त्यांनी काय केलं ? त्यांनी सांगायचा असा प्रयत्न केला, की मी जे म्हणतोय, हे जे सबंध structure उभे आहे माझ्यापुढे, त्यात बदल करायची गरज नाही आहे. तुला बदल करायची गरज आहे.

आता, आपण एकाच अभिवृत्तीमध्ये काय तऱ्हेची संगती असते, organization structure त्यांचं काय असते हे बघण्याचा प्रयत्न करु या. मी तुम्हाला सांगितलं की एका attitude मध्ये तीन elements असतात. conative, cognitive आणि affective हा त्रिकोण आहे असं समजा. आणि त्याच्याबद्दल मी एक विधान असं करीन की आपला प्रयत्न नेहमी एका attitude बद्दल, एका अभिवृत्तीतल्या ह्या तीन element शी दिशा राखण्याकडे प्रयत्न असतो. म्हणजे एखादी गोष्ट जर आपल्याला एकदा आवडली, 'आवडली' affective आहे, भावनात्मक आहे. 'मला आवडलं' ह्याच्यापलीकडे काय बोलणार ? आवडलं. की मग त्याच्याबद्दलची जी आपली काही माहिती आहे ती सुद्धा आपण favourable मांडतो. समजा, एखादा मनुष्य आपल्याला आवडला कुठल्या ना कुठल्या कारणाने का होईना, 'आवड' ह्याला एकदा म्हटल्यानंतर त्याच्याबद्दलचा तो प्रामाणिक आहे, तो सज्जन आहे, तो दिसायला चांगला आहे, तो स्वच्छ आहे, तो टापटीप आहे, अनेक गोष्टींचा अंतर्भाव आपण त्यात करतो. कारण एकदा या अभिवृत्तीतला जो जो एक भाग आहे, त्याने एक दिशा पकडल्यांनंतर त्याच्याशी सुसंगत अशा उरलेल्या दिशा येतात. एक म्हणजे मग मित्र आवडला की त्याच्याबद्दलचं आपल्याला सगळं चांगल दिसायला लागतं. त्याने नव्या धंद्यात पदार्पण केलं, ज्यातलं त्याला काही कळत नाही. समजा, नोकरी सोडून, आणि त्याने नव्या धंद्यात पदार्पण केलं तर आपण म्हणतो, 'काय adventure some आहे !" म्हणजे, तो आपल्याला आवडत नसता तर आपण म्हणालो असतो "काय मूर्ख आहे ! ह्या भलत्याच वयांत हे चाळे ह्याला कुठून सुचले आता ?" त्याच्याऐवजी

आता आपण म्हणतो, "बघा धडाडी ! पंचेचाळीशी आली, पण नवा उद्योग करायची धमक आहे अंगात !" म्हणजे, मला काय तुम्हाला दाखवायचं आहे की आपण जी मते देत असतो ना, तिच्यामध्ये बरेचवेळेला वस्तुस्थितीपेक्षा interpretation जास्त असतं. कारण तो आपल्याला आवडतो, त्याचं आपल्याला सगळं आवडतं. तेव्हा आता आपण "त्याने मूर्खपणा केला" म्हणण्याऐवजी "त्याच्या अंगात धडाडी आहे या वयातसुद्धा असं करण्याची. बघा किती risk घेऊ शकतो !" असं म्हणतो. आणि conative aspect म्हणजे काय ? त्याच्याकडे जाणं, त्याला मदत करणं, वाटल्यास पैसे देणं, मग 'फसलो' म्हणणं, जर कळलं की त्याला त्यातलं काही जमलं नाही तर ; पण म्हणजे कृति, भावना ज्ञान हे जे attitude चे elements आहेत, त्यांचं एकमेकांशी 'समतत्त्व' आणि ज्याला म्हणायचं, लय साधण्याचा किंवा आबपण त्याच्यामध्ये एक संगति राखण्याचा नेहमी प्रयत्न करीत असतो. Thre is a balance. आणि असा जर balance टिकला नाही तर काय होतं ? समजा, आपल्याला जर असं वाटलं की ह्या तीन घटकांमध्ये विसंगती निर्माण झाली की ज्याला आपण अत्यंत सज्जन समजत होतो आणि जो आपला जीवश्चकंठश्च मित्र आहे, ज्याच्याबद्दलचं आपलं चांगलं opinion आहे, रोजचं जाणं येणं त्याच्याकडे आहे. कृति, मत चांगलं आहे, आवडतो, अशा माणसाबद्दल एकदम जर आपल्याला कळलं की ह्याला काल बँकेतून हाकलून दिला. त्याने पंधरा हजारांची अफरातफर केली होती. तर मग आपण ह्यावेळेला काय करु शकतो ? झालं, पाहिलत. मी काय सांगितलं की आपला जो एक element आहे, attitude एक आहे, त्यातले हे जे तीन elements आहेत, त्यातला एकाला कुणीतरी पाय हलवावा, तीन पायांचे एक टेबल आहे आणि त्यातला एक पाय, तंगडं कुणीतरी तोडून टाकवं तर टेबल कसं उभं रहाणार ? त्याला स्थैर्य येणार कसे ? अशी त्या attitude ची स्थिती झाली. मग आपण काय म्हणतो ? एक तर, "किटाळ आणलय ह्याच्यावरती कुणीतरी ! हा असं करणं शक्यच नाही. हेवेदारांनी मत्सर साधून त्याच्यावरती हा किटाळ आणलेला दिसतो." म्हणजे तरी आपण काय केलं ? टेबल उभे केले, त्याचा पाय आपण दुसरा उभा केला त्याला. किंवा मग असं म्हणू शकतो एखादवेळेस की समजा, सर्व बाजूंनी पुरावा आला की खरोखरच त्याने हे केलेलं होतं, तरी मग आपण असं म्हणू "मनुष्य गरजेच्या पोटी काय करत नाही मला सांगा ? अहो, तुम्ही सुद्धा हेच केलं असतं अशा परिस्थितीमध्ये." म्हणजे, तरीसुद्धा आपली जी आवड आहे त्याच्याबद्दलची, ती काही जात नाही आहे. एखादेवेळेला असंही होऊ शकतं की धक्का बसला आपल्याला. कारण पुरावा अगदी संपूर्ण आहे. त्याच्याबद्दल आता जागा नाही म्हणायला काही. मग आपण म्हणतो, "खरोखरच हां इतकी वर्षं फसलो खरा ह्या माणसानं" आणि मग, म्हणजे काय झालं ? हे जर negative मी मान्य केलं एकदा, तर मग हेही negative होणार. मग आपण म्हणणार, "नको तो मनुष्य ! त्याची संगत नको. मी चुकलो बुवा. माझं विधान त्या व्यक्तीबद्दलचं चुकलं." म्हणजे एका अभिवृत्तीमध्ये सुद्धा हे जे तीन घटक असतात, त्यांच्यामध्ये एक balance राखण्याचा प्रयत्न आपण सतत करत असतो. त्यातल्या त्यात balance जर महत्त्वाचा कुठला असेल, असं विचारल तर ही जी भावनात्मक आणि ज्ञानात्मक घटक आहेत त्यातले, त्यातला balance सगळ्यात महत्त्वाचा

असतो. म्हणून जर दुसऱ्याच्या अभिवृत्ती बदलायच्या असतील, change of attitudes, तर त्याला एक मार्ग म्हणजे त्याचा हा जो भावनात्मक भाग आहे तो बदलून टाकायचा किंवा त्याचं जे ज्ञान आहे एखाद्या गोष्टीबद्दलचं, ते बदलायचं, त्याच्यात inconsistency introduce करायची, विसंगति त्यात घालायची म्हणजे मग तो बदल करणं त्याला भाग पडायला लागतं. एक उदाहरण देतो, मग तुम्हाला कळेल. कल्पना करा की एखादा communist द्वेष्टा मनुष्य आहे आणि त्याचं असं म्हणणं आहे की ह्या कम्युनिष्टांनी रशियामध्ये जनतेची पिळवणूक केलेली आहे, ही एक तऱ्हेची हुकूमशाही आहे वगैरे वगैरे वगैरे. अत्यंत negative attitude आहे. आणि मग त्याच्यामध्ये तीन elements आहेत. Affectively he hates it. He doesn't like communism and Russian people of all the people. त्याच्याबद्दलचं त्याचं ज्ञान एवढं आहे की ही पिळवणूक आहे जनतेची, ही हुकूमशाही आहे, मनुष्याला त्याच्यात स्वातंत्र्य नाही आहे, संस्कृतीला काही अर्थ नाही आहे आणि अशी एक tendency आहे की मला त्याच्याबद्दल काही सांगू नका, मी तिकडे येणार नाही आणि माझा त्यांच्याशी काही संबंध नाही आहे वगैरे वगैरे. आता समजा की असा एक प्राध्यापक आहे, आणि तो असा प्राध्यापक, जो विचार मांडून आहे, त्याने कुठलंतरी काय फडतूस पुस्तक लिहीलं म्हणा काही केलं म्हणा, त्याला एका शूर माणसाने कुठेतरी काही बक्षिस दिलं चांगल्यापैकी आणि सांगितलं की हे बक्षिस तुम्हाला Indo-Soviet Society अशा असतात, त्यांच्यामार्फत दिलेलं आहे आणि त्याच्यामध्ये चार महिन्याचा रशियाचा दौरा आहे आणि शिवाय हे बक्षिस आहे. आता प्रश्न आला, inconsistency आली. जी गोष्ट त्याला बिलकुल आवडत नाही—रशियन माणूस आणि रशियनसंस्कृती त्याच्यामार्फत त्याला बक्षिस मिळालं आणि सांगितलं, 'रशिया पाहून यायचा ह्याच्यामध्ये अंतर्भाव झालेला आहे ह्या बक्षिसामध्ये.' एक मार्ग म्हणजे, तो असं म्हणेल, "ते शक्य नाही. माझ्याच्याने होणार नाही. अशाला मी फसणार नाही." किंवा दुसरा मार्ग म्हणजे, तो असं म्हणेल "ठीक आहे. बघून तर येऊया. बघायला काय ? माझे attitudes वेगळे असले, आवडलं नाही तरी प्रत्यक्ष संस्कृती कशी आहे ती बघण्याचा मला हा मोका मिळतोय आणि मला कळले तरी वस्तुस्थिती काय आहे." म्हणून तो जातो आणि जाऊन आल्यानंतर समजा, त्याची बडदास्त चांगली राखली, त्याचा ego सांभाळला, जर त्याचे favourable opinion त्या अनुभवातून झालं, जगप्रवास झाला, हिंडला फिरला तर हळुहळू मग त्याचं काय व्हायला लागतं ? परत आल्यावर त्या प्राध्यापकाच काय व्हायला लागतं माहीती आहे ? त्याचं cognitive element रशियाबद्दलचं बदलायला लागतं आणि त्याची जी पूर्वीची बोचरी टीका होती ती हळुहळू कमी होत होत ; एकेदिवशी तो पूर्ण कोलांटी उडी मारतो आणि मग म्हणायला लागतो, "मी पूर्वी ह्यांना फार शिव्या देत होतो पण आता मला अंतर्ज्ञान प्राप्त झालेलं आहे, आता मला खरं समजलेलं आहे. प्रत्यक्ष मी पाहिलय ना जाऊन." म्हणजे, कसे attitudes बदलू शकतात. त्याच्यावरती मी एवढेच तुम्हाला सांगेन की हे जे affective elements त्यातले असतात आणि cognitive असतात, ह्यांच्यात लढत लागली पाहिजे काहीतरी करुन आणि म्हणजे मग attitudes बदलायचा मोका निर्माण होतो.

आता, ही सगळी तात्विक चर्चा बाजूला ठेवून तुमच्याकडे येतो. तुम्ही काही बोलत नाही तेव्हा मी तुम्हाला आता असे प्रश्न विचारतो. रानडे तर सांगतीलच की तुम्ही हे सगळं आता ऐकलत, हे तीन भाग अभिवृत्तींबद्दलचे तुम्ही ऐकलेत आणि गाणारा आणि त्यांच्या पुढे बसलेला श्रोतृवृंद यांना या सगळ्या संकल्पनांचा वापर कशाप्रकारे करता येईल, ह्याच्याबद्दल तुम्ही जर मला काहीतरी आज दिलत तर मी फार उपकृत होईन आणि कालपासून असं सांगायचय प्रो. रानडे, की तुम्ही मी बोलल्यानंतर बोलला पण तिथे (फळ्यावर) खाली शद्ब demonstration लिहीलेला आहे. तेंव्हा आज तरी demonstration होऊ द्या. म्हणजे काल मला वाटत होतं, ज्यावेळेला ती perception ची तीन element मी सांगितली की जवळीक असली पाहिजे, वगैरे, ह्याचं कुणी जर आम्हाला demonstration दिलं, म्हणजे गाऊन म्हणा किंवा instruments नी, तर आम्हालाही कळू शकेल काहीतरी की बुवा ही जी perceptual structural elements मी सांगितलेली, आणि तुम्ही तुमच्या पुस्तकात सुद्धा ती लिहिलेली आहेत. तशी आता मी ही theory सांगितली. तुम्ही तर बोलालच पण आपल्यापैकी कुणी जर काही ह्याच्याबद्दल मला, आणि मी तुम्हाला विषय दिला की गाणारा किंवा instrumental music किंवा कुठलातरी performance, musical performance आणि त्याच्यापुढे बसलेला श्रोतृवृंद आणि त्याचे वेगवेगळे attitudes काय असू शकतील आणि त्यामुळे त्यांच्या reactions काय असू शकतील, त्याची implications काय असू शकतील आणि त्यामधून गवयांनी काय शिकण्यासारखे आहे, याबद्दल जर काही चर्चा झाली तर ती मला आवडेल.

प्रा० अशोक रानडे :

आता म्हटल्याप्रमाणे पुन्हा एकदा गाण्याची ही चर्चा आणून घडवायची आहे. कारण आपला उद्देश थोडासा मर्यादित आहे psychology हा प्रदेश एकंदर एवढा मोठ्ठा, प्रचंड आहे की ह्याचा अनेक क्षेत्रांशी त्याचा संबंध जुळतो. परंतु आपला उद्देश हा थोडासा असा आहे की हे संगीताशी जास्तीत जास्त आणून भिडवायचा प्रयत्न करायचा. तर तो प्रयत्न मघाशी झालेल्या चर्चेत काही मुद्दे निघाले, त्याच्या आधारे पुन्हा थोडासा पुढे नेऊ या. आज आपण जे attitude या विषयासंबंधी जे संबंध विवेचन ऐकलं त्या attitudes ची एक नऊ–दहा लक्षणसुद्धा त्यांनी आपल्याला सांगितली ती काही मी वाचून दाखवायची तुम्हाला आवश्यकता नाही. मला attitude ला एक 'स्थायीभाव' असा शद्ब सुचला. फक्त तो साहित्यचर्चेत एका विशिष्ट अर्थाने वापरला जातो म्हणून तो कदाचित इथे वापरायचा की नाही ? (फडके : त्याला sentiment असं म्हणतात. कारण ज्याला 'स्थिरवृत्ती' असं मराठीत म्हटलय त्याला अभिवृत्ती असं म्हणतात.) हो. तर हा एक शब्द तिथे नोंदवून पुढे त्याच्यामध्ये जे तीन elements असतात हे जे सांगितलं, तिकडे आपलं लक्ष मी वेधू इच्छितो. मला असं वाटतय की आपण cognitive आणि affective आणि conative असे आपण तीन elements हे सगळ्या attitudes मध्ये असतात, attitudes हे सर्व गोष्टी-विषयी माणसाला असतात ही दोन सूत्रं आपल्या दृष्टीने अतिशय महत्वाची असली पाहिजेत.

जे जे संगीत आपल्या कानावर पडतं, त्याचा काही ना काहीतरी अर्थ आपण लावत असतो. आणि त्या अर्थ लावण्यामध्ये पण अनुकूल आणि प्रतिकूल अशी प्रतिक्रिया आपली हमखास व्यक्त होते आणि ही व्यक्त होण्यामागे मग affective, conative आणखीन ही क्रियात्मक हे, ह्यातलं कुठलं तरी अंग जास्त प्रभावी ठरतं असं वाटतं. ज्यावेळेला शास्त्रीय संगीतकार हा सुगमसंगीता-विषयी बोलतो किंवा सुगमसंगीतकार, उदाहरणार्थ चित्रपटामध्ये जेव्हा शास्त्रीय संगीत म्हणून जे दाखवलं जातं तेव्हा असा कुठलातरी affective attitude च जास्त परिणामी झालेला असतो असं दिसतं उदाहरणार्थ, जेव्हा शास्त्रीय संगीतकार असं म्हणतात की हे Light music आहे, मला वाटतं की आपण ह्या तऱ्हेच्या संगीताला Light music असं म्हणत आलो हे सुद्धा मोठं बोलकं आहे. आपण त्याला heavy कां म्हटलं नाही आणि शास्त्रीय संगीतालाच heavy कां मानलं ह्याच्यामध्ये सुद्धा एक अधिक्षेप दिसतो. म्हणजे, ह्यात एक attitude च व्यक्त झाला आहे आणि तो affective आहे, असं मला वाटतं की हे एक हलक्या दर्जाचं संगीत आहे. ख्यालाला, आपण ख्यालाचा मूळचा अर्थ 'स्वेच्छाचार' हा फारसीतला लक्षात घेतल्यावर धृपदाच्या पार्श्वभूमीवर हे किती स्वच्छंदी गाणं आहे असं म्हणून आपण एक attitude च व्यक्त केला होता. आणि अशा तऱ्हेने भारतीय संगीताच्या इतिहासामधे, एकंदर जागतिक संगीताच्या इतिहासात अशी उदाहरणे भरपूर दिसतील. असं वाटतं की कलाकारांमधे हे जे तीन जे त्याची तत्त्व आपण म्हटली. elements म्हटली, ह्यातले affective elements जे जास्तीत जास्ती दरवेळेला प्रभावी ठरतं असं मला वाटतं आणि मग कदाचित संगीताविषयी वेगवेगळ्या प्रतिक्रिया ज्या व्यक्त होतात, त्याच्या मधे कलाकारांच्या बाबतीत पाहिले असता affective element, नंतर ज्याला आपण त्या संगीताचा विचार करणारे म्हणतो, त्याच्याबाबतीत cogntive element हे जास्त क्रियाशील होतं की काय असं वाटायला लागतं. कारण त्यांचे एकंदरच गाण्याकडे बघण्याचा दृष्टीकोन हा एकाच element ने प्रभावित झालेला असतो असं दिसतं आणि मग आता आपण ज्याचा उल्लेख केला की कदाचित हे तिन्ही elements ही एकमेकांशी balanced होणं, याच्यामध्ये त्या attitudes चं कार्यशील होणं अवलंबून आहे आणि त्यांना 'truth-fully operative' असं कदाचित त्याचं वर्णन करता येईल.

आपण त्याच्यामध्ये थोडासा जर आणखीन् विचार केला तर value expression सारखं एखादं function, कार्याचे जे आपण चार घटक पाहिले, त्याच्यामध्ये 'मूल्यवाचक' हा एक भाग आपण पाहिला. तर परकी संगीताविषयीचे आपले जे उद्‌गार आहेत ते जर, पाहिले तर मला वाटते ह्याच्यामध्ये आपण valuation वर एक contet देत असतो. उदाहरणार्थ, मला असं आठवतय की फॉक्स–ट्रँग्वेजनी जेव्हा भारतीय संगीताविषयी लिहिलय, त्याच्या पहिल्याच परिच्छेदात पुस्तकाच्या, त्याने भारतीय संगीताचा exotic music म्हणून उल्लेख केलेला आहे. तो म्हणतो, "भारतीय संगीताचे महत्त्व काय? तर जे संगीत हे प्राथमिक दर्जाच्या अवस्थेतल्या संस्कृतीच्या लोकांचं संगीत, आपल्याला ऐकायला मिळत नाही, ते भारतात ऐकायला मिळेल, म्हणून त्या संगीताचं महत्त्व आहे." म्हणजे एकीकडे तो संगीताला महत्व देतोय. पण ज्या कारणासाठी महत्त्व देतोय ते मात्र कारण

जे आहे, त्याच्यामधे त्याला जी value दर्शवायची आहे ती मात्र त्याने exotic म्हणून दाखवलेलं आहे आणि ह्याच अर्थाचे आपले परकीय संगीताविषयीचे उद्‌गार जे असतात, ते ह्यातऱ्हेने value-oriented असतात आणि इथे आपला attitude हा कार्य करायला लागतो तेव्हा विचित्र तऱ्हेने कार्य करतो असं आपल्याला म्हणायला पाहिजे. इथे knowledge चा जो content आहे, इथे फडके, एक चांगला वाद निघालेला होता मध्यंतरी, आणि त्याचा इथे संबंध पोहोचतोय असं वाटतय म्हणून मी हा मुद्दाम सांगतो. गुरुविषयी आदर दर्श-वावा की नाही शिष्यांनी? हा तो प्रश्न निघालेला होता आणि शिष्यांनी गुरुविषयी आदर दर्शविण्याचे जे काही एकंदर gestures म्हणू आपण की पाया पडणं किंवा जाऊन भेटी देणं याची आवश्यकता आहे कां? आणि हे दिल्यामुळे काही विद्येत भर पडते कां? असा प्रश्न होता आणि मग अर्थात् दोन पक्षोपपक्ष चांगले हिरीरीने मांडले गेले होते. असं म्हणण्यात आलं की ह्या पाया पडण्यात काहीही अर्थ नाही आहे. पाया पडण्यामुळे जर गाणं येत असतं तर ढोंग म्हणून पाया पडल्यानंतरसुद्धा गाणं आलें असतं. आणि मग दुसरा असा भाग मांडण्यात आला की हे केवळ असं नव्हे, तर इथे knowledge शी कसा संबंध पोहोचतो असं जर म्हटलं, तर ह्या attitude च्या विवेचनात ह्याची आपल्याला थोडीशी गुरुकिल्ली सापडते, अस मला वाटतं. समजा, शिष्याने गुरुविषयी आदराचा attitude ठेवला, तर ज्ञान घेण्याची क्रिया सुकर होईल आणि ज्ञान देण्याची क्रिया सुद्धा सुकर होईल आणि मग ह्या आदर दर्शविण्याची सुद्धा जी चिन्हं आहेत, त्याचीसुद्धा एक भाषा आहे आणि ती भाषा म्हणजे gesture language आहे असं आपल्याला मान्य केलं पाहिजे. आणि मग प्रत्येक समाजात आदर दर्शविण्याच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. आपल्या समाजात पाया पडणं ही आदर दर्शविण्याची पद्धती आहे आणि म्हणून पाया पडणं हे महत्वाचं आहे. तेंव्हा त्याच्यामागे ज्याला आपण attitude म्हणतो जिथे, मानसिक भाग तिथे आहेच. केवळ शरीरक्रिया ती नाहीच आहे. पण तशी कुठलीही क्रिया ही शारीर नसते हे ह्या दोनतीन व्याख्यानानंतर आपल्या एवढं लक्षात यायला पाहिजे. तेव्हा पाया पडणं हे ढोंग असणं, ह्याचा अर्थ त्याच्याहीमागे मानसिक प्रक्रिया आलेलीच असते. तेव्हा, तुम्ही पाया पडण्यामागे attitude मधे ज्ञानलाभाची नक्की खात्री जरी नसली तरी त्याच्यात शक्यता बरीच वाढते हे मात्र मला वाटतं, ह्या विवेचनातून लक्षात यायला पाहिजे. संघटनाचा एक मुद्दा मला अतिशय महत्वाचा वाटला आणि तो मला, घराण्याशी जाऊन पोहोचतो असं वाटलं. कि ज्याला तुम्ही फडके, hierarchically organized असं म्हटलत, ते बरोबर घराण्याचं वर्णन होत असं मला वाटतं. की संगीतातल्या बहुतेक सर्व गोष्टींच संघटन एकत्र करणारा आणि मग तिथे सुराला किती महत्त्व द्यायचं, हा सुराकडे बघण्याचा atti-tude आहे, ताल महत्वाचा नाही असं मानणंसुद्धा एक attitude च आहे आणि असं झाल्यामुळे एक संघटन सिद्ध होत असतं. आणि त्यामुळे मग काय होतं, कि तिथून जो पुढचा मुद्दा तुम्ही सांगितलात की 'दिसलेली बिसंगती नाकारणं' हा एक मार्ग राहतो किंवा सखोल विचारांती ही विसंगति म्हणजेच सुसंगती असं सांगणं, हे दोन्ही भाग येतात. आणि मग तिथे पुन्हा घराण्याच्या प्रश्नाशी आपण जाऊन मिळतो. आपण असं नेहमी म्हणतो की 'अमुक घराणं की नाही, हे सुरामध्ये रुतून बसलेलं असतं' किंवा 'अमकं घराणं जे आहे ना, ते तानेच्याच मागे लागलेलं आहे.' अस आपण त्याचं evaluation करत

असतो. मग तिथे पुन्हा मला असं वाटतं की हे attitude शी जाऊन पोहोचतय, की एक घराणं हे एक संघटन of attitudes असं आपण म्हणायला पाहिजे. आणि मग शेवटी त्याची संगति, त्याची internal संगती ही इतकी घट्ट विणेची असते कि त्यातला एखादा घटक तुम्ही बाजूला काढायचा असं जर म्हटलत तर बाकीचे घटक बिघडतात असं तरी म्हटले पाहिजे किंवा त्या घटकाचं काम बाकीच्या दोन घटकांनी केलेलच आहे असं तरी म्हणायला पाहिजे आणि नेमकं ह्याच तऱ्हेचं विवेचन आज केलं जातं आणि ह्याच तऱ्हेचा आग्रह धरला जातो. हा आग्रह हा वास्तव आहे म्हटल्यानंतर तो चूक किंवा बरोबर म्हणता यायचा नाही. तो तसा आग्रह दिसतो. फक्त ह्या आग्रहाचा अर्थ काय, तर तो एवढा एवढा आहे.

आपण पुन्हा एकदा घराण्याकडे यायचं, ह्याला कारण असं कि 'घराणं' हा आपल्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. आणि आपण सगळे नेहमीच त्याच्यावर आवेशाने बोलत असतो, more intensely than factually. आता, वस्तुस्थितीचं, सुरेल माणूस तालात चांगला असं आपण म्हणायला लागतो. म्हणजे काय ? की आपण जर असं म्हटल कि अमका माणूस सुरेल आहे–पण तो काही तालिया नव्हे. तर त्याच्या बाजूचा जो माणूस असतो, तो "तालिया म्हणजे तुमची व्याख्या काय आहे ? काय तालाशी झटापट करणं ? तिथे मारणं जास्त ? तो समेवर येतो ना बरोबर ? म्हणजे झाल" असं आपण लगेच म्हणायल लागतो किंवा ह्याच्या उलट, की "ते काय तालात येणं झाल काय ? दरवेळेला समेवर येणं म्हणजे काय समजणं आहे ? ह्या तालाचं तुमच्या pattern शी काहीतरी नातं राखाल की नाही ?" असं लगेच दुसरी बाजू मांडली जाते. ह्या दोन्हींमध्ये मला असं दिसतं की घराणं हे एक संघटन आहे, organization of attitudes आहे हे ह्याच्यामधून सिद्ध होतं. नाहीतर असे वाद संभवले नसते. हे वाद संभवतात ह्याला कारण, हे attitudes खरोखर पहाता, अगदी मानसिक भूमीच्या मळा.शी जाऊन पोहोचलेली गोष्ट आहे, असं म्हणायला पाहिजे. त्यातल्यात्यात आता गवयाचं गातानाचं बोलणं हा एक मला सुचलेला भाग आहे. त्यात मला असं वाटलं कि cognitive आणखीन् affective हे जे elements आहेउ, ह्यांच संतुलन करण्याचा प्रयत्न म्हणजे गवई गातांना बोलतो असं मला वाटतं. मला एक उदाहरण आठवतय की इथे शिवाजीपार्कला रहाणारे एक बंगाली गृहस्थ इथे आले, त्यांचं नांव रामचंद्र पालकीवा असं काहीतरी आहे. ते एका काळी संगीत दिग्दर्शन करीत असत. ते एक दिवस आले आणि त्यांनी मला एक हकीकत सांगितली. ते म्हणायला लागले की अहमदाबादला एक मोठी conference चालू होती आणि फैयाझ खाँ तिथे गाऊन गेले आणि फैयाझखाँनी कुठलीतरी त्यांची ललतमधली, कुठली चीज आहे ती ? फैयाझखाँची रेकॉर्ड ? ' तरपत हूँ जलबीन मीन' अशी चीज आहे. तर, ती चीज म्हणून दाखवली होती फैयाझखाँनी, ती गायली होती आणि नंतर ह्याचं गाणं होतं. म्हणजे interval झाल्यावर ह्यांचं गाणं होतं लगेच. त्याबरोबर ह्यांना प्रश्न पडला की आता आपण गाणं जमवायचं कसं ? तर मग त्यांनी काय केलं कि आज जी खाँसाहेबांनी एवढी चांगली चीज म्टली, त्या चीजेचा अर्थ काय आहे असं सांगणारं एक भाषण त्यांनी दिलं आणि ते असं म्हणाले, हा अमका शब्द अमक्या भाषेतला आहे, तो जर असा उच्चारला गेला असता तर

त्याच्यामधला अर्थ किती नीट व्यक्त झाला असता. असं सांगून त्यांनी एक मनोभूमिका तयार केली आणि ही, cognitive होती. म्हणजे भाषेतल्या शब्दांचे अर्थ वगैरे सांगत सांगत, त्यांनी आपल्यामधला affective जो काही भाग होता तो कमी पडणार होता हे त्यांना माहीत होतं. कदाचित् की परिणाम पूर्ण होणार नाही नाहीतर. म्हणून त्यांनी बोलून जरा एक पार्श्वभूमीवर तयार केली आणि मग थोडसं त्याला गाण्याचं शेपूट जोडलं. म्हणजे दोन्ही गोष्टी शक्य होऊ शकतात. माणूस जेव्हा अशातऱ्हेने balance साधण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्यामागचा हेतू जो असतो तो आपण लक्षात घ्यायला पाहिजे. पुन्हा आता त्यांनी एक अतिशय महत्वाचा मुद्दा मांडला आणि तो कालापासून त्यांच्या बोलण्यामधे येतोय. की ह्या-तऱ्हेने ह्या गोष्टी समजून घेतल्यानंतर आपण आपल्या श्रोतृवृंदावर काही नियंत्रण ठेवू शकू, प्रभाव पाडू शकू निश्चितपणे असा कुठेतरी ह्याच्यामध्ये एक सूर येतोय. तो सूर कितपत कसा, काय काय ग्रहण ठरेल हे कदाचित प्रयोगिक मानसशास्त्र असल्यामुळे ते नंतरच सांगता येईल. परंतु इथे मला तो येऊन भिडवायचाय तो इथे की cognitive आणि affective ही elements आहेत. ह्यांना जर आपण एकामध्ये कठेतरी बदल घडवून आणला तर दुसऱ्यामधे बदल घडणं हे अपरिहार्य असतं हे एकदा आपल्या लक्षात आलं की मला वाटत, बऱ्याचशा ह्या audience च्यावर प्रभाव पाडण्याचा ह्या माणसाच्या एक एक क्लृप्त्या (tricks) असतात, त्याचा अर्थ लागायला लागतो. जसं गातांना बोलणं हे जे म्हटलं कुठेतरी काहीतरी करुन audience ला capture करायचं हा जो भाग आहे, हा कशातऱ्हेने capture करायचं ? अनेकांचे अनेक मार्ग असू शकतात. म्हणजे काही वेळेला माणूस केवळ उशिरा येऊन 'मी महत्वाच' असं दर्शवतो. त्यात सुद्धा हाच भाग असू शकतो आणि काही काही वेळेला तो अतिशय साधेपणाणं येऊन, लोकांच्या समोर बसल्यानंतर, आपल्या खिशातून आपल्या गुरुचा फोटो काढून नमस्कार वगैरे करायचं, हा एक affective भाग असू शकतो. ह्या सगळ्यात तो काहीतरी balance साधायचा प्रयत्न करीत असतो. म्हणजे हे मार्ग बरोबर, वाईट, चूक, चांगले–वाईट हे आपण valuation करायला बसलेलो नाही. मला एवढेच म्हणायच आहे की इथे सारखं सांगत असांता ह्या गोष्टी अशा आहेत, ह्यांचं स्वरुप असं आहे, ह्यांचे परिणाम अशातऱ्हेचे होतात, इथंच आम्ही एवढच सांगून थांबवतो. हे परिणाम, हे असं होणं चांगलं–वाईट हे बोलत नाही. हा प्रश्न बऱ्याच वेळेला येणार आहे हा. आणखीन् इथे मला फडक्यांची मदत अधिक लागणार आहे. पुढे कदाचित् पाचव्या व्याख्यानाच्या वेळेला हा आपल्याला Ethics शी जाऊन भिडवायला लागेल प्रश्न. कारण, गाण्यातले बरेचसे प्रश्न जे आहेत ते शेवटी कुठेतरी ह्या level ला नेऊन लोक भिडवतात. म्हणजे, चांगलं वाईट, म्हणजे ते morally, इथपर्यंत जातात आणि कधीतरी आपल्याला त्या प्रश्नाशी मुकाबला करणं जरूर आहे.

Maharashtra Cultural Centre
Dr. Ashok Da Ranade Archives

संगीताचे मानसशास्त्र

व्याख्यान ४ थे

व्याख्याते : प्रा. कि. मो. फडके

आता आपण कालपर्यंत मनाची जी एक काळी पेटी समजून अभ्यासाला सुरुवात केली होती, त्याच्यामध्ये वेदन-संवेदन आणि अभिवृत्ती (attitude) या दोन संकल्पनांचा शिरकाव केला आणि साधारणतः मनोव्यापारांच्याबद्दल जास्तीतजास्त माहिती जमा करायला लागलो. परवाच्या दिवशी सांगितल्याप्रमाणे आजच्या व्याख्यानाचा विषय आणखीन् एक संकल्पना आहे आणि ती संकल्पना म्हणजे वर्तन–प्रेरण किंवा प्रेरणेचे मानसशास्त्र (psycho'ogy of motivation) हा आजचा विषय आहे. ही एक नवी संकल्पना मी यामधे मांडत आहे. प्रा. रानडयांना जेव्हा मी अगोदर व्याख्यानाचा आराखडा दिला होता तेंव्हा तो थोडासा वेगळा होता. आणि त्याच्यामध्ये अशारीतीने बदल केला आहे की प्रत्येक एक व्याख्यान हे एका वेगळ्या संकल्पनेवर व्हावे. त्यामुळे जरी काही लोक व्याख्यानाला येऊ शकले नाहीत आणि दुसऱ्या व्याख्यानाला आले, तरी त्यांचे नुकसान होऊ नये, निदान त्यांचे confusion होऊ नये, झाले तर एकाच विषयावर व्हावे एवढीच इच्छा आहे.

तेव्हा आजच्या या विषयामध्ये आपण प्रेरणेचे मानसशास्त्र आणि त्याचा संगीताशी संबंध काय पोहोचतो ह्याची चर्चा करु या. पहिल्यांदा आपण विचार करु या. आपली आता अभ्यास करण्याची पद्धत ठरल्यासारखी झालेली आहे. आपण काही प्रश्न चर्चेला घेऊ. प्रश्न पहिला असा प्रेरणा म्हणजे काय ? प्रेरणेचे मानसशास्त्र म्हणजे काय ? मनुष्य प्रेरीत झाला म्हणजे त्या शब्दाचा अर्थ काय घ्यायचा ? प्रेरणेचे वेगवेगळे प्रकार काय आहेत ? त्याच्याबद्दल काही उपसिद्धान्त, आपल्याला मांडता येतील काय ? त्याच्याबद्दल theory काही उपलब्ध आहे काय ? त्याचप्रमाणे संगीताचा आणि प्रेरणेच्या मानसशास्त्राचा संबंध कुठे, कोणत्या विषयाशी येतो जास्त करुन ? असे हे सर्व प्रश्न आज आपण चर्चेला घेणार आहोत.

सुरुवातीचा प्रश्न असा की प्रेरणा म्हणजे काय ? वर्तन प्ररण ज्याला म्हणतात, त्याचा अर्थ काय तो आपण समजून घेऊ या. इंग्रजीमधे ज्याला motivation त्याला मराठी लेखक 'वर्तन-प्रेरण' असे म्हणतात. म्हणजे 'वर्तनाची प्रेरणा'. असं थोडक्यात म्हणता येईल की तुमच्या वर्तनाला 'का ?' हा प्रश्न जर विचारला तर आपण तो प्रश्न विचारून प्रेरणेच्या मानसशास्त्राला हात घालतो. उदाहरणार्थ, मी जर विचारले तुम्हाला इथे विचारत नाही, पण समजा विचारलं की तुम्ही सगळे इथे का जमलेले आहात ? तर ह्याला जी जी वेगवेगळी उत्तरे मिळतील, ती म्हणजे प्रेरणेच्या मानसशास्त्रातली पहिली पायरी आहे.

उदाहरणार्थ, कोणी कोणी म्हणेल कि एक केवळ curiosity, जिज्ञासा की "हा काय प्रकार चालू केलाय प्रो. रानडयांनी ? बघू या तरी एकदा," इथपासून वेगवेगळी उत्तरे ते अगदी संगीताचे खरे अभ्यासक असतील, संगीतज्ञ असतील त्यांच्या दृष्टीने "बघू या, मानसशास्त्राचा आणि संगीताचा संबंध या व्याख्यानातून जोडण्यात येतो का ? जोडला तर कशाप्रकारे जोडण्यात येतो ?" आणि कुणाची कल्पना असेल की मी ही व्याख्यानं ऐकली तर न जाणो माझा जो stage वरचा performance असतो, त्यामध्ये काहीतरी बदल होईल, मला चांगल्या रीतीने गाता येईल, मला चांगल्या रीतीने वाद्य वाजवता येईल, अशीही कुणाची कल्पना असू शकेल. काही नाही तर कुणाला वाटत असेल असं की प्रो. रानडे बोलले "व्याख्यानाला गर्दी जमली पाहिजे. येत चला" मग भीड मोडवली नाही झालं. अशा अनेक प्रेरणा तुम्हा सर्वांच्या मध्ये असू शकतात. मला दाखवायचय असं, तुम्ही सर्वांनी ही जी एक क्रिया केलेली आहे, इथे जमणं, तिच्यामागे प्रेरणा वेगवेगळ्या असू शकतील. एकच क्रिया, response किंवा प्रति क्रिया असं आपण ज्याला म्हणू या जिच्यामध्ये कारणे अनेक असू शकतात ; जिज्ञासेपासून, अभ्यासापासून तो 'भीड मोडली नाही' इथ पावेतोच्या वेगवेगळ्या प्रेरणा कारणे त्याच्यामागे असू शकतात. आणि म्हणून आता आपण या प्रेरणेच्या मानसशास्त्राचा थोडासा अभ्यास करु या.

असं म्हणता येईल की ह्याच्याअगोदर ज्या दोन संकल्पनांचा अभ्यास आपण केला, एक म्हणजे वेदन–संवेदन (sensation-perception) आणि दुसरी म्हणजे अभिवृत्ती, (attitudes) ह्यासंबंधी असं म्हणता येईल की ह्या दोन संकल्पना आहेत, त्यापेक्षा आजची संकल्पना एका अर्थाने फार महत्वाची आहे, कारण ही जर प्रेरणाशक्ती मनुष्याच्या मनांत नसेल तर अभिवृत्ती काय, संवेदन काय सर्वच गोष्टी लुळ्यापांगळ्या पडतील. म्हणजे असं म्हणता येईल की प्रेरणेचे महत्व सांगायला, एखादे मोठे, आपल्या University च्या tower वरती जे घडयाळ आहे ना, ते चालू आहे म्हणजे असते, बहुदा, असावे अशी इच्छा आहे निदान. तर ते चालू असण्याकरिता त्याच्यामधे जी एक main spring असते, तीच जर समजा काढून टाकली किंवा ते जर electric वर घडयाळ चालत असेल ; तर त्याचा electric current जर बंद केला, बाकी यंत्रणा मात्र जशीच्या तशी ठेवली तर ते घडयाळ बंद झाले. म्हणजे उत्कृष्ट यंत्र हे आपल्या संवेदना, आणि इतर ज्या संकल्पनांचा आपण विचार केला अभिवृत्ती सारख्या, त्याच्यासारखं आहे. पण तिला चालना मिळाली पाहिजे. आणि देण्याचे काम जशी spring करु शकते mechanically, तशीच electric चा current करु शकतो आणि तोच जर बंद करुन टाकला तर ते घडयाळ बंद झालं–यंत्रणा कितीही उत्तम असो. तसच माणसाचं हे शरीर आणि वर्तन आहे ह्याच्यामधली ही जर प्रेरणाशक्ती काढून घेतली तर तुमच्या वर्तणुकीला काही अर्थच उरत नाही. वर्तणूक घडायचीच नाही. मग असं म्हणता येईल की प्रेरणा म्हणजे अशी काही तरी शक्ती की जिच्यामुळे तुम्ही उद्दीपित होता, तुम्ही कार्यान्वित होता. मनुष्य ज्यामुळे कार्यान्वित होतो, active बनतो, dead किंवा inert रहात नाही, तिला प्रेरणा असे म्हणायचे.

म्हणजे, प्रेरणेची दोन अंगे मी तुम्हाला सांगायचा प्रयत्न करतो आहे. एक म्हणजे, कुठल्या ना कुठल्या प्रकारे तुम्ही प्रज्वलीत होता, energized होता. तुम्हाला कुठल्यातरी तऱ्हेची शक्ती मिळाल्यासारखे वाटते, active रहाता तुम्ही. आणि दुसरी गोष्ट म्हणजे, नुसतेच काहीं तुम्ही active होत नाही, तर तुमच्या या कृतीला, ही जी कार्यान्वित तुमची स्थिती झालेली आहे, तिला कुठलीतरी दिशा प्राप्त होते, direction मिळते. तेव्हा प्रेरणेच्या मानसशास्त्रातले दोन मुख्य प्रश्न असे आहेत कि मनुष्य हा जसा उद्युक्त कसा होतो? कार्यान्वित कसा होतो? आणि तो एखादी दिशा कशी पकडतो? म्हणजे एखादी गोष्ट करण्याकरता तो अमकीच दिशा का पकडतो? असे हे दोन महत्वाचे प्रश्न आहेत. एकाला म्हणायचं इंग्रजीमध्ये 'energization', problem of energization, how an organism gets energized आणि दुसऱ्याला म्हणायचं, How he picks up a certain direction to satisfy his needs? असे हे दोन प्रश्न आहेत. एवढं डोळ्यापुढे ठेऊन आपण आता प्रेरणच्या मानसशास्त्रातले काही अगदी प्राथमिक स्वरुपाचे सिद्धान्त समजावून घेऊ या.

असं म्हणता येईल की आपले हे जे, मनुष्याचे वर्तन आहे, त्याचा जर आपल्याला एक नकाशा काढायचा झाला, तर मनुष्य हा गरजवंत प्राणी आहे असं म्हणता येईल. त्याला कसल्या ना कसल्या तरी गरजा सारख्या अनुभवाला येत असतात. तहान लागते ही एक गरज झाली, भूक लागते ही एक गरज झाली. झोप येते, तिसरी गरज झाली. अशातऱ्हेच्या अनंत गरजा मनुष्याला असतात आणि त्या गरजांमुळे काय होते? तर तो काहीं ना काही तरी प्रयत्न म्हणजे activity करायला लागतो. कुठलीतरी हालचाल त्याच्यामार्फत होते. ज्याला भूक लागली नाहीं, तहान लागली नाहीं, ज्याला काहीं समजून घ्यायचे नाही, करायचे नाहीं आहे असा मनुष्य काहींच करायचा नाहीं. तेव्हा गरजा याचा अर्थ काहींतरी तुमच्या शरीरामध्ये अथवा मनामध्ये की ज्यामुळे तुम्हीं उद्युक्त होता, प्रयत्न करायला उद्युक्त होता, आणि त्या उद्युक्त झालेल्या वर्तणूकीतून तुम्ही काहीतरी 'साधक वर्तणूक' करता. 'साधक वर्तणूक' हा इंग्रजीमधल्या instrumental behaviour या शब्दाचे भाषांतर आहे. म्हणजे, तुम्हाला जर वाटलं कि आपण गावं तर, किंवा जर एखादीं अगदी साधी जरी धून तुम्हाला आळवावीशी वाटली तर त्याला तुम्ही काहींतरीं एक कृति करता, मग तुमच्या हातामध्ये तुम्हीं कुठलंतरी एक instrument घ्याल, म्हणजे कुठलीतरी साधक वर्तणूक, instrumental म्हणजे याचा अर्थ की ज्यामुळे तुमचा उद्देश सफल होईल अशी काहीतरी कृति तुम्ही करता. पहिल्यांदा मी सांगितलं, गरज वाटणं, म्हणजे उदाहरणार्थ, घसा कोरडा पडणं आणि तहानलेलं वाटणं याच्यामुळे तुम्हीं हालचाल सुरु केलीत. मग कदाचित् तुम्ही जाऊन कोकाकोला प्याल, नाहीतर आणखीन् काही प्याल, काय प्याल हे साधक वर्तन तुम्ही जे ठरवलेलं आहे त्यावरुनच ठरेल आणि त्यामुळे काय होईल की ह्या तुमच्या साधक वर्तणूकीतून तुमचे उद्दिष्ट साध्य होईल. तुमच्या तोंडात पाणी, कोकाकोला नाहीतर काहीतरी पडलं थोडसं, शांत वाटलं आणि गरजेचं शमन झालं असं म्हणता येईल की ह्याला 'उपशमन झाले' तुमच्या गरजेचे. पण मनुष्य असा नाहीं आहे की गरज संपली, उपशमन झालं. आता पाणी प्यालो, आता काही वाटणार नाहीं. मी तुम्हाला

सांगितलं की मनुष्य हा गरजवंत प्राणी आहे. म्हणजे, एक गरज संपली तरी दुसरी जन्म घेते. तीच गरज काही थोडया वेळाने परत वाटायला लागते. आपले संबंध आयुष्य हे अनंत तऱ्हेच्या गरजांनी असे हे जटिल झालेले आहे. हजारो गरजा आपल्याला असतात आणि त्या आपल्याला सारख्या प्रेरित करत असतात.

म्हणजे, मला दाखवायचय असं की मनुष्यमात्र हा कधीही स्थिर inert असा नसतो आणि तो जेव्हा असा होतो, तेंव्हा आपण म्हणतो, 'तो मेला' किंवा काही काही लोकांबद्दल आपण म्हणतो, 'हा जगून मेल्यासारखाच आहे?' म्हणजे, ह्याचा अर्थ असा की जिवंतपणाची लक्षणं त्याच्यात म्हणावीत तशी दिसत नाहीत. त्याचा अर्थ, कुठल्या एका विशिष्ट अशा गरजेपोटी धडपड करण्याची त्याची वृत्ती, ही धडपड आहे. गरजेतून धडपड जन्माला येते आणि त्या धडपडीतून काहीतरी एक दिशा आपण पकडतो. कशा प्रकारची? की ज्यामुळे उद्दीष्ट साध्य होईल आणि त्यामुळे आपल्या गरजेचं उपशमन होईल आणि ह्या उपशमनानंतर थंडपणा होत नाही, तर त्यानंतर दुसरी गरज जन्माला येते, किंवा तीच गरज काही काला-नंतर परत भासायला लागते. तेव्हा असं म्हणता येईल की आपले सगळे मनोव्यापार, आपलं सगळं वर्तन, आपल्या सगळ्या अनुभवविश्वाबद्दल एक असं म्हणता येईल की आपण गरजवंत असतो, आपल्याला ही नाहीं ती, गरज उद्युक्त करत असते आणि त्यामुळे आपण प्रज्वलीत होऊन काहीतरी कार्यान्वित होत असतो.

आता असं जर असेल तर साहजिकच प्रश्न येतो की किती तऱ्हेच्या गरजा मनुष्याला आहेत? त्यांची काही वर्गवारी करता येईल कां? त्यांचा संगीताशी काही संबंध आहे काय? वगैरे प्रश्न आपल्याला विचारात घेता येतील. आतापावेतो मी फक्त गरजेचे मानसशास्त्र म्हणजे काय? ह्याची थोडीशी चर्चा केली.

ही गोष्ट उघड आहे की संगीताची मैफल जर आपण डोळ्यापुढे आणली तर अनेक ऐकणारे, श्रोतृसमुदाय आणि गाणारा आणि त्याचे साथीदार अशा काही व्यक्ती त्याच्यामध्ये येतात. आणि ते काहीतरी करताहेत. बहुदा ऐकणारे सुद्धा झोपलेले नसावेत, काहीतरी ते करतायत. म्हणजे त्यांना काहींतरी गरजा असाव्यात, नाहीतर ते एकत्र आले नसते आणि त्या गरजांचं उपशमन होत असावं. नसेल तर मग आपण म्हणतोच की 'त्याच्यावर अंडी फेकली, लोक कंटाळले आणि मग निघून गेले.' म्हणजे, म्हणाव्या तशा त्यांच्या गरजा भागल्या नाहीत, त्यांच्या ज्या अपेक्षा होत्या, त्यांची परिपूर्ती होऊ शकली नाहीं. थोडक्यात म्हणजे मैफलीपलिकडे आपण ह्या गरजांचे अशमन दोघांच्याही, दोन्ही बाजूच्या गाणारे, त्याचे साथीदार ह्यांनाही काहीं गरजा आहेत. ते काही कायम परोपकार म्हणून गात नाहीं आहेत. त्यांनाही काहीतरी साध्य आहे आणि त्या साध्याच्या पोटी ते काहीतरी कृति करत आहेत आणि जे ऐकणारे आहेत, त्यांच्याही काही विशिष्ट गरजा आहेत, अनंत तऱ्हेच्या गरजा आहेत आणि त्यांचं अशमन करण्याच्या ते नादात आहेत. आणि जितक्या प्रमाणात दुसऱ्या बाजूचे अशमन करत राहील तेव्हा आपण म्हणतो 'ते complementary आहेत' किंवा 'ते एकमेकाला पूरक ठरतील.' म्हणजे, चांगली तान मारली तर लोक त्याला 'दाद' देत आहेत. म्हणजे

त्यांचीही काही गरज आपण पुरी करतो आहोत आणि गाणाऱ्यालाही काहीतरी समाधान
मिळतय त्याला 'दाद' मिळाल्यामुळे. अस हे एकमेकांवरचं, आपल्या मनोव्यापारांचं, एकमेकां-
वरचं 'परस्परावलंबन' आहे असं मैफलींच्या बाबतीत आपल्याला म्हणता येईल. म्हणून आपण
तो विषय शिकला पाहिजे. त्याची काहीतरी उपयुक्तता आपल्याला होऊ शकेल. हे सांगायचं
कारण इतकच की प्रेरणेच्या मानसशास्त्राचा आणि गाण्याचा संबंध काय ? मी दोनच पदं
त्यातली सांगितली. गाणारे, त्याचे साथीदार वगैरे, मग ते instrumental music असेल
नाहीतर vocal असेल, आणि श्रोतृसमुदाय पण. आणखीन् एका गोष्टींचा विचार मला
करावासा वाटतो आणि तो म्हण्‌जे, परवाच्या दिवशी प्रा. रानडे बोलले त्यावरुन मी तो
add करतो, की ह्या संगीत व्यापारामध्ये गुरूची गरज आणि शिष्यत्व पत्करण्याची गरज
अशीसुद्धा आपण एक-दोन अंग चर्चेला घेऊ शकतो. एखाद्याचं शिष्यत्व मी कां पत्करतो ?
कां ? हा प्रश्न आला मला. तर मला सांगायचय, वर्तणुकीला ज्या ज्या वेळेला आपण
'का ?' हा प्रश्न विचारतो त्यावेळेला आपण त्याच्या प्रेरणेबद्दल चर्चा करत असतो. त्याच-
प्रमाणे एखादा गुरु असतो तो एखाद्याला शिष्यत्व बहाल करतो किंवा करत नाही. मी अम-
क्याला शिष्यत्व देणार नाही असं म्हणत असतो ते तरी कां ? त्याच्यामागे काय त्याच्या
प्रेरणा असाव्यात ? याची आपल्याला चर्चा करता येईल.

आता ढोबळमानाने प्रेरणेच्या मानसशास्त्राची ओळख करुन घेतल्यानंतर त्यातल्या ज्या
गरजा आहेत त्यांची जरा जास्त खोलात जाऊन चर्चा करु या की खरोखरी मनुष्याला कोणत्या
प्रकारच्या गरजा आहेत ? त्यांचे ऊपशमन कोणत्या प्रकारे होऊ शकते ? आणि संगीताच्या
बाबतीत त्यांचे उपशमन कशाप्रकारे होत असते, होत नसते. असे म्हणता येईल की मनु-
ष्याच्या ज्या गरजा आहेत त्याच्यातला अगदी मूलभूत असा काही सिद्धांत असेल तर त्यातल्या
काही गरजा ह्या जैविक स्वरुपाच्या आहेत, biological आहेत, शारिरीक आहेत.
मनुष्याच्या बऱ्याचशा गरजा शारिरीक जैवीक (जीव या शब्दापासून) biological
अशा तऱ्हेच्या त्या आहेत. उदाहरणार्थ पाणी, अन्न, निवारा, वस्त्र काहीतरी कृति करणे ;
activity, झोप ह्या गरजा अशा आहेत की त्या काहीतरी मूलभूत अशा स्वरुपाच्या
आहेत. म्हणून या त्रिकोणाच्या पायाला मी त्यांची मांडणी करतो आणि सांगतो की ही
आपल्या गरजांची पहिली पायरी आहे असे समजू या. base आहे हा. pyramid चा
हा base आहे. base असण्याचे कारण असे की आपल्याला अन्न, वस्त्र ,पाणी ह्या
ज्या गरजा आहेत, त्यांचे उपशमन झाले नाहीतर संगीताबद्दल किंवा कुठल्याही कलेबद्दल
फारशी गरज आपल्या मनात रहाणार नाही. सर्वसामान्य नियम मी करतोय. त्याला
अपवादही काही आहेत ते मी नंतर सांगेन. पण मला असं सांगायचय कि मनुष्याचे जे वर्तन
आहे त्याच्या मूळाशी काही जैविक गरजा दडलेल्या आहेत. अनंत तऱ्हेची आपण drinks
किंवा मद्ये पीत असतो. अनंत रीतीने म्हणजे आपण आपली जी मुळात तहानेची गरज आहे
ती भागवू शकतो. तिचे विविध प्रकार आहेत. तीच गोष्ट अन्नाची. नुसती आपल्याला
अन्नाची गरज आहे असं नाही, तर विविध तऱ्हेच्या अन्नाची रुचि आपण वाढवलेली आहे
आणि ती सुद्धा मग आपली एक गरज होऊन बसते. मग आपण म्हणतो की अमकं अमकं
सकाळी मला खायला असल्याशिवाय न्याहारीला, माझं चालणार नाही. म्हणजे हे जे मी

आता सांगितलं ते instrumental behaviour. मला नुसती खायची गरज नाही आहे.
मला अमकी एक गोष्टच खायची गरज आहे. गवयालाही कदाचित् तसेच वाटत असेल
की संध्याकाळच्या वेळेला हा राग गायल्याशिवाय मला बरं वाटणार नाही, माझी ती तशी
आहे. सकाळी उठुन रियाज केल्याशिवाय मला बरं वाटणार नाही. अशापर्यंत त्याची प्रेरणा
येऊन ठेपलेली असू शकेल. ही जी पहिली पायरी आहे तिला मी 'जैविक गरजा' असं
म्हणतोय. याचं कारण असं कि त्यांचा जन्म हा साधारणत: आपल्या शरीरशास्त्रीय रचने-
मध्ये किंवा आपण एका प्राणीमात्रांचे वंशज आहोत ह्याच्यामुळे जन्माला आलेली, biological
गरज असते. म्हणन त्याच्यामध्ये मी झोप, क्षुधा, तृष्णा अशा गोष्टींचा समावेश केलेला
आहे.

ह्याच्यानंतरची जी दुसरी गरजांची पायरी आहे, तिच्यामध्ये आपण सुरक्षितता, safety
आणि security त्याला आम्ही इंग्रजीमध्ये म्हणतो. आपल्याला नुसतच काही आज
अन्न हवय असं नाही तर ते उद्याही मिळावं, नेहमी मिळत रहावं, आपल्या मुलाबाळांचं
insurance करावं हे सर्व म्हणजे काय ? तर ही safety-security ची गरज आहे,
काहीतरी आपल्याला स्थिरता असावी, safe वाटावं ही एक गरज मनुष्याच्या पोटी असते.
ही safety physical ही असते. म्हणजे, शारिरीक सुद्धा असते म्हणूनच आपण
थंडीमध्ये जास्त कपडे वापरतो आणि स्वतःचा बचाव हा आपल्यावरती जे अनंत तऱ्हेचे
उद्दीपक येत असतात त्यांच्यापासून करण्याच्या प्रयत्नात असतो. म्हणजे शारिरीक स्वास्थ्य,
एक तऱ्हेची safety, सुरक्षितपणा यावा यासाठी आपली धडपड असते. ही दुसऱ्या तऱ्हेची
गरज म्हणता येईल. 'दुसऱ्या तऱ्हेची' म्हणण्यांच कारण असं की त्यांचा उगम हा साधारणत:
आपल्या ज्या मूलभूत गरजा आहेत त्यांच्यानंतर लावला पाहिजे. अशी कल्पना करा, ज्याला
मुळी खायची भ्रांत आहे त्या माणसाला life-insurance वगैरे गोष्टी कळणार नाहीत.
security चा प्रश्न नाही आहे, आज त्याच्यापुढे आजची दुपार कशी भागवायची हा प्रश्न
आहे, त्याची ती मौलिक गरज झालेली आहे. तिचा परिणाम असा की अशी मूलभूत गरज
जर भागलेली नसेल तर आपले सगळे मनोव्यापार त्या एका गरजेने गांजलेले जातात. बाकी
सुचत नाही आपल्याला काही. बाकीच्या सगळ्या गरजा लुळ्या पांगळ्या पडल्यासारख्या
होतात, आणि याच्याउलट एकदा का ह्या नेहमीच्या गरजा भागल्या आपल्या, आणि
सांस्कृतिक समाजात इथे आलेल्या आपल्या सर्वांच्या भागलेल्या आहेत. त्यामुळे असे होते की
त्यांचे महत्त्वच आपल्याला कळेनासे होते. जेवण, तहान ह्या गोष्टींची चर्चा आपल्याला क्षुल्लक
वाटते. कारण त्या गरजा आपण भोगलेल्या आहेत म्हणन. तीच गोष्ट मी ज्याला activity
म्हणतो, हालचाल करण्याची गरज असे मी ह्यात म्हटलेले आहे पहिल्या तऱ्हेच्या गरजेत.
म्हणजे काय, तर समजा आपण रेल्वेमध्ये चार तास नुसते एका बाकावर बसलो, बसायची
जरी जागा मिळाली तरी नुसत्या बसण्याचासुद्धा आपल्याला कंटाळा येतो. पाय मोकळे करुन
यायला आपण station वर उतरतो. कारण नुसते बसून आपल्या स्नायूंची ही जी अशी
एक condition झालेली असते, ती आपल्याला सहन होत नाही. त्याला चलनवलनाची
आवश्यकता असते. ती शारिरीक गरज असते.

त्याच्यानंतरची गरज म्हणजे safty-security , सुरक्षितता ही जी आहे तिच्या
त्याच्यानंतरची गरज म्हणजे सुरक्षितता जशी लागते, तशी काहीतरी मानसिक
बद्दल मी असेच म्हटले की शारिरीक सुरक्षितता जशी लागते, तशी काहीतरी मानसिक
सुरक्षिततासुद्धा आपल्याला हवी असते. ह्याचा अर्थ, चार लोकांमधे आपल्याला काहीतरी एक
ठरलेले स्थान हवे असते. त्याचा आपण नंतर विचार करु.

तिसऱ्या तऱ्हेची जी मी पायरी घेणार आहे चर्चेला, तिला 'सामाजिक गरजा' असे
म्हणुया. ह्या सामाजिक ह्याचा अर्थ असा की मनुष्य हा एक असा प्राणी आहे की जो समाज-
प्रिय आणि सामाजिक आहे. ह्याचा अर्थ असा की तो काही एकटा रहात नसतो. हिमालयात
राहून जे तपस्वी असतात ते एकटे रहातात, संन्यास घेतात. पण आपण सर्वसामान्य माणसं
जी असतो ती समाजात एकत्रिपणे रहात असतो आणि आपल्याला इतर माणसांची गरज
असते. कशा अर्थाने गरज असते इतर माणसांची ? आपले रोजचे व्यवहार चालू ठेवायला
लोकांवर आपण लोकांवर अवलंबन असतोच पण त्याहीपेक्षा त्यांची मैत्री, त्यांचा सहवास हा
आपल्याला प्रिय असतो. आपल्याला जे काही आवडलेले असेल ते दुसऱ्याला सांगावे, त्याच्याकडून
वाहव्वा मिळवावी, आपले विचार दुसऱ्याबरोबर मांडावेत, त्याचे विचार आपण ऐकावेत ही जी
एक माणसाची सहवासाची गरज आहे, ती आपण माणसाची तिसरी गरजांची पायरी कल्पूया.
सामाजिक गरज असं मी त्याला म्हणतो. म्हणजे, समाजात रहाणे, चारचौघांत मिसळणे,
सुखदुःखाच्या गोष्टी करणे, त्यांचे विचार समजऊन घेणे, आपले त्यांना सांगणे थोडक्यात म्हणजे
एकमेकांची संगत हवीशी वाटणं ही सुद्धा माणसाची एक सामाजिक गरज आहे. म्हणून बरेच
वेळेला असं होतं की मनुष्य जेंव्हा आपले गांव सोडन दुसऱ्या ठिकाणी जातो तेंव्हा त्याला
एकलकोंडेपणा वाटतो. म्हणजे काय होतं कि त्याचा जो नेहमीचा मित्रपरिवार जो असतो
तो बाजूला राहिला आहे. आता कुणाशी मिसळावं असा त्याला प्रश्न येतो. कामधंदा झाल्या-
नंतर मग त्याला काय करावं हे कळत नाही. म्हणजे तो उद्युक्त झाला बघा, मला काय
दाखवायचय ? ऑफीस संपलं, पांच वाजले, आता त्याची गरज आहे आपल्या नेहमीच्या
मित्रमंडळीत चहापाणी करावं आणि जरा गप्पाटप्पा कराव्यात. पण मित्रमंडळी नाहीत
नव्या गावात आला आहे. आता, उद्युक्त झालेली प्रेरणा शमन होऊ शकत नाही
instrumental behaviour. मग कुठल्या ना कुठल्यातरी मार्गांनी तो हे जे tension
आलेले आहे त्याच्यामध्ये, ताण आलेला आहे त्याच्या मनावर, जो त्या ताणाचं विवेचन
करण्याचा प्रयत्न करतो आणि त्यामधन मग तो थोडंसं, त्या सिनेमाला जाऊन बसू या, म्हणजे
problem मिटला. आणि म्हणन तिकीट काढन कुठल्यातरी थिएटरात जाऊन बसतो
त्यावेळेला ताण जो आलेला असतो तो सैल झालेला आहे. आणि अशाप्रकारे एक दोन
दिवस झाल्यानंतर न जाणो तेच तो कि आपलं ऑफीस झालं सिनेमाला जावं म्हणजे झालं!
कुणी वाचनालयात जाईल, कुणी आणखीन् काही करील. मला सांगायचय असं कि एखादी
गरज ज्यावेळेला तुम्हाला उद्युक्त करते त्यावेळेला तिचे उपशमन झाल्याशिवाय ह्या नाही
त्या रीतीने, तुम्ही स्वस्थ बसत नाही. तुमच्यामध्ये ही अस्वस्थता कायम राहते. Tension
हा शब्द त्याच्याकरता मी वापरला. म्हणजे, ह्या ज्या गरजा आहेत त्या माणसाला उद्युक्त
करतात, tension निर्माण करतात त्याच्यामधे आणि त्यांचे परिशमन होण्याची आवश्यकता
आहे. ह्या सामाजिक गरजांच्या पोटीच आपण मैफलीचे analysis नंतर करू या.

आता चौथी जी पायरी आहे, पायऱ्या पांचच आहेत. नाहीतर तुमच्यात tension निर्माण होईल कि ह्या pyramid मध्ये मी किती पायऱ्या भरणार आहे ? म्हणून आधीच सांगतो की एकण पाचच पायऱ्या आहेत. तर ही चौथी जी पायरी आहे तिला आम्ही इंग्रजीमध्ये ego-need असे म्हणतो. स्वत्त्वाच्या, मी पणाच्या ज्या आपल्या गरजा असतात, मी कुणीतरी आहे, मला समजतात काहीतरी स्थान आहे, मला कुठल्यातरी विषयात, कुठल्यातरी कलेत गती आहे, त्या क्षेत्रात मला काहीतरी विशिष्ट दर्जा प्राप्त झालेला आहे आणि थोडक्यात म्हणजे "मी कुणीतरी आहे" हा जो अहंभाव असतो, मीत्त्वाची कल्पना, स्वत्त्वाची कल्पना, ते तिच्याशी निगडीत झालेल्या गरजांची एक पायरी आहे आणि मग त्याच्या मधून अनेक गोष्टी होऊ शकतात बर का ! गरज एकच असते, मग त्याच्यापोटी काय होऊ शकते ? काही लोकांना वाटायला लागते की आता एकण माझी नौकरी आणि माझा हा दर्जा, माझी ही मोटार, रहाण्याची जागा विचारांत घेता, आता काही ना काहीतरी करुन मला ह्या रोटरी क्लबचा मेंबर झालं पाहिजे कारण तसे झाल्याशिवाय एकूण मला जे स्थान हवय ते मिळाल असं वाटणार नाही. मग रोटरीचे नाही मिळालं तर मी काय करीन ? आणखी दुसऱ्या कुठल्यातरी club चे मिळवण्याचा प्रयत्न करीन. म्हणजे मला ही जी मीत्त्वाची कल्पना आहे ego-need, माझी आहे, ती भागवण्याकरता अनेक गोष्टी मी करु शकतो. मोटार विकत घेणे हेसुद्धा मनुष्य फक्त त्याच्यामुळे transport ला म्हणजे यायलाजायला फायदा मिळतो एवढ्याच कारणाकरता मनुष्य मोटर विकत घेत नसतो. मुंबईत तसं करण्याची गरज नाही आहे. बऱ्याच टॅक्सी available आहेत आणि मोटरची कटकट विचारात घेता मनुष्य कां बरे मोटार विकत घेतो ? तर त्याला बरेच वेळेला कारण असे असते की पदरी मोटर बाळगणे म्हणजे ह्याला एक सामाजिक स्थान असणे, त्याची ego needs त्याच्यातून परिपूर्ण होत असते आणि त्याच्यामुळेच बरेच वेळेला संगीताच्या मैफलीला कित्येक लोक असे जाऊन बसलेले असतात ज्यांना त्यातले टिम्म कळत नसते. परंतु त्यांनी जगामधे एक दर्जा मिळवलेला असतो आणि त्यांना स्वतःची अशी एक प्रतीमा project करायची असते की "हे अमकेअमके नुसते engineer नाही आहेत, त्यांना संगीताचे फार आहे बरं !" हे मी जेव्हा जेव्हा "फार आहे बरं !" ऐकतो तेंव्हा मी खोलात जाऊन विचारतो 'फार' म्हणजे काय ? सांगा मला ! "म्हणजे त्यांना त्याची आवड आहे." म्हणजे काही शिकले-बिकलेयत ? समजत कां ? राग ओळखता येतो कां ?" "नाही, आमच्याइतपतच आहेत" म्हणजे नुसतच त्यांनी आपलं एक आवरण निर्माण केलेलं आहे की कुठलीही मैफल असली की मी अगदी हजर असणारच तिथे. असे एका मैफलीबद्दलच नाही बरेच लोक अशारीतीने आपली अशी प्रतिमा तयार करत असतात. काही क्रिकेट शौकीन असे असतात, काय मोट्ठ क्रिकेटमधलं कळतं असं नाही परंतु क्रिकेटमध्य म्हणजे अगदी सीझन आला की ते अगदी जाणारच. "आमचे हे ना," बायका सांगतात, "अगदी रजा टाकून क्रिकेटला जातात" म्हणजे त्यांनी आपली अशी स्वतःची कल्पना करुन घेतलेली आहे की त्यांना खूप क्रिकेट मधलं समजतं. प्रत्यक्ष समजत असेल अथवा नसेल पण त्याच्यामध्येही ego need वास करीत असते.

आता शेवटची जी पायरी आहे, मनुष्याच्या गरजांची सर्वोच्च जी पायरी आहे तिला आम्ही इंग्रजीमध्ये self-acualization असे म्हणतो. The need or the desire for self-acual zat on, त्याला आपण 'आत्माविष्कार' असे म्हणू या. फारसा काही चांगला शब्द आहे असं मला वाटत नाही पण मी त्याचा अर्थ नीट समजाऊन सांगतो. आपल्या जवळ ज्या काही वेगवेगळचा abilitics असतील त्यांना वाव करुन देणे, त्यांचा आविश्कार, त्यांची अभिव्यक्ति करणे याची माणसाची सारखी धडपड चालू असते. आणि त्याच्यामध्ये त्याला एक आनंद मिळत असतो, तो काही फक्त ego-needs नाही आहे तर जी कला आपल्यामध्ये आहे, जे गुण आपल्यामध्ये आहे त्यांना वाट करून दिल्याशिवाय त्याला चैन पडत नाही म्हणजे एखादा मनुष्य अशी कल्पना करु या की चांगल्यापैकी लेखन करु शकतो, त्याच्याकडे चांगली कला आहे ही लिहीण्याची. परंतु बिचारा कुठेतरी खर्डेघाशी करीत बसलेला आहे आठ तास. मग ती नोकरी तो केवळ पोटापाण्याचा व्यवसाय म्हणून बघतो आणि रात्री किंवा सकाळी फावल्यावेळामध्ये कुठे काव्य करील, कुठे काही लिहील. दरवेळेला काही त्याच्याकडून त्याला काही पैसे मिळत असतातच असे नाही पण मनापासून त्याला जी एक आतून आंच निर्माण झाली आहे, की जी त्याच्यामध्ये कला आहे, आणि तिचा आविष्कार झाल्याशिवाय त्याला चैन पडत नाही, म्हणजे त्याला आम्ही self-acualization, म्हणजे watever we are, we want to materialise our potentialities. We want to actualise life. आपल्याजवळ असलेल्या ज्या अनेक potentialites 'शक्यता' असं म्हणता येईल, abilites असतात. त्यांना वाव करुन देणं आणि शक्यतो जास्तीत जास्त त्याचा उपयोग करुन घेणं, materialize करणं या गोष्टी बीजरूप असलेल्या आपल्या ज्या प्रेरणा असतात, त्यांना प्रत्यक्ष जीवनात वाव देणं ही self-actualization ची रीत असते आणि त्याच्यामुळे कितीतरी गोष्टी होऊ शकतात. कित्येक लोकांना साधारणतः शासकीय किंवा ज्याला business करण्याची अशी एक abiliy म्हणतात, ती असते आणि त्यामुळे त्यांना नौकरी नकोशी वाटते. नौकरी सोडून देतात ते आणि स्वतःचा धंदा करतात आणि यशस्वी होतात कारण त्यांच्यामध्ये ही जी कल्पना असते की मी उत्तम रीतीने स्वताःचा असा उद्योगांधंदा करु शकेन. Enterprenuer ability त्यांच्याकडे असते आणि ती करण्याची त्यांची लायकी असल्यामुळे ते एके ठिकाणी टिकून रहात नाहीत ; असंच कलावंतांचं होतं काही दिवसांनी, की दुसऱ्याची नौकरी किती दिवस करायची आता ? खूप लोकांच्या कडून direction शिकलो ; बस झालं ; आता मीच director होतो आणि माझी कंपनी काढतो अशीही एकवेळ माणसाची येते. कला त्याच्यामध्ये तितक्या प्रमाणात असते आणि म्हणून तो स्वतःचे असे काही विश्व निर्माण करत असतो. ह्या साधारणत : आपल्या ज्या अनंत गरजा आहेत, की ज्यांची वेगवेगळी नांव देणंसुद्धा कठीण आहे त्या गरजांना काही एक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला, त्याचे वर्गीकरण मी पांच भागात केलेले आहे. म्हणजे वस्तुतः तुमच्या असं लक्षात आलं असेल की sex ह्या गरजेचा मी आतापर्यंत उल्लेख केलेला नाही आहे. त्याला कारण असं आहे की ती म्हटली तर अगदी basic शारिरीक गरज आहे. पण त्याचप्रमाणे ती सामाजिक गरजसुद्धा आहे. आणि असं काही म्हणता येणार नाही की शारिरीक गरज अशा अर्थाने आहे की पाण्याशिवाय माणस जसे मरतो तश्याप्रकारची ती काही शारिरीक गरज नाही आहे. तिच्याविना मनुष्य मरत नाही. परंतु base मात्र त्याचा शारिरीक आहे

असं म्हटलं पाहिजे त्याचप्रमाणे मीत्वाची, ego ची ही जी गरज असते, ती अनंत मार्गांनी कपडे निवडण्यामध्ये, कपड्यांची रचना करण्यामध्ये, घराची रचना करण्यामध्ये, मित्रमैत्रीणी निवडण्यामध्ये, आपण काय वाचतो हे ठरवण्यामध्ये, अनेक गोष्टींमध्ये त्याचा आविष्कार होत असतो. आणि सांगायचय इतकाच मला, त्याला काहीतरी एक सुसंगति यावी म्हणून मॅस्नो नांवाच्या मानसशास्त्रज्ञाने, ही आपल्यापुढे मी जी कल्पना मांडली, ती मांडली. अॅब्राहम मॅस्नो नांवाच्या मानसशास्त्रज्ञाने—जो नुकताच मेला त्याने अनंत गरजांचे वर्गीकरण करता यावे, सुसंगति त्याच्यात यावी म्हणून ही hierarchial कल्पना आपल्यापुढे मांडलेली आहे. त्यातला मुख्य गाभा असा की ज्या मनुष्याच्या जैविक गरजांचे अजूनपर्यंत उपशमन झालेले नाही, त्याला अजुन आत्माविष्काराची गरज फारशी डाचणार नाही. कारण, मनोव्यापार त्याचे अजुन सर्वस्वी ह्या गरजेच्या पोटी निगडीत झालेले आहेत आणि त्यामुळे त्याला दुसऱ्या गरजांचे अजुन भान आलेले नाही आहे. याच्याउलट जसजश्या ह्या गरजा भागत जातात, तसतश्या वरच्या थरावरच्या गरजा जास्त प्रज्वलीत व्हायला लागतात. म्हणजे एकदा चांगली सुरक्षित नोकरी लागली, सामाजिक स्थान प्राप्त झाले कि मग आपली मीत्वाची गरज जास्त होते आणि तीही भागायला लागल्यानंतर आता ज्या माझ्याकडे potentialities आहेत, त्यांना वाव करुन देण्याची गरजही आपल्यामध्ये दिसायला लागते. अथातऱ्हेने ह्या गरजांचे हे जे वर्गीकरण केलेले आहे त्याच्यातली दुसरी गोष्ट अशी लक्षांत ठेवायची की सामान्यतः जरी वरच्या पातळीवरची गरज आणि खालच्या पातळीवरची गरज निदान थोड्या अंशाने भागवल्याशिवाय जन्माला येत नाहीत तरी त्याबाबतीत काही अपवाद आहेत. उदाहरण सांगतो तुम्हाला की जेव्हा जेव्हा एखादी माता आपल्या मुलाकरता पूर्णपणे काही त्याग करायला, जीवसुद्धा घालवायला तयार होते त्यावेळेला ती काय करत असते असं जर तुम्ही विचारलं तर आपली safety security, physical गरजा बाजला टाकत असते, जाणुनबुजन बाजला टाकत असते. आणि ह्याच्या उलट मग काय भासवत असते तर एक प्रकारचा आत्माविष्कार आणि मीपणाची कल्पना आणि दुसऱ्याबद्दल वाटणारे प्रेम ह्याच्याकरता काही गरजांचा ती जाणुनबजन त्याग करत असते. तीच गोष्ट लढाईवरती जो सैनिक पराक्रम गाजवीत असतो देशाकरता, त्याचेही असेच म्हणता येईल की तो मृत्युत्व सुखाने पत्करत उसतो ते, त्याने एक जो काही आदर्श डोळ्यापुढे ठेवलेला आहे त्याच्यासाठी.

थोडक्यात म्हणजे एकदा मनुष्याने एखाद्या गोष्टीची बांधीलकी पत्करली तर त्यासाठी तो इतर गरजांचा त्याग करु शकतो. एखाद्या विद्यार्थ्याने एकदा अभ्यास करायचं ठरवलं. गरिबी फार आहे तर त्याच्याकरता तो वाट्टेल तो त्याग करतो कारण त्याचे ध्येय असे ठरलेले आहे की अभ्यासकरणं. म्हणजे त्याच्या ह्या ego मध्ये, त्याच्या स्वतःच्या कल्पनेमध्ये ते ध्येय इतक साकारलेलं आता, परिपूर्ण भरलेलं आहे की त्या करता तो काय वाट्टेल ते करायला तयार होतो, असे म्हणता येईल. ego-involvement' असा शब्द मला तुम्हाला सांगायचा आहे. की ज्याच्यात आपण आपला आत्मा ओततो जणु काही ! तो आणि मी आता एकरुप झालो. 'तो' म्हणजे काय ? ते ध्येय जे आहे, ते आणि मी. बघा, मीत्वाची कल्पना आहे, ती जर एकरुप झाली, तर त्याच्याकरता आपण काय वाटेल तो त्याग सहन करायला तयार होतो. एकदा तुमचे ठरले की संगीत शिकायचं, कष्टमय

आहे, अमक्याच माणसाकडून शिकायचंय, त्यालाच आपला गुरु करायचंय आणि त्याचं शिष्यत्व घ्यायचंय, मग कदाचित पहिली दोन वर्षे आपल्याला तो त्याचं संगीत शिकवायं तसं शिकवत नाही, आपल्याला फार जुजबी कामं सांगतोय, घरगुती कामं सांगतोय, त्रास फार देतोय. तरी शिष्य हे सारं सहन करतो. ह्याला कारण असं असू शकतं की त्याच्या ego मध्ये काही पक्की ही भावना रुजलेली आहे की मला हीच गोष्ट करायची आहे. ते त्याचं ideal झालेलं आहे. आणि त्यामुळे तो बाकीच्या गरजांचा त्याग करु शकतो. पण सर्वसामान्यपणे असं म्हणता येतं की सामान्य गरजा भागवत गेल्याशिवाय वरच्या तऱ्हेच्या गरजांचा उगम होत नसतो.

आता बघू या आपण की याचे संगीताशी नाते काय ? आतापर्यंत मी तुम्हाला प्रेरणेचे मानसशास्त्र आणि त्याचे काही ठोकळ नियम सांगितले. आता आपण संगीताच्या मैफलीकडे वळू या आणि गुरुशिष्याच्या नात्याकडेही वळू या. रानड्यांच्या पुस्तकामध्ये त्यांनी नंबर चवथ्या प्रकरणामध्ये 'बंदिशी', 'घाट' ह्याची जी चर्चा केलेली आहे, तिचा बराचसा उपयोग ह्या ठिकाणी आपल्याला होण्यासारखा आहे. त्यांनी सांगितलं आहे की घाटामधे साधारणतः तीन गोष्टींचा आपल्याला विचार करता येण्यासारखा आहे. एक म्हणजे अर्थातच कलावंत, संगीतज्ञ. दुसरी गोष्ट म्हणजे त्याचा performance, संगीतकृती; आणि तिसरी गोष्ट म्हणजे त्याच्या पुढे जे श्रोते बसलेले असतात, आस्वादक असतात, रसिक असतात ते. कलावंत, त्याची कृती आणि आस्वादक या तीन गोष्टींबद्दल बोलतांना रानडे असं म्हणतात की अशी कल्पना करा की तीन काचेचे गोळे आहेत. जणू काही ते पाण्याने भरलेले आहेत आणि ते एकमेकांच्या शेजारी अशारितीने ठेवलेले आहेत की ह्याच्यातल्या एखाद्याच्या पाण्याच्या पातळीला जर का धक्का लागला तर उरलेल्या दोघांच्या बाबतीमध्ये धक्का पोहोचतो. त्यांना 'घाट' ही कल्पना 'form' ही कल्पना मला वाटतं व्यक्त करायची आहे. ह्याच्याबद्दल आपण असं म्हणू शकतो की हीच कल्पना, मला त्यांना असं विचारायचंय, त्यांनी पुस्तकात नीट लिहिलेलं नाही आहे, पण माझी त्यांना एक difficulty विचारायची आहे. हे तीन काचेचे गोळे तुम्ही ठेवलेले आहेत, ते ठेवण्याचे दोन मार्ग तरी दिसतात. एक म्हणजे एकाशेजारी एक ठेवणं आणि एक म्हणजे ज्यावेळेला मी तुम्हाला attitudes बद्दल बोलत होतो तेव्हा एक त्रिकोण काढून दाखवला होता. आणि समजा, जर असे गोळे हे अशा रितीने ठेवले तर मला दिसणारा फरक, त्यांनी पुस्तकात नक्की कसे ठेवले हे सांगितलेलं नाही. तीन गोळे म्हणजे कुठले, हे मी तुम्हाला सांगितलं–एक म्हणजे कलावंत, कलाकृती व त्याच्यापुढचे सामाजिक, रसिक किंवा आस्वादक. एकाला जर धक्का पोहोचला तर ते म्हणतात दोन्हीमध्ये असा हा जो imbalance निर्माण झालेला आहे तो परत सुरळित करण्याच्या मनुष्य प्रयत्न करतो. कारण असे जर गोळे ठेवले तर त्याचा धक्का ह्याला directly पोहोचतो, तिसऱ्याला पोहोचत नाही. पण असे गोळे ठेवण्याचा फायदा मला असा दिसतो की एका जरी गोळ्याला त्यातल्या धक्का लागला तर दोन्ही उरलेल्या गोळ्यांशी त्याचा direct संबंध आलेला आहे. डचमळ दोघांत एकदम निर्माण झालेली आहे आणि अशा प्रकारे हे जे tension त्याच्यात निर्माण झालं किंवा पातळी जी सम होती ती विषम तयार झाली आणि ती परत होण्याकरता किंवा

ती जेव्हा सम होते त्यावेळेला एक तऱ्हेचा घाट निर्माण होतो असे ते म्हणतात. पुढे ते असेही सांगतात की जे रसिक असतात ते काही घाट ठरवत नसतात. पण ते ठरवण्याच्या बाबतीत त्यांना काहीतरी कार्य आहे. तर त्यातल्या एकेका गोष्टीचा आपण आता विचार करु या.

पहिल्यांदा कलावंत घेऊ या. आता कलावंताची प्रेरणा याच्याबद्दल आपण बोलणार आहोत. कारण आपला आजचा विषय 'कलावंताची प्रेरणा' असा आहे आणि ह्यात तीन पदे आहेत. मी दोन आज जास्त सांगणार आहे. ती म्हणजे गुरु आणि शिष्य यांचे नाते. तूर्त या तीन गोष्टींचा विचार करु या. की जो कलावंत असतो त्याच्या प्रेरणा कुठल्या ? आता तुमच्यापुढे मी हा नकाशा काढला होता. अनंत तऱ्हेच्या प्रेरणा मनुष्याला असतात हेही सांगितले आणि असेही नंतर सांगितले की एकच कृती मनुष्य करतो, तिच्यामागे अनंत प्रेरणा असू शकतील. तुम्ही इथे ऐकताय. ह्याचं analysis मी करून सांगितलं की इथे येण्याची कारणे वेगवेगळी असू शकतील, प्रेरणा वेगवेगळ्या असतील. काहीच नाही तर माझा मित्र आला आहे, म्हणून मी आलोय. ही सामाजिक गरजसुद्धा त्याच्यामध्ये भागवली जात असते. तशीच ही कलावंताची गरज असेल असं म्हणता येईल. कलावंत ज्यावेळेला गात असतो त्यावेळेला किंवा कुठल्याही performance च्या वेळेला, instrumental असेल, vocal असेल– तेव्हा त्याच्या प्रेरणांना काहीतरी प्रत्यक्ष आविष्कार मिळत असतो असं समजलं पाहिजे. नाहीतर त्याच्या हातून कृती होणार नाही. आणि म्हणून कृतीबद्दलचे मी एक सूत्र तुम्हाला सांगतो. कृती म्हणजे performance, action अशा अर्थाने मी शब्द वापरतोय आणि कृतीबद्दलचं सूत्र असं म्हणता येईल की ती कृती करायला तुमच्याकडे लागणारी ability, क्षमता असली पाहिजे. गायचे असेल तर थोडा आवाज पाहिजे. आणि तेवढे असून भागणार नाही तर त्याच्यानंतर त्याला लागणारी प्रेरणा पाहिजे. म्हणजे गावं असं वाटलं पाहिजे. म्हणतात ना कलावंतांचा मूड (mood) लागत नाही आहे. म्हणजे अजून त्याला आज प्रेरणा हवी तशी मिळत नाही आहे. ability आणि क्षमता आहे. पण आज मूड लागत नाही म्हणजे प्रेरणा नाही. ह्यावेळेला तरी नाही. ह्याचे मी निर्देशन चिन्ह जे दाखवलय ना, ते गुणाकाराने दाखवलं आहे. ह्याचं कारण आहे. आता त्यातलं गणित, शिकलेले लोक समजतील. समजा, माझ्या हातून कृती व्हायची असेल आणि माझ्याकडे प्रेरणा आणि क्षमता आहे परंतु प्रेरणा शून्य आहे. एखाद्या गोष्टीला शून्याने गुणणं म्हणजे कृती शून्य झाली. तीच गोष्ट माझ्याजवळ प्रेरणा खूप आहे, enthusiasm आहे खूप गावं असा, पण आवाज भसाडा आहे आणि समजत नाही. क्षमता शून्य आणि प्रेरणा फार, तरीही result शून्य. म्हणून ह्यांचं नातं जे आहे, ते गुणाकारानं दाखवलेलं आहे, की कोणतीही कृती, हे तुमच्या अभ्यासाबद्दल आहे, जगातल्या कुठल्याही कृतीबद्दल असे म्हणता येईल की त्याला लागणारी क्षमता आणि त्याला लागणारी प्रेरणा. आणि म्हणजे काय ? तर त्याला लागणारी energy, desire ही मी सांगितली. प्रेरणेचे मानसशास्त्र इतका वेळ, motive म्हणायचं तो असायला पाहिजे. नाहीतर त्याशिवाय action होणार नाही. आता ज्याअर्थी आपण संगीताच्या मैफलीची चर्चा करतोय, तेंव्हा किमान त्याच्याजवळ असलेली ही जी क्षमता आहे ती गृहीत धरलेली आहे आणि ती कमीजास्त प्रमाणामध्ये असेल. परंतु काहीतरी क्षमता तितक्या प्रमाणात त्याच्या मैफलीला रंग चढेल किंवा चढणार नाही.

असली पाहिजे. आणि त्याच्यानंतर म्हणजे त्याची प्रेरणा. कशामुळे ती क्षमता? मी तुम्हाला सांगितलं, एक मोठ्ठ घड्याळ आहे आणि त्याची यंत्रणा शाबूत आहे तशीच क्षमता पण आहे. पण आता त्या यंत्रणेला चालू करायला electric चा current तरी पाहिजे नाहीतर स्प्रिंग पाहिजे. तशी वाफेची शक्ती काहीतरी असली पाहिजे आणि मग ती अनंत प्रकारची होऊ शकते. लोकांना रिझवायचं हे एक असू शकतं. त्याचप्रमाणे त्याच्या जवळ जी कला आहे, तिचा आविष्कार व्हावा, self-actualization need ही सुद्धा असू शकते आणि मग यामुळेच असा एक त्याचा दृष्टीकोन असतो कि मी जे गातोय ते माझ्या self-actualization करता गातोय. तुम्हाला ते कितपत आवडेल, ते रुचेल की नाही हा माझा मुद्दा नाही आहे. मला आत्मविष्कारात एक आनंद मिळतोय. त्याच्याबद्दल रानड्यांनी फार चांगलं analysis केलेलं आहे. ते म्हणतात, अशी जरी कल्पना माणसाची असली की मी माझ्या एकट्याकरता गातोय, तर हा एकटा वस्तुतः दोन असतो. कारण जेव्हा मनुष्य स्वतः काहीतरी करतो, गातो म्हणा, पोहतो म्हणा, खेळतो म्हणा तेव्हा ते तो कसं करतो हे त्याला समजत असतं. म्हणजे तो काही बहिरा नसतो. कानाने तो ऐकत असतो. असं आपण समजूया, सगळंच काही खरं कळत असतं असं नाही. परंतु समजा, तुम्ही गाताय, काहीतरी instrument वाजवताय आणि स्वतःच स्वतः सुद्धा ऐकताय आणि त्यानुसार तुमच्या हालचाली ठरल्या जातायत. म्हणजे तुम्ही जे करताय ते कुणीतरी पाहतय. कुणीच नाही तर तुम्ही स्वतः त्याच्यामध्ये आहात आणि त्याप्रमाणे तुमची पुढची कृति तुम्ही थोडी बदलून घेताय. त्यांनी उदाहरण दिलय, एखाद्या मनुष्याचा समजा, ढाला आवाज आहे आणि मग त्याने तारस्वरांचा वापर केला तर त्याचा काही फारसा फायदा होत नाही. उलट हानिकारक होते. त्याची कृति हानिकारक होते. म्हणजे, हे त्याला दुसऱ्या कोणी सांगितल्याशिवाय स्वतःचे स्वतःलासुद्धा कळू शकेल. तितकी जर त्याच्यामध्ये discrimination करण्याची पात्रता असेल तर! क्षमता आपण गृहीत धरलेली आहे. त्याचप्रमाणे कलावंताच्या अनेक गरजा असू शकतात. पैसे मिळवणं ही सुद्धा एक गरज असू शकते आणि पैशाकरता गावं लागतं, मग तो कलावंत कोणत्याही तऱ्हेचा असू शकतो. चित्रकारसुद्धा, लेखकसुद्धा बरेचवेळा पैशाकरता काम करु शकतो. म्हणजे अगदी ह्या pyramid च्या मूलभूत गरजांपासून ते self-actualization पर्यंत वेगवेगळ्या प्रेरणांमुळे तुम्ही एखादी कृती करायला तयार झालेले असू शकता. असंही म्हणण्याचं कारण नाही की एकावेळेला फक्त एकच प्रेरणा तुम्हाला एक गोष्ट करायला लावते. असं होऊ शकतं की तुम्ही जी कृती करताय त्याच्यामागे अनेक प्रेरणा एकदम असू शकतात.

उदाहरणार्थ, पैसे मिळवणं, लोकांच्याकडून टाळी मिळवणं, थोड नाव होणं, थोडं आपली तयारी कितपत आहे आजमाऊन बघावी, आता प्रथमच मी जनतेपुढे येतोय तेव्हा तयारी आजमाऊन बघावी, अशीही एक प्रेरणा असू शकेल. चार मित्र गातायत, ते माझे दोस्त आहेत. त्यांनी गळ घातली, मी गातो. आनंदात आलो होतो, खरा गायच्या इच्छेने आलो नव्हतो. पण सामाजिक प्रेरणा असू शकेल, ego प्रेरणा असू शकेल. थोडक्यात म्हणजे, कलावंताच्या performance ला प्रेरणा ही ह्या पांचपैकी कोणत्याही रीतीने मिळू शकेल. निदान वरच्या चार तऱ्हेच्या रीतीने तरी मिळू शकेल. आता त्याची जी प्रत्यक्ष कृती आहे, म्हणजे

performance आहे, त्याचे analysis करतांना असं म्हटलंय मला वाटतं रानड्यांनी एका ठिकाणी, की त्याच्या डोळ्यापुढे स्वप्न असतं, म्हणजे त्याने जे मनात ठरवलेलं आहे की, मी हे करणार आहे; ही जी आहे ती सुद्धा एक प्रेरणा आहे त्याच्यापुढे. कारण त्याने ठरवलेलं आहे समजा की बागेश्री गायचा. त्यांनीच उदाहरण दिलेलं आहे, ते मी घेतो. तर नुसतं इतकं बघून आता चालणार नाही. हा राग ठरवून चालणार नाही तर स्वररचना तो मनाशी ठरवतो आणि त्याचप्रमाणे त्याच्यासारखे असलेले जे दुसरे राग आहेत, त्याच्यापासून तो कसा नसावा म्हणजे बागेश्री कानाला कसा नसला पाहिजे हे ही तो मनाशी ठरवत असतो म्हणजे त्याच्या प्रेरणेच्या कप्प्यामध्ये, म्हणजे त्याचा जो goal आहे, त्याचे उद्दीष्ठ आहे, त्याच्यामध्ये त्याने अशी काहीतरी सुसंगती लावलेली आहे. आणि त्या सुसंगतीचा त्याची कृती आणि प्रेरणा ह्यांचं काहीतरी असं नातं जमलेलं आहे. म्हणजे तो करतो, म्हणजे त्या त्याच्या कानाला किंवा इतरांच्या response मध्ये होऊ शकतं. मी तूर्त त्याचाच विचार करतो. मग त्याप्रमाणे तो त्यात योग्य असे बदल करत असतो आणि अशारीतीने त्याचा जो performance असतो तो एकप्रकारचा self-correcting असतो. असं म्हणता येईल की आपोआपच तो एकतऱ्हेचा मार्गावर जात असतो. किंबहुना शिकणं म्हणजे तेच. आपण शिकतो ह्याचा अर्थ काय करत असतो? की चुकलेलं समजावून घेऊन परत त्याप्रमाणे कृती बदलणं. म्हणजे प्ररणा आपल्याला असली पाहिजे हे करण्याकरता.

आता आपण रसिकांच्याकडे वळूया. रसिकाचा जो अनेक प्रेरणांचा समुच्चय त्याच्यामध्ये असू शकतो, त्याचं आपण थोडसं विवेचन केलं तर आपल्या असं लक्षात येईल की रसिकांच्या मनामध्ये, म्हणजे जो कोणी ऐकणारा असतो त्याच्या मनामध्ये एक तर असं असू शकेल की जो राग तुम्ही गाणार आहात त्याच्याबद्दलच्या काहीतरी आदर्श त्याच्या मनामध्ये आहे. तो जाणकार आहे, अनभिज्ञ नाही आहे. आणि त्याच्या मनात जो एक आदर्शवत् असा राग आहे, त्याच्याशी तुमचा जो तुम्ही performance देताय तो ताडून बघण्याचा प्रयत्न तो करतोय आणि तो जितक्या प्रमाणात ताडला जातोय, तितक्या प्रमाणात तो तुम्हाला दाद देतोय. नाहीतर त्याला वाटतं, काहीतरी खटकतय. असं असू शकेल जाणकारांच्या बाबतीत. आता मी तुम्हाला सांगितलच की attitude बद्दल जी बोधनात्मक कल्पना सांगितली, ती अत्यंत जाणकारापासून ते 'कानाला गोड लागतय' किंवा 'खराब लागतय' इतकी ढोबळ असू शकते. आणि त्यात्या प्रमाणात मग रसिकांची उत्तरे यायला लागतात. साधारणतः असे म्हणता येईल याबद्दल. याबद्दल खूप बोलता येण्यासारखं आहे. कारण श्रोतृवृंद म्हटला की एकापेक्षा जास्त माणसं आली. आणि एकापेक्षा जास्त माणसं आली की मनुष्याची वर्तणूक ही काहीतरी वेगळ्याप्रकारे घडत असते असा एक सामाजिक मानसशास्त्राचा प्रथम सिद्धांत आहे. काय सिद्धांत आहे? की आपली एकटे असतानाची वर्तणूक आणि आपली इतरांच्या बरोबर असतानाची वर्तणूक ह्यात फार जमीन–अस्मानाचा फरक असतो. म्हणजे तोच मनुष्य इतरेजनात कसा वागतो आणि एकटा कसा वागतो ह्यात फरक असतो. अशी कल्पना करा की एक संगीतज्ञ गातोय. आणि तो मैफलीकडे नजर टाकूनच ओळखतो की

जाणकार काही फारसे कुणी दिसत नाही आहेत. त्याची ही जी पहिली, समजूत, बोधना, perception होतं त्याचं, त्यावरुनच तो आज, काय गायचं कितपत खोलात जायचं ... (एक श्रोता: म्हणजे मग आता कलावंतामध्येच एक आस्वादक असतो असं जर गृहीत धरलं आपण, ते समुदायामध्ये गेल्यावर बदलायला लागेल नाही कां ?) नाही. मी काय सांगत होतो की त्यांनी असं लिहीलय त्यांच्या पुस्तकामध्ये की एखादेवेळी असं असू शकेल की घरामध्ये तुम्ही एकटे गाताय आणि कदाचित तुम्हाला असं वाटेल (श्रोता: ती selt-correcting activity होऊ शकेल. पण पुन्हा मैफलीत गातांना वेगळ्यातऱ्हेची selt-correcting activity होऊ शकेल) व्हावी अशी इच्छा आहे. नाहीतर असंही होऊ शकतं, मी तुम्हाला सांगितलं की 'नाही, लोकांच्याकडे मी लक्ष देणार नाही' आणि मग त्यांना पसंत नसेल तर ...., अशी उदाहरणं मी ऐकली आहेत की भलत्याच ठिकाणी जर लोकांनी 'दाद' दिली, तर आपल्या वाद्यांवरती गवसणी घालून कलावंत जातो आणि म्हणतो 'आपल्या करता हे माझं संगीत नाही आहे चुकीच्या ठिकाणी. तुम्हाला 'जाण' नाहीये. काय तुमच्यापुढे गायचं ? असं होऊ शकतं. self-correcting ची त्याची इच्छा नाही आहे. तो इतका 'correct' होतो की performance बंदच करतो ! बरोबर आहे ! त्याची सगळी प्रेरणाच खुंटली. म्हणजे त्याने कदाचित आपल्या मनातला जो आदर्श ठेवलेला असतो श्रोतृवृंदाबद्दलचा तो एकदम ठिसूळ ठरला आणि तो एकदम जमिनीवर आदळल्यासारखं त्याला झालं आणि 'कुठल्या भलत्याच ठिकाणी मी एवढी माझी कला वाया घालवतोय' असं त्याला वाटण्याची शक्यता आहे. पण त्याचप्रमाणे मी तुम्हाला सांगत असं होतो की अशी नजर टाकल्यानंतर जर समजा, त्याला वाटल की इथे गाण्यासारखं फार नाही काही, फारशी आपली कला दाखवावी, आविष्कार करावा असं ह्यात काही नाही. काढू अर्धातास, एक तास. आलो आहोत आता, केलं पाहिजे ; इतकीच त्याच्या मनाची प्रेरणा एकदम तयार होते. म्हणजे तो, त्याची प्रेरणा किती चटकन बदलली ! कशामुळे ? त्याची जी बाधना झाली, त्याला ज्या संवेदना प्राप्त झाल्या आणि असं चालू असताना अशी कल्पना करा की दोनचार चांगले त्याला माहितीतले असलेले जाणकार सभेमध्ये येऊन बसले. पंचाइत आली त्याच्या मनामध्ये. सुरवात करतांना त्याने असं ठरवलं होतं की फार खोलात जायची गरज नाही आणि आता एकदम चार जाणकार आले. आता त्याच्या मनात विचार आला की सभा संपल्यानंतर त्यांना असं सांगायला पाहिजे की 'तुम्ही उगीच आलात. तुमच्याकरता हे नव्हतं सगळं.' किंवा आता जरी सुरवात केली आहे तरी आता असं काहीतरी केल पाहिजे की ज्याच्यामुळे हे दोन्ही तऱ्हेचे असे जे माझ्यासमोर श्रोतृवृंद बसलेले आहेत त्यांना काहीकाही मिळता येईल अशातऱ्हेची आता मला काहीतरी compromising attitude घेतली पाहिजे, असं होऊ शकतं. त्याचप्रमाणे मी असं सांगत होतो की मनुष्याचं वर्तन हे समाजामध्ये इतरेजनांच्या बरोबर असतांना आणि एकटे असतांना वेगळं असू शकतं. उदाहरणार्थ, जो ऐकणारा असतो, त्याचं जे काही ज्ञान असेल, त्याच्या ज्या काही अभिवृत्ती असतील, भावना असतील, त्याप्रमाणे तो ऐकत असून त्याप्रमाणे दाद देतो किंवा न देतो हे जितकं खरं आहे, त्याच्याभोवती जे लोक बसलेले असतात ते दाद कितपत देतात, त्याचे निकष कसे आहेत यांचाही त्याच्या मनावर परिणाम होत असतो आणि त्याचे निकष त्याप्रमाणात बदलते राहतात.

म्हणजे त्याचं असं होऊ शकेल की जी कलाकृती एका माणसाला एकटे असतांना फार आवडली असती तीच कलाकृती जशीच्या तशी सगळ्यांच्या समवेत बसून ऐकतांना बाकीच्यांना आवडली नाही, बाकीच्यांचा mood वेगळा होता, त्यांनी दिलेली दाद वेगळी होती ; म्हणून त्याचं ही त्याबद्दल जे परीक्षण आहे ते वेगळ्या तऱ्हेचं होऊ शकतं. सांगायचय इतकच मला की ही जी प्रेरणा नांवाची चीज आहे, तिची जी उपांगे मी तुम्हाला सांगितली, सामाजिक आहेत, मीपणाबद्दलची आहेत, आत्माविष्काराबद्दलची आहेत. त्याच्या वेगवेगळ्या बाजूंनी रसिकसुद्धा हे असले analysis चालू ठेवत असतो आणि त्याप्रमाणे त्याचे उपशमन तरी होत असते, नाहीतर होत तरी नसते. म्हणजे, असं म्हणता येईल की तो सुद्धा काहीतरी एका अपेक्षेने तुमच्यापुढे आलेला असतो. अर्थात् काही लोकांच्या काहीच अपेक्षा नसतील. Idlecuriosity म्हणून आलेले काही लोक असतातच. 'बघूया' कानाला काही लागतय म्हणून सहज दोन घटका. ? अशापासून तो अगदी 'अमका गाणार आहे. म्हणजे त्याच्याकडून माझी ही अपेक्षा आहे ?' असं ठरवून आलेले लोकही असतात आणि त्याचप्रमाणात त्यांची ही जी Level of aspiration आम्ही म्हणतो, 'आज हे आपल्याला ऐकायला मिळेल या आनंदानं मी इथे आलो होतो आणि ती भागली नाही' असं हल्लीचे टीकाकार नेहमी म्हणतात टीका करतांना "तुमची पहिली कादंबरी वाचून अपेक्षा उचांवल्या होत्या परंतु दुसरीने काही समाधान झाले नाही." म्हणजे असं त्यांना म्हणायचय की "तुम्ही सुरुवात तर फार छान केली होती." पण अपेक्षेप्रमाणे तुमचा performance होऊ शकला नाही. आणि असेच कलावंत ही म्हणू शकतो की "जेवढ्या प्रमाणामध्ये माझी रसिकांबद्दलची कल्पना पहिल्या पंधरा मिनिटात झाली होती त्याच्या मानाने अगदी सामान्य तऱ्हेचा हा श्रोतृवृंद होता" असही त्याला वाटण्याची शक्यता आहे. थोडक्यात म्हणजे, अर्थात याच्यामध्ये मी असं गृहीत धरलय ह्या चर्चेमध्ये की कलावंताला रसिकांपर्यंत जाऊन पोहोचून त्यांना काहीतरी द्यायची इच्छा आहे. एक उलटा दृष्टीकोन मी तुम्हाला सांगितला की माझी कला ही अशी आहे आणि मी ती गाणार आहे. तुम्हाला पसंत पडलं तर ठीक आहे. नाहीतर तुमचे आमचे मार्ग वेगळे आहेत, असं होऊ शकतं. आणि मग त्यांनी, रानड्यांनी आपल्या पुस्तकात दिलं आहे, मला आठवतय, ते वाक्य असं आहे की बरेचवेळेला कलावंतांचं जीवन हे ह्या दोन कचाट्यांमध्ये सापडल्यामुळे एक तऱ्हेचा जुगार बनलेले असते की नक्की काय करु ? म्हणजे, मी माझ्या कलेशी प्रामाणिक असा राहुन फक्त कलेकडे बघू की जनसमुदायाला खूष करण्याकरिता कोणत्या level पर्यंत मी उतरू ? अशी ही त्याच्यापुढे एक मोठी बिकट परिस्थिती निर्माण झालेली असते. संगीताच्या बाबतीतच असे नव्हे तर, सगळ्यांच्या बाबतीत हे झालेले असते. माझ्याही धंद्यात असं होत असतं, की शेवटी विद्यार्थ्यांपुढे कोणत्या level वरती जाऊन बोलायच ? अगदी Post-graduate वर्गात सुद्धा जेव्हा असं लक्षात येतं की फार खोलात जाण्यात अर्थ नाही, त्यावेळेला मग आपण आता कसलं आपलं ध्येय ठेवायचं ?" "मग चला, चार पैसे मिळतायत, मास्तरकी करु." इतक्या level वर सुद्धा मनुष्य येऊ शकतो आणि मग उच्च ध्येये जी शिक्षणाची असतात ती सगळी बाजूला पडू शकतात. तर हे जे मी analysis करतोय motivation चं, त्याच्यामध्ये कलावंत हा रसिकांपर्यंत जाऊ कसा शकेल किंवा जायची त्याची इच्छा असेल काय, असतांना काय करायला पाहिजे हे मी तुम्हाला सांगितलं. जर एकदा ठरलं की

काही ना काहीतरी करुन जर आपल्याला public-performance, consert असेल तर रसिकांपर्यंत पोहोचलं पाहिजे, तर मग रसिक किती तऱ्हेचे असतात त्यांची वर्गवारी करणं, त्यांच्या वेगवेगळ्या प्रेरणांचा विचार करणं आणि आपला घाट असा काही रचणं की ज्याच्यामुळे सर्वांना वेगवेगळ्या तऱ्हेचं काही ना काहीतरी समाधान मिळू शकेल. मग अनेक प्रकार त्याच्यामध्ये असतात. काही कलावंत असं करतात, अगदी दर्जेदार, खास असं शास्त्रीय एकदा गातात. मग काही काहीवेळ त्यात interest नसलेले लोक बाहेर कॉफी पिऊन येतात. आणि मग हलकीफुलकी धून थोडी वाजवतात. म्हणजे मग त्यांनाही समाधान मिळतं. असही एक compromise होऊ शकत. परंतु जर एकदा लोकांच्यापुढे जायचं असेल तर मग त्यांची प्रेरणा, आणि त्यांची त्यांची प्रेरणा म्हणजे क्षमतासुद्धा विचारात घेणं क्रमप्राप्त आलेलं आहे. तीच गोष्ट प्रेक्षकांच्या बाबतीत असं म्हणता येईल की जर तुम्हाला रसिक तयार करायचे असतील, (प्रो. अशोक रानडे appriciation चा एक course देतात) तर रसिक म्हणजे नुसताच काही जाऊन बसतो पैसे मोजून, असं नसून त्याला काहीतरी त्यातली 'जाण' आलेली आहे, त्याला काहीतरी 'समज' आहे, अपेक्षा काय ठेवाव्यात हे त्याला समजलंय. असं शिक्षण त्याला देता येण्यासारखं आहे आणि त्यामुळे मैफलीचा सगळाच दर्जा उंचावण्याची शक्यता आहे.

आता उरलेले जे दोन भाग आहेत त्यांच्याकडे आपण वळूया. गुरू आणि शिष्य यांचे जर नाते असेल, (आणि असते, संगीतामध्ये तर फार असते असे म्हणतात) तर त्याचे आपण काही प्रेरणेच्या मानसशास्त्राच्या दृष्टीने चर्चा करता येण्यासारखी आहे काय ते पाहू या. बघा, गुरू होणं किंवा गुरुत्व पत्करणं किंवा एखाद्याला गुरु करणं म्हणजे काय? ह्याचा आपण विचार करुया. शिष्यत्व पत्करणं म्हणजे जास्त ज्ञान असलेल्याला कोणालातरी मानणं, 'दर्दी' मानणं आणि इतकेच नव्हे तर जे अनेक दर्दी available आहेत त्यांच्यापैकी हाच मला योग्य, याचीच विद्या मला शिकायची आहे असं ठरवणं. म्हणजे motivation च्या दृष्टीने असं म्हणता येईल की काहीतरी एक नक्की दिशा किंवा goal ठरला की 'मला हे शिकायचंय'. मी तुम्हाला सांगितलं ना की गरजा असतात, त्या गरजांचे आपल्याला tension वाटायला लागते आणि त्याच्यातून एक instrumental behaviour होतं. म्हणजे गाणं शिकणं ही एक general गरज म्हणता येईल तुम्हाला. पण ती अमक्याकडूनच शिकणे. अनेक गवई ऐकले, अनेकांचे performances पाहिले आणि असं ठरवलं की मी करीन तर याला गुरू करीन. असं ठरणं म्हणजे आता काहीतरी उद्दीष्टाच्या दृष्टीने साधक अशा तऱ्हेचे वर्तन सुरू झाले. आणि मग आपण त्याच्याकरता काय वाटेल ते करु शकतो. म्हणजे 'एक बांधिलकी पत्करण्याची तयारी' असं म्हणता येईल. आणि याच्याकरता थोडीशी एक नवी कल्पना मला तुम्हाला सांगता येईल. Self-concept असं इंग्रजीमध्ये त्याला म्हणतात. 'आत्मप्रतिमा' असं आपण त्याला मराठीत म्हणूया. आपली स्वतःबद्दलची काहीतरी एक कल्पना असते, आत्मप्रतिमा असते. मी तुम्हाला सांगितलंच परवाच्या दिवशी की ती कल्पना अशी असू शकेल की मी म्हणजे कोणीतरी हुशार, मी म्हणजे कुणीतरी सुंदर, मी म्हणजे कुणीतरी उत्तम वक्ता, मी म्हणजे दर्दी, अशा अनेक कल्पनांचे जाळे स्वतःबद्दल आपण विणलेले असते. आणि ती कल्पना म्हणजे आपली ही आत्मकल्पना जी असते, आत्मप्रतिमा असते.

आरशामध्ये आपण बघतो आणि आपल्याला आपली शारीरिक प्रतिमा दिसते, तशी आपल्या गुणांबद्दल आपली काहीतरी एक कल्पना आपल्या मनात तरळत असते. सुखद असते ती अर्थातच. आणि अशावेळेला ह्याच्यामध्ये जर आपण एकदा ठरवलं ह्या प्रतिमेमध्ये की मी आता इथून पुढे ह्या क्षेत्रात वावरीन तर अमक्याचातमक्याचा शिष्य म्हणून वावरेन. असं जर त्याचं एक प्रतिमेमधलं अंग बनलं तर, त्याच्याकरता त्याचं सगळं motivation channalized झालं, direction आलं त्याला आणि त्याच्याकरता तो काहीही करायला तयार झाला. आणि 'काहीही' म्हणजे असं की नुसतं संगीत शिकण्यापुरतं नाही, तर गुरूची अशी जी काहीतरी एक personal सेवा करावी लागते त्यालाही माझी तयारी आहे, एकदा ज्ञान घेण्याकरता जे काही कष्ट पडतील ते मी घ्यायला तयार आहे. कारण तो माझा आता शेवटचा, अंतिम उद्दीष्ट असा झालेला आहे. त्याचं वर्णन जर आपल्याला diagrammatically काढायचं झालं तर असं म्हणता येईल की माणसाची वर्तणूक ही goal-directed असते. हा सरळ बाण काढलाय म्हणून कोणी linear-relationship समजू नये. मला दाखवायचंय असं की काहीतरी goal, उद्दीष्ट साधण्याकडे आपण धडपडत असतो. आणि ही जी वेगवेगळी उद्दीष्टचे आहेत ती वेगवेगळ्या रीतींनी एकमेकांशी निगडीत झालेली असतात. म्हणजे, एखाद्या माणसाचं उद्दीष्ट असेल की 'भरपूर पैसा मिळवायचा', भल्याबुऱ्या मार्गांनी वाटेल ते करुन उत्तम पैसे मिळवायचे. असं उद्दीष्ट ठरू शकेल. ते 'अंतिम उद्दीष्ट' त्याच्या आयुष्याचं झालं. पण त्याकरता तो मार्ग अनेक वापरील. लॉटरीची तिकीटं काढेल, लोकांना पैसे कर्जाऊ देईल, आणखी कुठे सट्टा–व्यवहार करेल, मटका खेळेल, काय वाटेल ते करेल. कारण त्याचं उद्दीष्ट ठरलय आणि ते म्हणजे 'काहीही करुन श्रीमंत व्हायचं? हे त्याचं अंतिम उद्दीष्ट आहे, ultimate goal आहे. मग त्याच्याकरता त्याला काही semi–ultimate, semi–final अशा तऱ्हेची goals स्वतःपुढे ठेवावी लागतात. मग एकदा ठरलं, उत्तम पैसे मिळवायचे म्हणजे ह्याच्याकरता भलेबुरे मार्ग करायला हरकत नाही, मटका खेळायला हरकत नाही. हे वेगळं goal झालं. मग त्याच्या-नंतर शर्यंत, race ला जायला हरकत नाही. पैसे मिळण्याची शक्यता आहे. मग चला. ते करा. हे त्याचे जे बाकीचे सगळे goals झाले, ते secondary झाले. पण तो परिपोष एका goal चा करत आहे. असं म्हणतात, ही फार चांगली गोष्ठ आहे. कोणती गोष्ट? मटका खेळणं चांगली गोष्ट म्हणत नाही मी, वाईटही म्हणत नाही. पण कुठलंतरी एक अंतिम उद्दीष्ट असणं आणि त्याच्या दृष्टीने सर्व उद्दीष्टे अशा रीतीने रचणं की त्यांचा परिपोष एका ह्या कारणाकरता होत आहे. विद्यार्थ्यांचं उदाहरण घेऊ. एकदा आपण काही ना काहीतरी करुन पदवीधर व्हायचं असं ठरवलं, हे जर उद्दीष्ट असेल तर मग त्याच्याकरता शिकवण्या करुन पैसे मिळवणं, पुस्तक मित्राकडून घेणं, रात्रभर अभ्यास करणं, अनेक गोष्टी त्याला सहन कराव्या लागतील. आणि ह्या अशारितीने तो सगळं organize करतो त्याच्या जीवनामध्ये. त्याचं सगळं organization असं असत की त्या सगळ्याला एक दिशा असते. त्या माणसाचं जर चित्र काढायचं झालं, तर असं काढता येईल बघा. की एक मनुष्याचं जर असं ठरलं उद्दीष्ट, मग ते काहीही उद्दीष्ट असेल. अभ्यास करणं असेल, एखाद्याला गुरू करुन त्याचं शिष्यत्व पत्करणं असेल. ही व्यक्ती, त्यातल्या सगळ्या प्रेरणा एका दिशेने मी बाणाने दाखवलेल्या आहेत आणि दुसरी

व्यक्ती अशी असू शकेल, आज तिला वाटतय की यांच शिष्यत्व आज पत्करावं, उद्या वाटतं 'जाऊ दे संगीत! कंटाळा आला. कारकुनी करावी कुठेतरी.' परवा वाटतय 'नको बुआ ऑफिसर व्हावं'. तेरवा वाटतय 'इंजीनिअर व्हावं', 'अरे, मेडिकलला गेलो तर बरं झालं असतं!' अनेक गोष्टी त्याच्या मनात येताहेत. कारण काय झालेलं आहे, त्याचं जे motivation आहे ते अत्यंत weak आहे. त्याला हवी तशी दिशा अजून सापडलेली नाही. तो नुसताच उद्युक्त झालेला आहे. पण त्याला काय करावं हे काही कळलेलं नाही. ह्याची अगदी अंतिम पायरी बंदिस्त अशी होऊ शकेल की नुसतं मला संगीत शिकायचय एढच नाही, तर ते अमक्या माणसाकडून शिकायचय, ह्या घराण्याचा मला अभिमान आहे. आणि त्याच्याच एक वारसदार म्हणून मला इथे वावरायचय असं असू शकेल. आणि त्याच्या करता मग असं एकदा उद्दीष्ठ ठरलं की त्याचं लक्षण काय झालं? त्याच्याकरता वाटेल ते सहन करण्याची तयारी तो मनुष्य ठेवत असतो आणि मग तो असं म्हणत असतो. ह्याच्यामध्ये एक काय झालं बघा. ह्याच्यामध्ये थोडीशी कधी कधी supernatural शक्तीसुद्धा येऊ शकते, असं एखाद्याला गुरु मानण्यामध्ये. इतके अनंत संगीत शिकण्याचे मार्ग असतांना ह्यालाच मी गुरु मानीन म्हणण्यामध्ये एक कारण असू शकेल की 'मला तो उत्तम वाटतो'. पण ह्याच्यापेक्षा थोडासा पुढचा भाग असा असू शकेल 'जणु काही त्याच्यामध्ये काही दैवी गुण आहेत' आणि त्यांनी जर माझ्या डोक्यावरती वरदहस्त ठेवला तर काहीतरी current आल्याप्रमाणे माझ्यामध्ये आता ती विद्या मला एकदम यायला लागेल; इतकी सुद्धा समज होऊ शकेल. म्हणजे symbolic representation, जो 'गंडा बांधणं' म्हणतात. म्हणजे पहिलवानही करतात आणि आपल्या संगीताच्या field मध्ये असे असतात गंडा बांधणारे ऐकमेकाला. आणि मग त्याचं पूर्ण शिष्यत्व पत्करलं अर्थ असा असतो की आता मी तो म्हणेल ते करायला तयार आहे. ही faith अशा stage पोतर येऊ शकते. तीच गोष्ट जो 'गुरु' म्हणून role पत्करतो; हे दोन role आहेत बघा. सामाजिक मानसशास्त्र दृष्टया हे दोन roles आहेत. हे आपण नाटकात जसे roales घेत असतो तसे घेतोय आणि ही माणसं अशी घ्यायला तयार झालेली आहेत. आपण त्याची कारणमीमांसा करतो. आता मी परवाच्या दिवशी 'नवनीत' म्हणून जे digest मराठी निघतं, त्याचा दिवाळी अंक वाचला आणि पंडित भीमसेन जोशी ह्यांच्याबद्दल काही माहिती त्याच्या मध्ये आलेली आहे, ती वाचून काढली. त्यात त्यांनी असं म्हटलय की ते आता, त्यांना सगळं काही मिळालेलं आहे, मानसन्मान झालेला आहे. त्यांना चांगले जर दोन शिष्य मिळाले तर आपल्या घरी ठेवून सुद्धा त्यांना शिष्यत्व देण्याची त्यांची तयारी आहे आणि लेखकाने पुढे म्हटलं होतं! "फार थांबायची गरज नाही. दोन शिष्य मिळाले आहेत त्यांना. एक **M.A.** झालेले आहेत आणि संगीतावर **Ph.D.** करताहेत." रानडे जपून रहा, तुम्हाला माहीत असेल कोण आहेत ते. मला माहीत नाही. तर असे शिष्य त्यांना मिळालेले आहेत आणि त्यांना शिष्यत्व बहाल करायला ते तयार झालेले आहेत. मला सांगायचय असं, म्हणजे गुरु एखाद्याला जेंव्हा आपला शिष्य म्हणून निवडत असतो, तेंव्हा तो काय गोष्टी बघत असेल? त्याच्या काहीतरी प्रेरणा आहेत, त्याला काहीतरी प्रेरणा आहेत. त्या satisfy करणारा जो असतो त्यालाच शिष्यत्व मिळेल. बाकीच्यांना

मिळणार नाही. म्हणजे तो कदाचित असं बघत असेल की याचं खरं प्रेम किती आहे संगीतावर? म्हणजे, कष्ट सोसण्याची ह्याची तयारी किती आहे, क्षमता किती आहे ह्या दोन्ही गोष्टी गुरु बघत असणार. एक क्षमता आणि दुसरी म्हणजे त्याची म्हणजे शिष्याची प्रेरणा, की खरोखरीच एखाद्या गोष्टीबद्दल खरा त्रास घेण्याची ह्याची तयारी कितपत आहे आणि ह्याच्याजवळ क्षमता कितपत आहे. एकच असून दोनपैकी, भागणार नाही दोन्ही गोष्टी असायला पाहिजेत आणि अशाप्रमाणे त्याला एक त्याचा अभिमान असतो. त्यालाही त्याच्या घराण्याचा काही अभिमान आहे, ते पुढे चालवत ठेवायचं आहे त्याला. आणि म्हणूनच तो अशाच लोकांना शिष्यत्व देईल. किंवा आपलं गुरुत्व मान्य करील की जे त्याची गादी किंवा वारसा चालवू शकतील. ह्याचे परिणाम दोन्ही, चांगले किंवा वाईट होऊ शकतील. जे पुस्तक आता बाजारात काही दिवसांनी बाजारात येणार आहे, त्यातला मजकूर आधी मी सांगितला. त्यात त्यांनी म्हटलय की हा अशाने परिणाम असा होऊ शकेल की घराण्यांमधून जे काही एक संगीत आलेलं आहे, ते, जसच्या तसं, शद्वाची बदल न होता, शिकवून पुढील पिढीला देणं त्याच्यातून चालू राहू शकेल. त्याच्यातून हा एक जसा फायदा झाला तसा तोटाही असा असू शकतो. त्याला कमालीची एक आली. आणि त्याच्यामध्ये नवे प्रयोग करायला मनुष्य असमर्थ ठरेल. म्हणजे हे गुरु-शिष्याच्या नात्यामधलं असं एक बोलता येईल की हे जितकं चांगलं, कशाअर्थानं चांगलं? की तुमची एकदा इतकी प्रेरणाशक्ती कमालीची एकवटली की तुमचा performance चांगला होईल, गुरुने तुम्हाला एकदा वरदहस्त ठेवल्यानंतर. परंतु त्याप्रमाणे ही जी तुम्ही एकमार्गी दिशा पत्करलीत, एकचगुरु, तो शिकवील तेच संगीत, तर त्याच्यामध्य न जाणो कदाचित् अनेक तऱ्हेचे जे संगीत असतं त्याच्यावर प्रयोग करण्याच्या दृष्टीने, त्याचा आपल्या संगीतामध्ये उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने कदाचित तुमची जी ही दृष्टी, लवचिकपणा असतो तो कमी कमी होत जाईल आणि एक प्रथा, रुढी तुम्ही चालू ठेऊ शकाल. परंतु प्रयोगक्षमता, नवीन गोष्टी add करण्याची तयारी तितकी कमी होऊ शकेल. हे वेगवेगळच्या बाबतीमधे आहे. राजकारणाच्या बाबतीमध्ये असं म्हणता येईल की एखाद्यानं एकदा असं ठरवलं कि मार्क्स हा माझा गुरु. त्याचा परिणाम काय होतो? की मार्क्स हा शेवटी मनुष्य होता हो, आणि त्याने जे काही शंभर वर्षापूर्वी लिहून ठेवलेले आहे त्यातलं बरचसं जरी सत्य असेल तरी असत्य, चूक अन् पडताळून पहाण्यासारखं असतं आणि तेही तुम्ही मान्य केलत की त्या चौकटीच्या बाहेर तुम्ही जाऊ शकत नाही. याच्याउलट काही लोक असं म्हणतात, 'मला कोणीही गुरु नाही' ह्याचा अर्थ असा की मी एका माणसाला माझं गुरुत्व दिलेलं नाही आहे. मी सगळ्यांकडून चांगलं शिकण्याची माझी तयारी आहे. आणि अमक्या एकाचच गुरुत्व आहे असं आपण सगळी माणसं ही चुका करत असतात आणि कोणात एकात perfection आहे असं समजून एका माणसाचं शिष्यत्त्व मला पत्करायचं नाही, असही एखादा म्हणू शकेल. दोन्ही बाजूला फायदे आणि तोटे आहेत. ते कसे आहेत आणि आजच्या माझ्या विवेचनामध्ये उणिवा काय आहेत ते सांगण्याचं काम आता मी प्रा. रानड्यांवर सोपवतो.

प्रा. अशोक रानडे

उणीवा काही फारशा नाहीत. फक्त आपण पुन्हा थोडासा सारांश काढणार आहोत आणि पुन्हा संगीतातल्या आपल्याला नेहमी जाणवणाऱ्या अनुभवांशी त्याची संगति लावण्याचा प्रयत्न

करणार आहोत. हे सगळं प्रेरणांचं विवेचन हे अतिशय महत्त्वाचं होतं. ते अशातऱ्हेने की आपण गाणं शिकतो तेव्हा आणि आपण गातो तेव्हा आणि आपण गाणं ऐकतो तेंव्हा, या तिन्हीही वेळा प्रेरणा सारख्या कार्यकारी असतात हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा आहे. कारण यामुळे ह्या प्रेरणा, आणखीन् त्या प्रेरणामुळे उत्पन्न होणाऱ्या गरजा आणि त्या गरजा पुऱ्या करण्यासाठी होणारी एखादी क्रिया असा आपण एकंदर ह्या सगळ्या व्यापाराचा अर्थ लावला लावला की मग आपल्याला भर्रदिशी दुसऱ्याला दोष देता यायचा नाही. कारण मग आपण असं कारण मग आण्ण असं म्हणू शकणार नाही की ह्या श्रोतृवृंदाला काही गाणं कळतच नाही. मी त्यांच्यापुढे गाऊ कशाला ? त्याचा सरळ अर्थ असा होता कि त्या श्रोत्यांच्या त्या गरजा नाहीत. तुम्ही त्यांना, त्यांना जे हवय ते देऊ शकत नाही. एकतर त्यांना जे हवय ते तुम्ही द्या किंवा दुसरा एक कलाक्षेत्रातला महत्त्वाचा प्रश्न असा येतो कि तुम्हाला जे द्यायचय ते त्यांना आवडायला लावा. म्हणजे इथे मला वाटतं शिक्षणाचा प्रश्न येतो की creating of taste हा जो सारखा हे रहातो आणि मग कलावंताची सगळ्यात मोठी जबाबदारी येते ती अशी की त्याला समाजाची अभिरुची बदलायची असते. म्हणजे समाजाच्या प्रेरणांचं सगळं संतूलनच बदलायचं असतं. तो सगळा रोखच त्याला बदलायचा असतो. म्हणून एके ठिकाणी आय्. आय्. रीचर्डस्, एक मोठा वाङ्मयामध्ये समीक्षक आणखीन् त्याचा मानसशास्त्राचाही मोठा अभ्यास. त्याने असं म्हटलेलं आहे कि, 'Science and poetry' असं त्याच्या त्या निबंधाचं नांव आहे आणि तिथे तो असं म्हणतो की आता काय झालेलं आहे ? तर आता धर्म गेला. मग धर्म गेल्यानंतर काय झालं ? तर मग science आलं. आणि आता science इतकं पुढे चाललेलं आहे कि आता science मुळे श्रद्धा नाही असं वाटायला लागलंय. मग ती श्रद्धा कशामुळे येईल ? तर ती केवळ कलावंत आणि कला यांच्यामुळेच येऊ शकेल असं त्यानी म्हटलेलं आहे.

इथे मला दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा असा वाटतो की जास्तीत जास्त गरजा ज्यामुळ पुऱ्या होतील तो व्यापार हा समाजाच्या दृष्टीने श्रेष्ठ, असं जर आपण एक ढोबळ समीकरण मांडलं, तर कदाचित कलांच्या बाबतीतसुद्धा असं म्हणता येईल की कोणत्या कलांमुळे जास्तीत जास्ती गरजा पुऱ्या होतात ? म्हणजे इथे आता त्यांनी म्हटल्याप्रमाणे त्या त्रिकोणाचा पायथा सोडणार आहोत. आपण कदाचित वरही जाऊ आणि कदाचित अनेक पातळींवर अनेक गरजा पुऱ्या होतात अशी ज्याची शक्ती आहे ती कला आणि तो कला आविष्कार अधिक श्रेष्ठ आहे असं कदाचित म्हणायला लागेल आणि मग वाटवे लगेच म्हणतील की नाटक श्रेष्ठ आहे कारण नाटकामध्ये अधिकाधिक गरजा पुऱ्या होतात. पण हे शक्यता आहे. आणि म्हणून ज्याला composite art form म्हणतो, की ज्यामध्ये अनेक कला एकत्र आलेल्या असतात, त्याचा पगडा अधिक असतो. ही गोष्ट सुद्धा लक्षात घेण्यासारखी आहे. आणि मग आपल्या असं लक्षात येतं की संगीतामधील जे विविध प्रकार आहेत, ख्याल आहे, धृपद आहे, वाद्य-वादन आहे, ठुमरी आहे, भावगीत आहे. यातलं कमी अधिक आकर्षण कां ? असं जर आपण विचार करायला लागलो तर यामुळे कमीअधिक गरजा पुऱ्या होतात असं आपल्याला उत्तर शोधलं पाहिजे आणि मग आपण ही श्रेष्ठत्वाची जी भाषा करतो की शास्त्रीय संगीत हे श्रेष्ठ आहे, भावगीत के कनिष्ठ आहे. आत्ता त्यांनी बरोबर उल्लेख केला की हलकंफुलकं

गाणं गातो. हे हलकंफुलकं गाणं वास्तविक पहाता तितक्याच intensity ने, तीव्रतेनं म्हटलेलं असतं आणि त्याने ही गरजा पुऱ्या होत असतात. मग ह्या गरजा कमी महत्त्वाच्या कां ? आणि वरच्या गरजा कुठल्या ? हे अशी भाषा वापरताना आपल्याला विचार करायला लागेल. मग कदाचित् असही होईल की ठुमरीमुळे शब्दार्थबोध होतो, एक थोडसं आपल्या मनामध्ये अर्थ कळण्याची जी क्षमता असते त्यालाही आवाहन होतं आणि शिवाय कानालाही गोड लागतं. त्यामुळे कदाचित् ठुमरी ख्यालापेक्षा श्रेष्ठ ठरु शकेल. आणि ज्याअर्थाने ख्याल हा धृपदापेक्षा श्रेष्ठ असा आपण दावा करतो त्याचमुळे मग आता ठुमरी ही ख्यालापेक्षा श्रेष्ठ असं म्हणण्याची पाळी येईल. कारण मग तिथेही आपण असं सारखं म्हणत आलो की ख्याला-मध्ये काय होतं, अधिक स्वातंत्र्य मिळतं, त्याच्यामध्ये बांधीलपणा कमी असतो आणि ख्याला-मध्ये स्वातंत्र्य, प्रत्येकाला स्वतःला काय वाटतं ते सांगता येत, आत्माविष्कार जास्त होऊ शकतो. मग कदाचित ठुमरीमध्ये तो जास्त होतो असं म्हणायची पाळी येईल. तेव्हा कदाचित ही गरजांची जी भाषा आहे ही अतिशय महत्त्वाची याही दृष्टीने ठरु शकेल. पुन्हा मला असं वाटलं की ही गरज ही शिक्षणामध्ये आहे. म्हणजे मघाशी गुरु-शिष्याच्या नात्याचा त्यांनी मुद्दाम उल्लेख केला तो अतिशय योग्य होता. ह्या गुरुशिष्याच्या नात्याकडे आपण कसं बघा-यचं ? तर तो गरजेच्या भाषेमध्ये जर बघायला लागलं तर पुन्हा असं दिसतं कि आपण अमका गुरु कां शोधतो ? अनेक गरजा असू शकतील. एक, त्याचं गाणं आपल्याला हवय म्हणून आपण त्याचे शिष्यत्त्व पत्करु शकतो. म्हणजे, आपल्याला ते गाणं येवो अथवा न येवो, परंतु 'I am in good company !' रविशंकरांचाच एकदम शागीर्द का व्हायला जातात लोक ? आता वास्तविक पहाता रविशंकर हे नऊ महिने बाहेर असतात आणि तीन महिने प्रवासात असतात. असं असतांना रविशंकरांचे लोक शिष्य कां होतात ? तर 'रविशंकरांचा शिष्य' ह्या म्हणण्यामध्येच काहीतरी गरजा पुऱ्या होताहेत त्यांच्या. आता आपण असं जर म्हटलं कि ह्या गरजा पुऱ्या होण्यामुळं लोकांना काही मिळत नाही आणि त्यालाही काही मिळत नसेल, तर हे थोडसं अन्यायाचं होईल. लोकांना कदाचित् मिळत नसेल, पण त्याला नक्की मिळत असलं पाहिजे. कारण त्याशिवाय, त्याचं समाधान होत असल्याशिवाय तो काही चालू ठेवणार नाही हा सगळा प्रकार.

तर मग अनेक गुरू करणं, एक करणं ह्या पुढच्या प्रश्नाकडे येऊ. गुरुशिष्य नात्यामध्ये हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे की आपण 'मी एकच गुरु केला' असं सांगणं याच्यामध्ये कदाचित् आपली एक गरज आपण पुरी करतो. ती गरज पुरी करतो म्हणजे ती कुठली ? तर एक मोठा कुठलातरी एक platform आपल्याला उभा रहायला मिळाला आणि मग अनेक गरजा दुसऱ्या असू शकतात की माझं गाणं मला बदलायला पाहिजे. आणि ते धैर्य आपल्याजवळ नसतं. मग हे धैर्य आपण मानायचं नाही. म्हणजे आपल्याजवळ आपले धैर्य नाही हे मानायचं नाही. आपण काय करायचं ? "नाही एका गुरूची विद्या पुरी झाल्याखेरीज मी दुसरीकडे जाणार नाही." हा आपण मनापासून विचारण्यासारखा प्रश्न आहे की एका गुरुची सगळी विद्या याचा अर्थ काय ? अशी सगळी विद्या एकाची दुसऱ्याला कधी येते कां ? का आपली आपली विद्या शोधायला लागते एका विशिष्ट टप्प्यानंतर ? म्हणजे मग हे गुरु-शिष्याच्या नात्याकडेसुद्धा पुन्हा आपल्याला वेगळ्या दृष्टीने बघायला लागेल. शिक्षणाचा

हा प्रश्न झाला. गाण्याचा प्रयोग करत असतांनासुद्धा पुन्हा तोच प्रश्न येणार आहे की माझ्या आज गरजा काय आहेत ? ह्यांनी आता सांगितल्याप्रमाणे चांगली उदाहरणं आहेत. सामताप्रसाद जेव्हा मुंबईला नवीन होते तेव्हा आमच्या गजाननबुवांच्याकडे आले होते आणि गजाननबुवांनी मला त्यांच्या खिदमतीत म्हणून सोडलं. आता माझी गरज होती की बुवांच मानायचं आणि बुवांच्या good-books मध्ये रहायचं. सामताप्रसाद मला माहीत नव्हते. मला त्यांचा तबलाही आवडत नव्हता. परंतु तरी त्यांच्याकडे माझी दुसरी अडचण होती की मला हिंदी बोलता येत नव्हतं. तरीसुद्धा मला ते सगळे नीट पाळायचं होतं. त्यामुळे मी जास्तीतजास्ती अभिनयावर काम भागऊन नेत होतो. मुद्दा असा की मला सामताप्रसादानी एक वाक्य सांगितलेलं आठवतय. ते म्हणाले की "मी तीनच गोष्टी दररोज करत आलो आहे गेली पंधरा वर्ष" ती काय ? तर म्हणाले "सकाळी उठायचं, तोंड धुवायचं, रियाजाला बसायचं. नंतर जायचं दहा वाजता ते हलवायाकडे जायचं आणि तिथे उकडा लावलेला असा-यचा. जिलेबी आणखी दूध घ्यायचं. त्याच्यानंतर पुन्हा मेहनतीला बसायचं, मग जेवायचं, मग पुन्हा मेहनतीला बसायचं. संध्याकाळी बाहेर पडायचं, ज्योतिषाकडे जायचं, त्याला विचारायचं, 'भारतभर माझं नांव केव्हा होईल ? ' तिथून परत यायचं, पुन्हा मेहनतीला बसायचं."

यांनी त्यांच्या प्रेरणांचं फार चांगलं वर्णन केलय की सामताप्रसाद यांच्या प्रेरणा कुठल्या होत्या ? तर त्यांना तबला वाजऊन मोठं व्हायचं होतं. म्हणजे तबला तर नक्की यायला हवा होता. दुसरी प्रेरणा अशी होती की मला लोकांच्यात नाव केव्हा मिळेल ? ही सुद्धा तितकीच जबरदस्त प्रेरणा होती. मग पुन्हा येनकेनप्रकारेणचा यांनी जो उल्लेख केला तो येतो की माणूस, नांव करायचं हे जर एकदा त्याने ध्येय ठरवलं तर तो भलेबुरे सगळे मार्ग चोखळतो. आता आपण ते कशावरुन ठरवायचं त्यांनी कुठल्या गरजा ठरवाव्यात ते ? तेंव्हा आपण त्याच्या गरजा तर त्या असतील, तर त्याने त्या गरजा पुऱ्या केल्या असं आपल्याला म्हणायला पाहिजे. म्हणजे मग पुन्हा आपण psychology च्या बाहेर जाणार आहोत. की जेव्हा आपण असं म्हणायला लागतो की ह्या माणसाने ह्या गरजा पुऱ्या करुन घेणं हे काही बरं नव्हे. असं आपण म्हणतो. म्हणजे तो त्यानी त्याच्या त्याच्या सामर्थ्याने त्यानी गरजा पुऱ्या करुन घेणं हे सुद्धा बरं नव्हे असं जेव्हा म्हणतो तेव्हा आपण psychology च्या बाहेर जातो. पुन्हा आपण Ethics मध्ये जातो. आणि हे प्रश्न पुन्हा पुन्हा तिथे येऊन ठेपणार आहेत. परंतु त्या प्रश्नांची मांडणी आपल्याला फडक्यांच्या विवेचनापासून फार चांगली होती. मला आणखीन् एकदोन गोष्टी आठवतायत. म्हणजे, आपण एकदा असं म्हटलं कि गुरु कां करायचा ? हाच प्रश्न पुन्हा एकदा बसल्या बसल्या मनात आला, त्याचं उत्तर असं लक्षात आलं की आपल्याला एक कोणीतरी टिळा लागतो. सुरवातील एक टिळा लागतो. पण पुढे-सुद्धा टिळा हवा असं वाटतं रहातं लोकांना. आता आपण पुस्तकावरुन शिकणं ही गोष्ट खरोखर अशक्य आहे कां ? एका विशिष्ठ मर्यादेनंतर तुम्हाला गुरूची आवश्यकता का लागावी ? तुमच्या मनामध्ये कमकुवतपणा आहे म्हणून की काय ? तुम्ही जर समजा, पुस्तकावरुन चीजा बसवल्यात, तर त्या खरोखर चीजा येऊच नयेत कां ? आपलं notation खरोखर इतकं वाईट आहे कां ? हे जर प्रश्न आपण विचारायला लागलो तर पुन्हा इथे असं येतं कि एक काहीतरी वेगळीच गरज, म्हणजे ती ज्ञानाचीच केवळ गरज नसते. आपलं

एक टिळ्याचीच गरज असते. पुन्हा आता ही असावी की नसावी हा आपण प्रश्न इथे निर्माण करत नाही. पण ही एक गरज असते. म्हणून आपण शेवटी सारखं गुरुचं नांव सांगत रहातो, हेही शक्य आहे. पण त्याच्यात बरोबर त्यांनी जो Supernatural चा उल्लेख केला, तो एका अर्थाने तोही महत्त्वाचा आहे. कि आपल्यापेक्षा श्रेष्ठ माणूस, याचा जर आपल्या विषईचा चांगला ग्रह असेल तर ती by itself it is a force. म्हणजे, तीसुद्धा एक शक्ति असू शकते. आणि ह्याही नात्यान हे अतिशय महत्त्वाचं आहे. त्यामुळे पुस्तकांच्या विषयी माणसाला, फारच थोडी माणसं अशी असतात की ज्यांना पुस्तकांच्याविषयी एखाद्या व्यक्तिइतका आदर वाटतो. म्हणजे आपण, परवा त्यांनी मध्ये एकदा उल्लेख केला होता की पुस्तकांची धूळ आहे की नाही ह्याचंसुद्धा भान नसत. त्याच कारण असं की ती पुस्तकं म्हणजे 'its a commodity' असं त्यांना वाटत असतं. ज्या माणसाला खरोखरच पुस्तकातून काही मिळतं तो पुस्तकांविषयी असा ग्रह बाळगणार नाही. म्हणजे मला हेही माहीत आहे की पुस्तकांची पानं दुमडून वाचल्यांवर त्या पुस्तकाचा मालक खवळलेला मी पाहिलेला आहे. आणि तो असं म्हणतो, "अरे, तू पुस्तक असं दुमडतोस. त्या पुस्तकाला काय वाटेल ? " आता याच्यामध्ये थोडसं आपल्याला वाटेल असं की हे काव्य आहे पण त्याच्या दृष्टीने ते खरं आहे. कारण तो पुस्तकाला तसं मानतोय. म्हणजे हा पुन्हा जो आपल्या भावनांचा आरोप करुन त्यातून आपण शक्ती घेणं ; हाही प्रकार गुरु-शिष्य संबंधात होतो. एकलव्याची गोष्ट आहे ती काय उगीच नाही झाली. त्यात motiration पुन्हा सगळं एकत्र झालं, सगळ्या प्रेरणा एकाग्र झाल्या. म्हणून त्यामुळे त्यातून त्याला सामर्थ्य मिळू शकलं.

मला वाटतं प्रेरणांचा हा विषय इतका महत्त्वाचा आहे की पुन्हा एकदा आपल्याला ह्या प्रेरणांच्याकडे तपशीलाने बघायलाही लागेल. आणि मैफलीमधला जो त्यांनी उल्लेख केला तो एक शेवटचा सांगायचा राहिला. की मैफलीमध्ये आपण गाणं ऐकतो तेव्हा आणि प्रत्यक्ष एकटं ऐकतो तेंव्हा, मैफलीत गातो तेव्हा आणि एकटं गातो तेव्हा ह्यात पडणारा फरक हा आपल्या आता लक्षात यावा. म्हणजे आपण कुठेतरी लघुतम साधारण विभाजक काढून समु-दायामध्ये गात असतो. असं वाटतं की यातल्या प्रत्येक माणसाला माझं गाण्यातला कुठलातरी भाग आवडावा. अशी आपली खटपट असते. आणि तशी जर नसेल तर मग आपल्याला त्यांच्याकडे पाठ फिरऊन गावं लागतं कि माझ जज्ञ गाणं आहे, ते त्यांना पटत असेल त्यांनी बसावं, बाकीच्यांनी जावं. पण आता ,जो माणूस हा धंदा करायला येईल त्याला हे करणं शक्यच नाही. आणि म्हणून मग 'कलेचा धंदा' करणं हे फार वाईट ! हे काही केवळ एक नीतितत्त्व म्हणून नव्हे, यात एक थोडासा असा भाग येतो कि ज्या माणसाला कलेचा धंदा करायला लागतो त्याला अनेक माणसांची नोकरी करायला लागते एकाच वेळेला. आणि एकाच वेळेला अनेकांची ताबेदारी करणं जमत नाही. कारण त्या प्रेरणांचं संतुलन होऊ शकत नाही. म्हणजे प्रेरणांच्या terms मध्ये बोलायचं झालं तर असं की इतक्या विविध प्रेरणा जर ऐकाचवेळेला तुम्हाला खेचायला लागल्या तर तुमची प्रगति थांबणार आहे, तुम्ही पुढे सरकू शकणार नाही, हा त्याच्या मध्ये भाग आहे. म्हणजे एकाच वेळेला स्पष्टही वाजवायचं आणि एकाचवेळेला मला जलदही वाजवायचं ह्या दोन्ही गोष्टी जेव्हा जमत नाहीत तेव्हा

मनुष्य कुठेतरी संतूलन करतो त्याचं आणि मग आपल्याला वाडगांवकर सांगतील की हळू वाजवत असतांना आणि जलद वाजवत असतांना बोटाची ठेवण बदलतात माणसं. ती का बदलतात ? तेव्हा मग स्पष्टतेचा विचार नाही, तेव्हा speed, की मला हे इतक्या अवधी-मध्ये इतकं झपाट्यानं गेलय हेच तुमच्यापुढे मांडायचं आहे. तेव्हा ह्या प्रेरणांची विविधता आणि एकाचवेळेला अनेक प्रेरणा कार्यकारी असणं आणि सगळ्यांच्या प्ररणा वेगवेगळ्या असणं, या जर गोष्टी आपण लक्षात ठेवल्या तर संगीत जगतामध्ये जी आपण विशेषणांची खैरात करतो, ती कदाचित कमी होईल.

संगीताचे मानसशास्त्र

व्याख्यान ५ वे

व्याख्याते प्रा० कि० मो० फडके

अनेकदा, व्यासपीठावर बोलायला उभे राहिल्यावर विचित्र अवस्था प्राप्त होते, हातपाय गळायला लागतात, तोंड कोरडं पडतं ; हे सगळं कां होतं ? तर ह्याच्याबद्दल mass-psychology कडे वळण्यापेक्षा मी, जो बोलणारा किंवा जो गाणारा असतो त्याच्याकडे जास्त लक्ष देईन. माझा हा फार आवडीचा विषय आहे, मी तुम्हाला अगोदरच सांगितलं. कारण याच्यामुळे आपलं सगळं जीवित बरेचवेळा अत्यंत लुळंपांगळं बनलेलं असतं. दुसऱ्याबद्दल वाटणारी भीती. साधारणतः ९८ टक्के ज्या आपल्या काळज्या असतात, त्यांचं जर आपण analysis केलं तर आपल्या असं लक्षांत येईल की ह्या ९८ टक्के काळज्या असतात त्या म्हणजे आपल्याबद्दल दुसरे काय म्हणतील, याच्याबद्दलच्या असतात. आणि ह्या ज्या काळज्या असतात त्याच्याचमुळे स्टेजवरचा performance हा वाईट होत असतो.

बोलण्याचं उदाहरण मी देतो. तुमच्यापैंकी कित्येक लोक असे आहेत की ज्यांना प्रश्न विचारावेसे वाटतात. पण विचारले जात नाहीत. त्याला कारण सोपं आहे. असं वाटतं, मी जर हा प्रश्न विचारला तर माझं हसं तर नाही ना होणार ? अरे, पण झालं तर काय होईल ? असं साधं एक मानसशास्त्र आम्ही सांगत असतो. त्याला मी एक तुम्हाला अत्यंत थोडी अशी, थोडक्यांत एक मानसशास्त्राची theory तुम्हाला सांगतो. तिचा तुम्हाला जीवनातल्या सगळ्या बाबतीत उपयोग होऊ शकेल. स्टेजवर होऊ शकेल, संगीतात होऊ शकेल. सामाजिक जीवनामध्ये जी एक भीती आपल्याला वाटते, कोणा अधिकाऱ्याला जाऊन भेटू कसा ? एखाद्या मोठ्या गुरुसमोर जाऊ कसा ? त्याच्यापुढे वाजऊ कसा ? या भितीकरता तुम्हाला एक सामान्य formula देतो. त्याला म्हणायचं 'A,B आणि C formula.' personality चा. त्यातली ही जी 'A' गोष्ट आहे ती म्हणजे 'activating event' काहीतरी घडणारी घटना. लोक मला हसले. आणि त्यामुळे काय झालं ? समजा, मी आता काहीतरी बोललो. बोलतांना माझी चूक झाली. माझी अनेकवेळा झाली आहे. तुम्ही जर माझं हे टेप केलेलं ऐकल, तर 'काय दर्जाचं मराठी आहे ! असं कुणीतरी त्याच्याबद्दल म्हणू शकतील. हा मनुष्य ब्राह्मण दिसतो, चांगला बोलतो असं वाटतं, मराठी मातृभाषा असावी, नांव 'फडके' आहे, आणि मराठी असं काय बोलतो ? अस सुद्धा कुणी पंडित म्हणू शकेल. मी म्हणेन काय बिघडलं ? माझा उद्देश असा होता, माझे मित्र मला म्हणाले, "तुम्ही मानस-शास्त्राबद्दल संगीताच्या अभ्यासकांना काही माहिती सांगू शकाल काय ?" मी म्हटलं, "हो प्रयोग करीन. मी संगीतज्ञ नाही. successful झाला न झाला." तर, मला सांगायचय काय, 'A म्हणजे ' activating event' कुठलीतरी अशी घटना की ज्यामुळे

मी बावचळलो, भ्यालो, inhibited झालो, गाळण उडाली, अशी काहीतरी घटना. आणि ती म्हणजे, 'प्रश्न विचारु कसा'? प्रश्न विचारल्याने लोक हंसतील, तो प्रश्न बरोबर नसेल अशी भीती मनांत आली आणि खलास! आवाज बाहेर फुटलाच नाही! मग घरी गेल्यावर वाटतं, हे मी विचारायला पाहिजे होतं. मग दुसऱ्या दिवशी रानडेंना जाऊन विचारायचं "काय हो, मी असं बोललो असतो तर काय झालं असतं"? अशा अनेक गोष्टी होऊ शकतात. आता ह्याच्यामुळे आपल्याला सामान्यतः वाटत असतं की 'A' is the cause of 'C' 'C' म्हणजे ही वाटणारी भिती. 'C' म्हणजे हा जो stage-fright तुम्ही म्हणता, तर ही stage-fright म्हणजे आपल्याला असं वाटत असतं की 'A' मुळे निर्माण झालेली. 'A' is the cause of 'C', activiting event. Laughter, redicule of people that is making people nervous असं आपल्याला वाटतं. प्रत्यक्षात आम्ही तुम्हाला असं सांगू––असं होत नाही. *A does not cause C. If you will ask me "what causes 'C'? म्हणजे consequence. Consequence म्हणजे भिती inhibited feeling वगैरे वगैरे. ते वाटेल ते असू शकेल सामाजिक जीवनात. कोणाला भेटायला जायचं, म्हणजे आपल्याला जी पांच मिनिटं आधी धडधड होते छातीत, 'कसा बोलू?' बोल. जसं येईल तसं बोल. बिघडलं काय त्याच्यामधे? तर हे 'A' मुळे 'C' मुळे होत नसतं. मग कशामुळे होतं? याला उत्तर आम्ही अस देतो, 'B' मुळे होत असतं. ही जी धडधड आहे छातीतली, जी भीती आहे, that is caused by 'B' not by 'A'.

If 'B' causes 'C' what is 'B'? 'B' is what we talk to ou'selves. ज्याला आम्ही self talk असं म्हणतो. बघा, तुमच्या मनात जेव्हा प्रश्न असा जिभेवर आलेला आहे, त्यावेळेला एक दुसरं वाक्य तुमच्या मनाशी तुम्ही उच्चारलय, "अरे बापरे! पण चुकलं तर? नको बाबा. आपल्याला काही कळलं नाही, नीट समजलं नाही आणि ते म्हणायचे पण पहिल्या भागामधे लक्ष होत की नव्हतं तुमचं?' म्हणजे तुम्ही प्रश्न विचारायच्या वेळेला आणि मनात विचार आल्यानंतर काहीतरी स्वतःशी बोलताय. ते अस्पष्ट असेल. ते नीट ऐका. आणि त्यामुळे तुम्हाला ही भीती वाटत आहे.

आता, ह्याच्यापुढची step अशी की हा जो self-talk आहे, तो तुम्ही गृहीत धरता, त्याला कधी challe ge करत नाही. त्याच्याकडे कधी तुम्ही असं धीटपणे वळून बघत नाही. समजा, चुकलो मी आणि लोक मला हसले, तर नक्की काय होईल? हंसतील लोक दोन मिनीटं. ह्याच्यापलीकडे काय होईल? असा विचार तुम्हाला सुचत नाही. कारण लहानपणापासून ही 'B' म्हणजे जीवनाचं तत्वज्ञान असं आम्ही त्याला म्हणतो, "Attitude or Philosop y of Life" असं म्हणतो. आणि ह्या 'B' मध्ये जेंव्हा स्वतःशी तुम्ही बोलत असता, त्याच्यामध्ये दोन तऱ्हेची बोलणी आम्ही Classify करतो. एक म्हणजे 'RB' 'Rational B' आणि दुसरी म्हणजे 'IB' 'Irrational B' B Rational म्हणजे काय? अरे, जर मी खरच काहीतरी प्रश्न विचारला आणि

जर तो चुकला तर लोक कदाचित मला हंसतील. अगदी बरोबर. अस होऊ शकेल. खरोखरीच तुम्ही काहीतरी विचाराल आणि लोक तुम्हाला हंसतील. हा विचार योग्य आहे, तर्काधिष्ठीत आहे. त्याच्यात वावग असं काही नाही. पण त्याच्यापेक्षा तुम्ही जास्त काहीतरी एक अधिक step घेताय. आणि ती step म्हणजे 'असे जर लोक हंसले, तर काय भयंकर होईल?" इथे तुम्ही चूक केलीत ते rational नाही. लोक हसतील हे शक्य आहे. पण लोक हंसले म्हणजे काहीतरी भयंकर झालं, माझा performance चुकला म्हणजे आता मी रसातळाला पोहोचलो. अरे बापरे! अबब aweful! terrible ही गोष्ट justifiable नाही आहे. आणि याच्याचमुळे तुम्हाला ही भीती वाटते. ही challenge करा गोष्ट. आता मी तुमच्याशी बोलतोय. तुम्हाला सांगितलं, हजारो चुका मी केलेल्या आहेत आणि करणार आहे. आयुष्यभर हा धंदा पत्करलाय, लोकांसमोर बोलायचय, कधी शब्द अडणार आहेत, कधी बरोबर अ येणार आहेत. मग काय झालं काय? लोक म्हणतील 'नाही, एवढासा काही नीट बोलला नाही. माझं त्यामुळे नुकसान नक्की काय झालं? तुम्ही धोंडे मारलेत कां माझ्यावरती? नाही मारलेत. (हंशा) म्हणजे ज्या वेळेला मनुष्याला शारिरीक इजा केली जाते, त्यावेळला जर तो दुःखी झाला तर ते क्षम्य आहे. कारण तुम्हाला शारीरिक इजा पोहोचली. पण बहुतेक वेळेला, मला तुम्हाला सांगायचय की हा जो आपल्याबद्दलचा self talk असतो तो हा का आहे? confusing आहे. त्याच्यात अर्धवाक्य बरोबर आहे. 'अरे बापरे! असं झालं तर? आणि न जाणो लोक हसतील.' मग पुढे तुम्ही असं म्हणता 'आणि जर लोक हसले तर काय भयंकर झालं? काही भयंकर झाल नाही. हसले लोक दोन मिनीटं. (एक श्रोता: मग तुम्ही इथे मानसिक इजा होते असं समजणार नाही का? नाही होणार. (श्रोता: म्हणजे ती तुम्ही कमी लेखताय.) बरोबर आहे. म्हणजे ज्याला मनुष्य मानसिक दुःख, मानसिक इजा असं जे काही म्हणत असतो, ते सगळं त्याने स्वतःच केलेलं असतं. ते खोटं नसतं. त्याचं आमचं analysis असं आहे की you have made it yourself. Nobody makes you happy or unhappy. You make yourself. (श्रोता: ही गोष्ट, स्वतःशीच जो self-talk होतो, ही भीती वाटते, ती खरी असते कां?) हो. भीती खरी. लोक हसतील ही भीती खरी. पण त्याच्यापुढचं जे नेहमी एक वाक्य दडलेलं आहे 'तसं झालं म्हणजे काहीतरी भयंकर झालं!' हे जर तुम्ही challenge केलत दरवेळी तर ही भीती कमी होत जाईल. (श्रोता: नाही, आता स्वतःच्या प्रतिमेला एक धक्का लागला म्हणजे ती एक प्रेरणा) correct – बरोबर आहे. आणि हीच प्रेरणा एकदा नीट analysis करुन स्वच्छ डोळ्यासमोर आणा. काय माझ्या प्रतिमेला धक्का पोहोचला? मी तुमच्या पुढे बोलतोय आणि मी एका university च्या Post-graduate department मध्ये शिक्षक आहे. आणि कदाचित् तुम्ही सगळे म्हणाल, 'ह्याचं इंग्रजी आणि मराठी बरेचवेळा बोलतांना चुकत होतं' माझ्या प्रतिमेला इतका काय भयंकर धक्का त्यामुळे पोहोचला? काहीही होऊ शकत नाही माझ्या प्रतिमेला. मला दाखवायचय तुम्हाला की प्रत्येक वेळेला तुमच्या ह्या स्वतःच्या विचाराशी जी भीती दडलेली असते, त्यात एक बरोबर

आणि एक चूक वाक्य असतं. एक उदा. देतो. ज्याला जगामध्ये inferiority complex म्हणतात तो गाणाऱ्यांमध्येही असू शकेल. पण त्याची ideals काहीतरी उच्च आहेत. तो ह्याच्याशी तुलना करतो. त्याच्याहून मी कसचा? असा त्याच्या मनामधे एक विचार आलेला आहे. तो कसा सांगणार ? 'अरे मी कसचा? माझं कसचं आलय?' असं एकदा विचाराने आपल्या मनात घर केलं की त्याचे परिणाम काय होतात बघा. वस्तुस्थिती अशी असू शकेल की 'अ' ही व्यक्ति 'ब' ह्या व्यक्तीपेक्षा बेकार गाते. ही वस्तुस्थिती असू शकेल. आवाज चांगला नाही आहे, तयारी चांगली नाही, क्षमता नाही. हे तर बरोबर झालं. ह्याच्यापुढे एक वाक्य दडलेलं असतं 'आणि अशी त्याच्यापेक्षा कमी शक्यता माझ्यात असणं, पात्रता असणं म्हणजे काहीतरी भयंकर आहे'. ते challenge केलं पाहिजे. म्हणजे भयंकर काय आहे? सगळी लोकं सारखी असतात की काय? चार लोक चार वेगळ्या तऱ्हांचे आहेत. माझी ही पात्रता आहे, त्याची ती पात्रता आहे. त्याच्यापेक्षा मी कमी आहे. गाण्याच्या बाबतीमध्ये म्हणजे 'मनुष्य' म्हणून मी नालायक आहे असं कसं ठरतं? (एक श्रोता : गाणारा म्हणून नालायक ठरेल की !) हां.— गायक म्हणून त्याच्यापेक्षा कमी दर्जाचा ठरु शकेल पण म्हणून त्यामुळे असं ब्रम्हांड कोसळलं, अरेरे! अबब! भयंकर! बापरे! हे जे विचार आहेत ते—— मी तुम्हाला त्यांच्या प्रश्नाचं उत्तर असं देतोय की ही जी self-fright, stage-fright आहे. It is really speaking caused by our one's own fear, created by ourself. आणि लोक काय म्हणतील याची ही भयंकर self consciousness is ultimately the excessive consciousness of oneself. विनाकारणच आपण काहीतरी चिंता करुन बसतो. 'लोक काय म्हणतील?' ती question करीत नाही. म्हणून ' 'A' does not cause 'C'. मला दाखवायचय काय' लोकांच्या हसण्याने नुसतं आपण गोंधळून जाणं त्याला पुरावा असा आहे. माझ्याकडे तुम्ही बघून हसताय आणि चार लोकांकडे हसता. मग सगळेच लोक असे बावचळून जात नाहीत. ह्याचं कारण काय? वास्तविक पहाता activating event तीच आहे. एक मनुष्य म्हणतो, 'so what? काय झालं? लोक हसले म्हणून बिघडलं काय? आणि दुसरा ते लावून घेतो. थोडक्यात म्हणजे, बाह्यघटना ज्या घडतात, त्याचं आपण काय मूल्यमापन करतो, त्याला महत्व किती देतो याच्यावरती तुमच्या stage-fright चं performance चं सगळं काही अवलंबून आहे.

संगीतासारख्या कलेमधे की जी लोकांना सादर करायची आहे. तिच्यामध्ये तुमची कितीही उत्तम तयारी असली, तुमची कितीही चांगली क्षमता आणि प्रेरणा असली, तरीपण जनतेपुढे जायला तुम्हाला भीती वाटत असेल तर तुम्ही जगात मागे पडाल आणि त्याचा परिणाम असा होईल की तुम्हाला असं वाटायला लागेल की 'हा फालतू गाणारा हो! फुकट पुढे गेला! पण त्याचं कारण असं असेल की त्याच्यात आणि तुमच्यात फरक असा आहे की तो जरी फालतू गातो तरी तो निर्भीडपणे गातो आणि त्यामुळे त्याचा हा जो फालतुपणा तुम्हाला वाटतो, तो समाजामधे उपयुक्त गुण ठरलेला आहे. की तो अशी भीती बाळगत नाही आहे, कमकुवत दिलाचा नाही आहे आणि असं प्रत्येक बाबतीतच होऊ शकेल.

तुम्हाला कोणाला भेटायला जायचं असेल तरी तसच. 'मी ह्याच्याकडे कसा जाऊ'? त्याला काय वाटेल? 'काय वाटेल'? मी मनुष्य आहे, तो मनुष्य आहे. झाली माझ्या हातून चूक देईल दोन मनामधे शिव्या मला.

प्रा. अशोक रानडे : मला यात असं सुचतय फडके की फालतू गाणारा हा पुढे येतो याला कारण एक असं असू शकेल की फालतु गाणाऱ्यांनीसुद्धा समाजाच्या एका विभागाच्या गरजा निश्चित पुऱ्या होत असतात. आणखीन तो गायल्यामुळे त्या गरजा पूर्ण होतात. परंतु ज्याला inferiority complex आहे तो गायलाच नाही म्हणजे गरजा पूर्ण होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. म्हणजे त्याची action च थांबते तिथे. आणि फालतू गाणाऱ्याकडून action चालू रहाते.

APPENDIX A

Psychology for Musicians

Five lectures delivered by Professor K. M. Phadke.

Summary :

First Lecture : Nature of Psychology

1. Psychology is a scientific study of human experience and human behaviour ; 'scientific' because it aims at description and explanation and uses empirical methods.
2. Psychology divides human experience and behaviour into three aspects :—
   (*i*) cognition or knowledge,
   (*ii*) affection (*i.e.* feelings and emotions),
   (*iii*) conation or action.
3. The 'Black Box' model. This consists of three elements—
   (*i*) stimulus,
   (*ii*) mind which is treated as a black box,
   (*iii*) response.

   Pscyhology explains this black box called 'mind' with the help of concepts like 'sensation', 'perception,' 'emotion' 'need,' 'motivation,' 'attitude.'
4. The total musical activity is an activity of the human mind ; it is a kind of experience and a kind of behaviour. Therefore, theories and methods of psychology are important in any study of the musical activity.

   The musician provides the 'stimulus' with his music, while the listener has some 'response' to it. The concepts of attitudes, motivation, perception and emotion are relevant to the psychological study of the musician as well as of the listener.

Second Lecture : Sensation—Perception

1. Human experience consists of 'sensation' and 'perception' ; 'sensation' is what we get from our sense-organs ; perception is the process of adding meaning to sensation.
   (*a*) Perception involves organization of sensations :
   (*b*) It also involves the process of selecting the sensations.

2. Perception also involves a process of 'communication' which consists of—
   (*i*) 'encoding' by the transmitter,
   (*ii*) 'decoding' by the receiver,
   (*iii*) implying a common 'code' (*i.e.* a common set of symbols) shared by the transmitter and the receiver.
3. The structural factors of the stimulus which condition perception are mainly, 'proximity' and 'similarity'.
4. The organic factors in the response which determine the process of perceptual selection :—
   (*i*) mental set or readiness,
   (*ii*) psychological 'filters', which could be further divided as :
   (*a*) perceptual vigilence,
   (*b*) perceptual defence.
5. (*a*) Music also is a kind of communication involving the 'musical code.'
   (*b*) Musical perception is conditioned by structural and organic factors. The best examples of perceptual filters in music is the set of attitudes created by a particular 'gharana.'
   (*c*) Our experience of the music of another culture may be cited as an example of 'sensation', because we cannot organize, select or interprete this sense-data (*i.e.* sounds) and so no perception results.

Third Lecture: Attitudes.

1. Nature of attitudes: Attitude is a generalized, enduring mental set which consists of three interacting elements—
   (*a*) cognitive,
   (*b*) affective,
   (*c*) conative.

   Attitude is a predisposition to act in a favourable or unfavourable manner.
2. Attitudes are a frame of reference for our perception.
3. Functions of attitudes :—
   (*a*) adjustment,
   (*b*) self-defence,

(c) value-expression,
(d) knowledge.

4. Organisation of attitudes :—

   (a) Intra-attitude organization : organization of the cognitive, affective and conative elements within a single attitude.
   (b) Inter-attitude organization.

5. Musical attitudes also consist of the cognitive, affective and conative elements. *E.g.*, the whole controversy over the use of harmonium in Indian music exhibits all the three elements :—

   (a) some knowledge or information about the nature of the instrument and the nature of Indian music,
   (b) emotive appeals from both the sides,
   (c) action like banning the instrument.

Other good examples would be the attitude of vocalists to instrumental music and the attitude of the musicians of the classical style to 'light' music.

The concept of 'gharana' is, in fact, a whole set of attitudes.

Fourth Lecture : Motivation

1. Nature of motivation : Motivation has two aspects—

   (a) energization,
   (b) channelization.

2. Nature of human needs :—

   (i) basic biological needs,
   (ii) safety and security,
   (iii) social needs,
   (iv) ego-need,
   (v) sel-actualization.

3. Human motivation and behaviour are conditioned by these five kinds of needs.

4. Motivation in music may be considered from the point of view of—

   (a) the musician, or
   (b) the listener.

Concepts of motivation and need also help us to understand the nature of the 'guru-shishya' tradition of Indian music.

Fifth Lecture

1. Stage-fright is a psychological phenomenon which affects musical performances radically and very frequently.

2. The related concept of 'inferiority complex' is important in musical education.

Centre News

APPENDIX 'B'

University Music Circle

PROGRAMMES

Date	*Artist*	*Item*
4/1/73	Gandharva Choir	Concert
17/1/73	Shri G. D. Agni	Vocal Concert
9/2/73	*Smt. Nirmala Gogate*	Natya Sangeet
30/3/73	Pt. K. G. Ginde and Pt. S. C. R. Bhat	Vocal Concert
19/8/73	*Smt. Prabha Atre*	Vocal Concert
9/11/73	Pt. Lakshmanrao Pandit	Vocal Concert
18/1/74	Shri Millind Malshe	Student Vocal Concert
,,	Pt. Ram Marathe	Vocal Concert
14/1/74	Shri C. L. Parkar	Student Vocal Concert
,,	Pt. Ratnakar Pai	Vocal Concert

Musicians' Forum

Date	*Speaker*	*Subject*
1/1/74, 3/1/74, 4/1/74, 8/1/74, 10/1/74	Dr. S. V. Gokhale	Swara—Shruti—Saptaka—Viveka
29/1/74	Shri Jamkhedkar	Powada : Tabla : Arvind Mulgaonkar Tuntune : Prabhu Tendulkar
30/1/74	Shri Shridhar Andhare	Ragmala Paintings
31/1/74	*Miss Khan* and others	Gazal : Literary and Musical Form

Maharashtra Cultural Centre
Dr. Ashok Da Ranade Archives

APPENDIX 'C'

Students enrolled in the University Music Centre from 1973 to 1974.

	Name	*Enrolled in the year*	*Appeared for Examination in Dip. Mus.*	*Passed*
1.	*Kum. Lata Gokhale*	1971	1973	1973
2.	*Smt. Neela S. Chiplunkar*	1971	1973	1973
3.	*Smt. Sangita A. Navathe*	1971	1973	1973
4.	Shri B. V. Dhargalkar	1971	—	—
5.	Shri V. S. Kadkade	1971	—	—
6.	Shri B. B. Patre	1971	1973	1973
7.	*Kum. Alka A. Khandekar*	1972	1974	1974
8.	Shri Damodar G. Agni	1972	—	—
9.	*Smt. Veena G Barve*	1972	1974	—
10.	*Kum. S. S. Watwe*	1972	1974	—
11.	*Kum. Kusum N. Johari*	1972	—	—
12.	*Smt. Pradnya S. Phadke*	1972	1974	—
13.	Shri Deepak Patekar	1972	1974	1974
14.	*Smt. Veena D. Shirali*	1973	1974	—
15.	*Kum. Usha Virginkar*	1972	—	—

Edited and Published for the University of Bombay by Shri Ashok D. Ranade,
Head, University Music Centre,
University Club House, B. Road, Churchgate, Bombay-400 020.